
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
धाराशिव | मंगळवार, ९ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २७९| पाने १२ | किंमत रु. ६/ | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



अतिउत्साहाने कार्य करू नका. त्याचप्रमाणे अतिनैराश्य मनात ठेवून कार्य करू नका. अतिउत्साह किंवा अतिनैराश्याने कार्यहानी होते. मन संतुलित ठेवून कार्य करा. आपल्याला वादविवाद आणि संघर्ष बाजूला सारूनच संघकार्य पुढे न्यायचे आहे.

**लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

## महत्त्वाचे

### चॅट-जीपीटीत जाहिरातीच्या अफवा चुकीच्या



**नवी दिल्ली** : सोशल मीडियावर चॅटजीपीटीमध्ये जाहिराती दिसल्याच्या दाव्यांदरम्यान, ओपनएआयचे उपाध्यक्ष आणि चॅटजीपीटी प्रमुख निक टर्ले यांनी वर पोस्ट करून स्पष्ट केले की कंपनी चॅटजीपीटीवर जाहिरातींची चाचणी करत नाहीये. ते म्हणाले की, सोशल मीडियावर शेअर केले जात असलेले स्क्रीनशॉट एकतर बनावट आहेत किंवा जाहिराती नाहीत. काही वापरकर्त्यांनी सोशल मीडियावर जाहिरातींसारख्या प्रॉम्प्ट्सचे स्क्रीनशॉट शेअर केले होते.

# काँग्रेसची भूमिका तुष्टीकरणाची

## 'वंदे मातरम्'वरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा घणाघात







◆ **नवी दिल्ली, ८ डिसेंबर**

'आनंदमठ'ची पृष्ठभूमी मुस्लिमांमध्ये अस्वस्थता निर्माण करु शकते, असे विधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी केले होते. त्यानुसार काँग्रेसने वंदे मातरमची समीक्षा करण्याची भूमिका घेतली. मुस्लिम तुष्टीकरणासाठी सामाजिक सौहार्दाच्या नावाखाली पावन राष्ट्रभक्तीच्या या गीतातील काही कडवी काढून टाकली, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत बोलताना केला.

वंदे मातरमला १५० वर्षपूर्ण झाल्यानिमित्त लोकसभेत आयोजित विशेष चर्चेत सहभागी होतांना मोदी बोलत होते. वंदेमातरमबाबत काँग्रेसने त्यावेळी घेतलेल्या भूमिकेवर हल्ला चढवतांना मोदी म्हणाले की, कारण या गीतातील काही काही कडव्यांना मोहम्मद अली जिना यांचा विरोध होता, त्याच्या विरोधासमोर नेहरुंना झुकावे लागले. तेव्हापासून काँग्रेसची सुरु असलेली मुस्लिम तुष्टीकरणाची भूमिका अजूनही कायम आहे, असा आरोप मोदी यांनी केला.

१९३७ मध्ये काँग्रेसने वंदे मातरममधील काही कडवे हटवली, आणि या देशात फाळणीची बीज रोवली, असा आरोप करत मोदी म्हणाले की, वंदे मातरममधील दोनच कडवी वापरावी, अशी रवींद्रनाथ टागोर यांची भूमिका होती, असा युक्तिवाद नंतर काँग्रेसने केला. या गीतातील काही भाग कठीण आहे, असे सांगत मुस्लिम समाजाच्या आक्षेपानंतर तो हटवण्याची नेहरुंची भूमिका होती. ◄(तभा वृत्तसेवा)

### पंतप्रधानांच्या भाषणातील महत्त्वाचे मुद्दे

- वंदे मातरम वैदिक परंपरेने प्रेरित आहे.
- पृथ्वी ही माता आणि आम्ही तिची संतान हा भाव यातून प्रदर्शित होतो.
- वंदे मातरम राष्ट्रवादाचे सशक्त उदाहरण बनवून उभे राहिले.
- वंदे मातरम हा फक्त राजकीय लढाईचा मंत्र नव्हता.
- वंदे मातरम म्हणजे स्वातंत्र्यांचा लढा होता. ■

### वंदे मातरम्ने चैतन्य निर्माण केले : प्रियांका



वंदे मातरम् १५० वर्षापासून देशातील लोकांच्या हदयात विराजमान आहे, या गीताने गुलामगिरीमुळे सुस्त झालेल्या लोकांच्या मनात नवीन चेतना निर्माण केली, असे प्रतिपादन काँग्रेसच्या प्रियांका वढेरा यांनी केले. लोकसभेत वंदे मातरम्ला १५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित चर्चेत सहभागी होत प्रियांका वढेरा म्हणाल्या की, वंदे मातरम् देशातील लोकांच्या कणाकणात रुजला आहे, लोकांच्या भावनेशी जुळला आहे, त्यामुळे हा विषय संसदेत चर्चेचा होऊ शकत नाही. देशातील ज्वलंत मुद्यावरुन जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी सरकार या मुद्यावर चर्चा करत आहे. उद्या सरकार राष्ट्रगीतावरही चर्चा करायला तयार होईल, असे त्या म्हणाल्या. ■

# एलन मस्कचे स्टारलिंक भारतात दाखल

## ८६०० रुपयांपासून प्लॅन सुरू

◆ **नवी दिल्ली, ८ डिसेंबर**

उद्योगपती एलन मस्क यांची स्टारलिंक ही सॅटेलाइट इंटरनेट सेवा भारतात सुरू होण्याबाबत काही काळापासू चर्चा सुरू होती. ही सेवा आता भारतात सुरू होणार झाली आहे. आता कंपनीने सॅटेलाइट इंटरनेट सेवेचे भारतातील दर जाहीर केले आहेत. ही इंटरनेट सेवा इतरांपेक्षा महाग आहे.

स्टारलिंक इंडिया वेबसाइटनुसार, भारतातील स्टारलिंक प्लॅनची किंमत ८६०० रुपयांपासून सुरू होईल. शिवाय, वापरकर्त्यांना हार्डवेअर किटसाठी ३४ हजार वेगळे द्यावे लागतील. ही सेवा खरेदी केल्यानंतर तुम्ही स्वत: पूर्ण सेटअप करू शकता. कंपनीच्या मते, सेटअप पूर्ण झाल्यानंतर तुमचे इंटरनेट सुरू होईल. कंपनी ३० दिवसांची ट्रायल देखील देते आहे. ही सेवा ९९.९ टक्के अपटाइम देते आणि इंटरनेट





व्यत्यय येणे हा प्रश्नच उद्भवत नाही, असा दावा स्टारलिंकने केला आहे. हे इंटरनेट एलन मस्कच्या स्टारलिंक उपग्रहांवर आधारित असल्याने ते देशात कुठेही स्थापित आणि वापरले जाऊ शकते. तथापि, ते सध्या मर्यादित ठिकाणी उपलब्ध आहे. ३० दिवसांच्या ट्रायल दरम्यान वापरकर्त्यांना अमर्यादित डेटा मिळेल. तुम्ही स्टारलिंक इंडिया वेबसाइटला भेट देऊन प्लॅन आणि उपलब्धता तपासू शकता. ◄(वृत्तसंस्था)

## 'एमपीएससी'ची परीक्षा ४ जानेवारीला

**मुंबई** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या मतमोजणीमुळे २१ डिसेंबर रोजी होणारी महाराष्ट्र गट 'ब' अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा पुढे ढकलली आहे. आता ही परीक्षा नववर्षाच्या पहिल्या रविवारी म्हणजे ४ जानेवारी २०२६ रोजी होईल.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात येणारी महाराष्ट्र गट 'ब' अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २१ डिसेंबरला होणार होती. जिल्हा पातळीवर या परीक्षेची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी व महसूल विभागाकडे असते. पण २१ डिसेंबर रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची मतमोजणी होणार आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी व इतर अधिकारी या मतमोजणीत व्यस्त राहणार आहेत. त्यामुळे प्रस्तुत परीक्षा होणार किंवा नाही याविषयी संभ्रमावस्था निर्माण झाली होती.

# शेततळ्यात बुडून लहानग्यासह आई, वडिलांचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ डिसेंबर -**

घराजवळच्या शेततळ्यामध्ये बुडून आई, वडिल आणि मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना पंढरपूर तालुक्यातील कोर्टी या गावात आज दुपारी घडली.या घटनेमुळे गावात खळबळ उडाली आहे. एकाच वेळी तिघांचा बुडून मृत्यू झाल्यामुळे दुर्घटना घडली की आत्महत्या आहे, असा संशयही व्यक्त केला जात आहे.



या दुर्दैवी घटनेबद्दल मिळालेल्या माहितीनुसार, पंढपूर तालुक्यातील कोर्टी गावामध्ये शेततळ्यात ही घटना घडली. विजय लोंढे, प्रियांका लोंढे आणि ५ वर्षीय प्रज्वल लोंढे अशी पाण्यात बुडून मृत्यू झालेल्या तिघांची नावं आहेत. कोर्टी गावात लोंढे कुटुंबीय राहत होतं. त्यांच्या घराच्या जवळच एक शेत तळं आहे. दुपारच्या सुमारास त्यांचा मुलगा प्रज्वल शेतात खेळत होता. पण, बराच वेळा झाला विजय लोंढे आणि प्रियांका लोंढे आपल्या मुलासह घरी आले नाही. त्यामुळे घरातील इतर सदस्यांनी शेततळ्याजवळ जाऊन पाहिले असता तिघांचे मृतदेह शेततळ्यात आढळून आले. घटनेची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरली. शेजारी आणि गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती पंढरपूर ग्रामीण पोलिसांना देण्यात आली. घटनेची माहिती मिळतात घटनास्थळी पोलीस दाखल झाले. विजय लोंढे, प्रियांका लोंढे आणि ५ वर्षांच्या प्रज्वलचा मृतदेह शेततळ्यातून बाहेर काढण्यात आला. तिघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले आहे.

शेततळ्यात पाण्याचा अंदाज न आल्याने पती-पत्नी आणि लहान मुलाचा बुडून मृत्यू झाला असावा असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या घटनेचा अधिक तपास पंढरपूर तालुका पोलीस करत आहे. या घटनेमुळे गावावर मात्र शोककळा पसरली आहे.




CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूलमध्ये डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

डॉ. आंबेडकर मेमोरियल फंड समिती जिल्हा सोलापूर संचलित डॉ. आंबेडकर मेमोरियल हायस्कूल डॉ.आंबेडकर मेमोरियल नाईट हायस्कूल सोलापूर मध्ये महापरिनिर्वाण दिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष भागवत सरवदे हे होते. व्यासपीठावर संस्थेचे सचिव प्रवीण निकाळजे, स्कूल कमिटी चेअरमन बबन साबळे, दिवस प्रशालेच्या मुख्याध्यापिका संतोषी साबळे, नाईट प्रशालेचे मुख्याध्यापक सतीश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले प्रास्ताविक दिवस प्रशालेचे मुख्याध्यापिका संतोषी साबळे यांनी केले. विद्यार्थ्यांची समयोचित भाषणे झाली. शिक्षक प्रतिनिधी अनिल कट्टीमनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विश्वनाथ कुलकर्णी यांनी केले. आभार मीना कोळी यांनी मानले.




### सुमतीबाई स्कूलमध्ये हस्ताक्षर, वक्तृत्व, चित्रकला व भित्तीचित्रे स्पर्धा

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

श्राविका संस्थेचे विश्वस्त रतनचंद शहा यांच्या जन्मजयंतीनिमित्त पद्मश्री सुमतीबाई इंग्लिश मिडीयम हायस्कूलच्या वतीने विविध प्रकारच्या आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हस्ताक्षर, वक्तृत्व, चित्रकला व भित्तीचित्रे बनविणे या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी शहरातील विविध शाळांमधील ७०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. प्रारंभी श्राविका संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा यांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करुन व दीपप्रज्वलन करुन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांच्या समवेत हायस्कूलच्या मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे, प्री-प्रायमरीच्या समन्वयक अर्चना अक्कलकोटे, प्रायमरी विभागाच्या पर्यवेक्षिका कल्पना रामावत उपस्थित होते. स्पर्धेचे शिस्तबद्ध पध्दतीचे नियोजन संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा यांच्या नेतृत्वाखाली व शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती कांबळे तसेच स्पर्धा प्रमुख सिध्दराय मेत्री व सुनिता आळंगे यांच्या मार्गदर्शनाखाली केले होते.



### डॉ. बाबासाहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा : वाघमारे

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र देणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशासाठी, समाजासाठी दिलेले योगदान पाहता त्याचा आदर्श आपण सर्वांनी डोळ्यासमोर ठेवला पाहिजे, असे प्रतिपादन भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शंकर वाघमारे यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष वाघमारे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारत भाऊ सुतकर, परमेश्वर माने, रमेश गोडसे, उल्हास माने, रईस पठाण, संतोष नामदे, तुकाराम भानवसे, विकास कोकाटे, रमेश भानवसे, गोरख भानवसे, ग्राम विकास अधिकारी लोखंडे मॅडम, जीलानी पठाण, अविनाश मोकाशी, सुभाष भानवसे, तानाजी सुतकर, सुभाष सुतकर, वसंत भानवसे, नागनाथ साळवे, बलभीम भानवसे, राजेंद्र भानवसे, विठ्ठल वाघमारे, बाळासो सरवदे, शाम सुतकर, कुबेर कोळी, चांद मुजावर, धंनजय भानवसे, कय्युम मुजावर, सुहास भानवसे आदींची उपस्थिती होती.

### 'स्वेरी'मध्ये आज अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरचे उद्घाटन

**दिल्ली येथील मान्यवरांची उपस्थिती राहणार**

**पंढरपूर, दि. ८ डिसेंबर-**

येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये मंगळवारी (दि. ०९) अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर (एसीआयसी) चे उदघाटन होणार आहे अशी माहिती प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली. स्वेरी कॅम्पस मध्ये मंगळवारी सकाळी ०८:१५ वाजता अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर (एसीआयसी) चे उदघाटन होणार आहे. यासाठी अटल इनोव्हेशन मिशन कार्यक्रम प्रमुख प्रतीक देशमुख, अटल इनोव्हेशन मिशनचे नावीन्यपूर्ण उपक्रम प्रमुख वितस्ता तिवारी तसेच व्हील्स ग्लोबल फाउंडेशनचे महेश वैद्य आणि सौ. सुजाता नरसिंहन हया देखील या समारंभाला उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी हे असणार आहेत तर सोबस इनसाईट फोरमचे दिग्विजय चौधरी, अटल इनोव्हेशन मिशनचे दीपाक्षी जिंदाल आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदरचे केंद्र हे अटल इनोव्हेशन मिशन (एआयएम), निती आयोग, भारत सरकार समर्थित आहे. तरी या अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटरच्या उदघाटन कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. याद्वारे उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी सुविधा व विविध उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. हा संशोधन आणि विकासाचा एक भाग आहे. यासाठी कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. हर्षवर्धन रोंगे हे काम पाहत आहेत.

# शताब्दी वर्षात संघ सर्वस्पर्शी व्हावा

## सहसरकार्यवाह अतुल लिमये यांची अपेक्षा

### धरमपेठ भागात जनसंगोष्ठी कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, दि. ८ डिसेंबर-**

संघ शताब्दी वर्षात असून, संघ कार्याची आगामी दिशा काय? तर संघ सर्वस्पर्शी झाला पाहिजे, या दृष्टीने कार्य करायचे आहे. व्यक्तीनिर्माण एका दिवसात होत नाही. ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संघाच्या दृष्टीने वातावरण अनुकुल आहे, पण समाज परिवर्तनासाठी आचरण महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन सहसरकार्यवाह अतुल जी लिमये यांनी केले. आचरण सुधारत नाही, तोपर्यंत परिवर्तन स्थायी राहणार नाही. आचरणातील सकारात्मक बदल तात्पुरते ठरू नयेत. परिवर्तनासाठी संस्कारांची आवश्यकता असून मोठे कार्यक्रम हे कार्यातील अडसर ठरू नयेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षानिमित्त समाज जीवनावर प्रभाव असलेल्या प्रमुख नागरिकांच्या जनसंगोष्ठीचे आयोजन नागपुरातील धरमपेठ भागाच्या वतीने करण्यात आले होते. या संगोष्ठीमध्ये अतुल जी लिमये यांनी 'समाज परिवर्तनाची दिशा' या विषयावर विचार मांडले. २६ नोव्हेंबरला संध्याकाळ चिटणवीस सेंटर पार पडलेल्या कार्यक्रमाला विदर्भ प्रांत संघचालक दीपक जी तामशेट्टीवार, नागपूर महानगर संघचालक राजेश जी लोया व धरमपेठ भाग संपर्क प्रमुख आशुतोष जी फडणवीस व्यासपीठावर उपस्थित होते.

शताब्दी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून समाजात सद्भावना निर्माण करण्याच्या दृष्टीने समाजातील विभिन्न जातीप्रमुखांची बैठकही आयोजित करण्यात येणार आहे. जेणेकरून सारा भारत समाज हितसाठी एका दिशेने कार्यरत व्हावा, असे अतुलजींनी भाषणाच्या सुरवातीला सांगितले.

संघ, भारत आणि हिंदू समाज टेकऑफच्या स्थितीत असून संघाप्रती समाजात उत्सुकता आणि आदराची भावना निर्माण झाली आहे. भारत आत्म निर्भर आणि समृद्ध झाला आहे. स्वतः ला हिंदू म्हणवून घेण्यात हिंदूंना अभिमान वाटू लागला आहे, असे सांगत भारताची आर्थिक समृद्धी म्हणजे विकास का? असा प्रश्न अतुलजींनी उपस्थित केला. भारताचा अमेरिका होणे अपेक्षित नसून विकसित भारत घडणे महत्त्वाचे आहे, असे सांगत विकसित भारताचा मार्ग निश्चित करणे या दृष्टीने संघाची भूमिका महत्त्वाची असल्याचे अतुल म्हणाले. भारत हा वैविध्यपूर्ण देश असून हिंदुत्वाच्या धाग्यात तो ओवलेला आहे. हा धागा तुटला तर देश निखळेल. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया




आहे. समाजात अनेक समस्या असून संघटित समाजासाठी व्यक्तीनिर्माण महत्त्वाचे आहे. भारतभरात ८७ हजार शाखा आहेत. २५ हजार मासिक मीलन शाखा असल्याचे सांगत मिझोराम, नागालँड व काश्मीर घाटीचा अपवाद वगळता सगळ्या तालुक्यांमध्ये शाखांचा विस्तार असल्याचे अतुलजींनी सांगितले. कार्याची निरंतर आठवण राहावी व शतप्रतिशत कार्यविस्ताराच्या दृष्टीने वाटचाल झाली पाहिजे, असे अतुलजींनी सांगितले. संघाला केवळ भौगोलिक विस्तार अपेक्षित नसून सर्वस्पर्शी विस्तार झाला पाहिजे, सध्याचा काळ संघासाठी अनुकुल असून, प्रतिकुलतेपेक्षा अनुकुलतेच्या समस्या वेगळ्या असतात, असेही त्यांनी नमूद केले. अहंकार आणि आळस त्यागून कार्य केले पाहिजे, असे ते म्हणाले.

सध्याचा काळ नॅरेटिव्ह वॉरचा आहे. गोंडी हा वेगळा धर्म आहे. लिंगायत हा वेगळा धर्म आहे, असा भ्रम समाजात पसरवला जात आहे. यासाठी काही शक्ती कार्यरत आहेत. दक्षिण भारतात 'कटिंग साऊथ सेमिनार'सारख्या संस्था कार्यरत होत आहेत. याला काऊंटर करण्यासाठी राष्ट्रहित जाणणारा विमर्श तयार करणे महत्त्वाचे आहे. अॅकॅडेमिक, इंटलेक्युअल व पॉप्युलर या तीन पातळ्यांवर नॅरेटिव्ह पसरवणे सुरू असून, याविरोधात आपली राष्ट्रीय इको सिस्टिम तयार करीत ही वैचारिक लढाई लढायची आहे. समाजाच्या प्रश्नांना उत्तर शोधताना स्वबोध महत्त्वाचा असायला हवा. रॅडिकल इस्लामला आक्रमक भाषण हे उत्तर नाही असे सांगत राजकीयदृष्ट्या वामपंथ संपला असला तरी सांस्कृतिक माध्यमातून तो कार्यरत आहे. जंगलातील नक्षलवाद संपला तरी शहरातून त्यांच्या हालचाली वाढणार आहेत. सौंदर्य प्रसाधन आणि तेलाचा बाजार काबीज करण्याचे प्रयत्न यापूर्वी झाले असून, ग्लोबल मार्केट फोर्सेस सर्वच क्षेत्रात कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. या साऱ्याला काऊंटर करण्यासाठी स्थायी व्यवस्था उभारायची आहे, हे केवळ एका संघटनेचे कार्य नाही. समाजातील सारी सज्जनशक्ती मिळून हे कार्य करू शकते. धार्मिक संस्था, मंदिरे, संप्रदाय, भजनी मंडळे, जाती व्यवसाय, सोसायटी, कॉलनी, सांस्कृतिक, कला, क्रीडा, साहित्य, योग, शिक्षण, सेवा क्षेत्र अशा साऱ्या संस्थांच्या माध्यमातून राष्ट्रीय विचारांवर एकत्रित कार्य उभे राहिले पाहिजे. समाज परिवर्तनासाठी नेटवर्किंग उभे राहिले पाहिजे. धर्माधारीत व्यवस्था निर्माण व्हावी. धर्म म्हणजे पूजा व्यवस्था नव्हे. समाजातील असा आदरणीय वर्ग असे केंद्र जे समाजनीती ठरवतील, शासनालाही मार्गदर्शन करतील, तेव्हाच स्वावलंबी, समर्थ भारत निर्माण होईल, ही बाब अतुलजींनी अधोरेखित केली. आजच्या काळात परंचपरिवर्तनाचे महत्त्वही त्यांनी स्पष्ट केले. दीपप्रज्ज्वलनाने व भारत माता पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर अनिरुद्ध देशपांडे यांचे वंदेमातरम् झाले.

सूत्रसंचालन ब्रीज सारडा यांनी केले. भाषणानंतर श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांनी अतुल लिमये यांनी समर्पक उत्तरे दिली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

# महात्मा फुले जनआरोग्य योजनेत १ हजार ३५६ उपचार मोफत

## सर्वसामान्यांसाठी गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवेची हमी : जिल्हा समन्वयक गुंजाळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रियांचा लाभ मिळत आहे. या योजनेत प्रति कुटुंब प्रति वर्ष रु. ५ लक्ष पर्यंतचे विमा संरक्षण उपलब्ध असून १ हजार ३५६ प्रकारच्या उपचारांचा समावेश आहे.

मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी स्वतंत्रपणे रु. ४.५ लक्ष पर्यंतचे संरक्षण दिले जाते. तसेच रस्ते अपघातग्रस्तांना प्रति व्यक्ती, प्रति अपघात रु. १ लक्ष पर्यंतचा लाभ मिळतो, अशी माहिती या योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ यांनी दिली आहे. शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत राज्यातील शिधापत्रिका धारक, अधिवास प्रमाणपत्रधारक, बांधकाम कामगार, पत्रकार, अपंग, अनाथ आश्रम व वृद्धाश्रमातील रहिवासी, तसेच महिला व बालविकास विभागाच्या वसतिगृहातील लाभार्थ्यांना मोफत व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली जात आहे. या योजने अंतर्गत कॅन्सर, हृदयविकार, यकृत व मूत्रपिंड विकार, मेंदू व मज्जासंस्था, नवजात बालकांचे आजार, अपघातातील शस्त्रक्रिया, हाडांचे विकार, स्त्रीरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा विकार, फुफ्फुस व पचनसंस्थेचे आजार, मानसिक आजार हृदयविकारासंबंधीत शस्त्रक्रिया एन्जोप्लास्टी बायपास सर्जरी व किडनी संदर्भातील मुतखडे प्रोस्टेट ग्रंथीचे आजार व डायलिसिस अशा १,३५६ उपचारांचा लाभ घेता येतो. योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड, शिधापत्रिका, अधिवास दाखला, ओळखपत्र, शाळा दाखला किंवा पत्रकारिता आयोगाचा दाखला आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी www.jeevandayee.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा १५५३८९ / १८००२३३२२०० या नि:शुल्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन गुंजाळ यांनी केले.



### शिवणी येथे मोफत नेत्रतपासणी शिबिरात ८० रुग्णांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

मौजे शिवणी (ता.उत्तर सोलापूर) येथे युगंधर फाऊंडेशन आणि शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्ररोग तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालय येथे भरलेल्या या शिबिराला स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिराचे उद्घाटन युगंधर फाऊंडेशनच्या अध्यक्षा प्रा. रेश्मा माने व शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाचे डॉ. महेश पवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला सरपंच प्रियांका खळसोडे,समाधान गुंड, सचिन गुंड, शशिकांत खळसोडे तसेच पाकनी आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका मनीषा विनीवाले, आरोग्य सेवक सुधाकर कांबळे, आशा सेविका अनिता ढवळे, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. शिबिरात ८० नेत्ररुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून त्यांना बाळ्या येथे नव्याने सुरू झालेल्या शंकरशेठ साबळे मित्र रुग्णालयात पुढील उपचारासाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. शंकर साबळे नेत्र रुग्णालयाचे आभार मानले.




### प्रश्नमंजुषा स्पर्धेत महावीर हायस्कूलचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

भगवान महावीर अध्ययन केंद्र व श्री भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय सोलापूर येथे आयोजित अहिंसा तत्वज्ञान प्रश्न मंजुषा स्पर्धेत महावीर हायस्कूल च्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक संपादिला.

या स्पर्धेत माध्यमिक गटातून महावीर हायस्कूलच्या विद्यार्थीनी अनन्या गडकरी, अक्षता बेरे, स्मरणिका सुतार व आर्या शेंडगे यांनी ही कामगिरी केली. त्यांचे मुख्याध्यापिका उज्वला पाटील व सहशिक्षक विजय पाटील, संजय बिडवई, राजेंद्र खोत, बसवराज बिराजदार, मनीषा निनगुरकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी दीपक चौधरी, आनंद कोटे, महेश म्हंता, मोहन साळुंखे यांनी अभिनंदन केले.

### सोमेश्वर प्रशालेत क्रीडा सप्ताहास सुरवात



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

हत्तूर येथील श्री सोमेश्वर हायस्कूल येथे आंतर शालेय क्रीडा स्पर्धेचे उद्धाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक निंगप्पा शिवयोगी होते. प्रशालेचे माजी विद्यार्थी ओंकार काळे संदीप काळे व राम कुंभार यांची नुकतीच एम.एस.एफ मध्ये निवड झाली असून त्यांचा प्रशालेच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यांच्या हस्ते क्रिकेटच्या सामन्याचे उदघाटन करण्यात आले. संजना राठोड यांनी क्रीडा शपथ घेतली आंतरशालेय क्रीडा स्पर्धेचे नियोजन प्रशालेचे क्रीडाशिक्षक विकास खुने यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर बिराजदार यांनी केले आभार गुरूबसप्पा अचलेरे यांनी मानले.



### विचारक्रांतीतर्फे महामानवास अभिवादन

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

विचारक्रांती बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरीनिर्वाण दिनानिमित्त आंबेडकर चौक येथे हजारो भीमअनुयायांना चहाचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक सुरज जगधने, सचिव राहुल शिवशरण, खजिनदार नागसेन बंगाळे, पत्रकार विजयकुमार उघडे, तुषार साबळे, उत्कर्ष माने, हरीश इंगळे, निलेश शिरसे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियातर्फे महापरिनिर्वाण दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील बाबासाहेब यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महापरिनिर्वाण दिनानिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, डेमोक्रॅटिक माजी आमदार टी.एम. कांबळे गटच्या वतीने शहराध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.



यावेळी जिल्हाध्यक्ष सिद्राम ढोबळे, कुंदन गायकवाड, करण गजधाने, किशोर गायकवाड, सचिन चौगुले, रोहित गायकवाड, संजू सुरवसे, अर्जुन टिक्के, सागर सरवदे, दशरथ कझाकवाले, विजय दांडुरे उपस्थित होते.

# शुध्द देशी गोवंश सन्मान योजनेच्या प्रस्तावासाठी १० डिसेंबरपर्यंत प्रस्ताव सादर करा

### डॉ. विशाल येवले यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत गोशाळा व गोवंश संवर्धनाचे काम करणाऱ्या संस्था व पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने 'महाराष्ट्र शुद्ध देशी गोवंश सन्मान योजना' जाहीर केली आहे. या योजनेंतर्गत जिल्हास्तरीय पुरस्कारांसाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव १० डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. विशाल येवले यांनी केले आहे.

**प्रस्ताव सादर करण्याचे ठिकाण**

इच्छुक व पात्र संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांसह आपले प्रस्ताव दि. १० डिसेंबरपर्यंत जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय कार्यालय, सोलापूर' येथे सादर करावेत. अर्जाचा नमुना आणि अधिक माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. विहित मुदतीनंतर आलेले प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र संस्था व गोपालकांनी या योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन डॉ. विशाल येवले यांनी केले.

महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत सन २०२५-२६ या वर्षापासून दरवर्षी ही योजना राबविण्यात येत आहे. राज्यात शुद्ध देशी गोवंशाचे संवर्धन, संरक्षण आणि कल्याण करणाऱ्या संस्था व व्यक्तींच्या कार्याचा गौरव करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेअंतर्गत जिल्ह्यासाठी एकूण दोन पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यामध्ये पहिला पुरस्कार: आयोगाकडील नोंदणीकृत गोशाळांमधून एका गोशाळेची निवड केली जाईल. तर दुसरा पुरस्कार: शासकीय/खाजगी गोवंश संवर्धन संस्था, गोवंश प्रक्षेत्रे, कृषी विद्यापीठे, पशुवैद्यक विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्र, शेतकरी पशुपालक समूह गट किंवा वैयक्तिक गोपालक यांच्यातून एकाची निवड केली जाईल.

निवड झालेल्या संस्थांना प्रजासत्ताक दिनी (२६ जानेवारी) सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येईल. या पुरस्कार निवडीसाठी संस्थेचे किंवा व्यक्तीचे मागील पाच वर्षांतील कार्य पाहिले जाईल. यामध्ये आत्मनिर्भर गोशाळा, शुद्ध गोवंश पैदास, प्राकृतिक शेतीचा प्रसार, गो-उत्पादनांची निर्मिती, आणि बायोगॅस/सौरऊर्जा वापर यांसारख्या विविध निकषांवर गुणांकन केले जाईल.



### महापरिनिर्वाण दिनानिमित्त बुध्दराष्ट्र संस्थेतर्फे रक्तदान शिबीर

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बुद्धराष्ट्र सामाजिक संस्थेच्या वतीने रक्तदान शिबीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आयोजित करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामुहिक बुद्धवंदना घेण्यात आली. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार विजयकुमार देशमुख मालक, भाजपा निरीक्षक रघुनाथ कुलकर्णी भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर भाजपा सरचिटणीस प्रा. नारायण बनसोडे, बुद्धराष्ट्र संस्थेचे संस्थापक अजित गादेकर, अजित गायकवाड, वंदना गायकवाड, रंजिता चाकोते, अरुण भालेराव, राजाभाऊ काकडे उपस्थित होते. शिबिरात १७४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी बुद्धराष्ट्र सामाजिक संस्थेचे संयोजक संजय बनसोडे, प्रमोद चंदनशिवे, अमोल सोनवणे, शांतकुमार साबळे, प्रा. प्रशांत गायकवाड, सचिन कांबळे उत्सव अध्यक्ष महादेव खराटे, विजय गादेकर, अमोल शिंदे, संजू बनसोडे,, सुहास साबळे, अवि गायकवाड, रोहन गायकवाड, मॅडी सरवदे, सोहन शिवशरण, मल्लेश घागरे, विशाल चंदनशिवे, निलेश गादेकर, अंजिक्य कांबळे, राजन जेठीथोर, अजय प्रक्षाळे, आदित्य चंदनशिवे, आप्पा कांबळे, शुभम जगताप, आकाश शिंदे, मनोज जाधव, अजय प्रक्षाळे, बाळू साबळे, भैय्या चौधरी यांनी परीश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### चेंगराचेंगरीनंतर अभिनेता विजयची आज पहिली रॅली



**पुडुचेरी :** तमिळनाडूतील करूर येथे झालेल्या चेंगराचेंगरीनंतर अभिनेता आणि प्रमुख विजय पहिल्यांदाच रॅली घेणार आहेत. पोलिसांनी ९ डिसेंबर रोजी पुडुचेरीमध्ये कडक सुरक्षा नियमांसह रॅलीला परवानगी दिली आहे. क्यूआर कोडने रॅलीत प्रवेश मिळेल आणि केवळ ५००० लोकांना सहभागी होण्याची परवानगी आहे. प्रशासनाने रोड शोला परवानगी दिलेली नाही. पुडुचेरी पोलिसांनी उप्पलम एक्स्पो ग्राउंडवर होणाऱ्या या सभेत प्रवेश केवळ पक्षाने जारी केलेल्या क्यूआर कोड पासच्या आधारावर देण्याचे आदेश दिले आहेत. रॅलीत विजय सकाळी १० ते १२ या वेळेत व्हॅनमधून भाषण देणार आहेत. पोलिसांनी हे देखील स्पष्ट केले आहे की, विजयच्या कार्यक्रमात कोणत्याही प्रकारचा रोड शो होणार नाही आणि केवळ नियंत्रित जनसभेला परवानगी आहे.

### ऑस्ट्रियाच्या शिखरावर थंडीने गोठून महिलेचा मृत्यू

**व्हिएन्ना :** ऑस्ट्रियातील सर्वात उंच पर्वत ग्रॉसग्लॉकनरवर ३३ वर्षीय कर्स्टिन गर्टनर या महिलेचा थंडीने गोठून मृत्यू झाला. न्यूयॉर्क पोस्टनुसार, कर्स्टिन साल्जबर्गची रहिवासी होती आणि सोशल मीडियावर स्वतःला विंटर चाइल्ड आणि माउंटन पर्सन म्हणत असे. ती तिचा प्रियकर थॉमस प्लामबेर्गरसोबत चढाईसाठी गेली होती. थॉमस ३९ वर्षांचा असून एक अनुभवी पर्वतारोहण मार्गदर्शक आहे. अहवालानुसार, दोघांनी आपली चढाई दोन तास उशिरा सुरू केली आणि वर पोहोचता पोहोचता हवामान खूपच खराब झाले. शिखरापासून सुमारे १५० फूट खाली कर्स्टिन खूप थकून गेली होती, तिचे शरीर थंडीने बधीर होऊ लागले होते आणि ती गोंधळलेली दिसत होती. त्या स्थितीत तिला टाकून प्रियकर निघून गेला. बचाव पथक तिच्यापर्यंत पोहोचण्याआधीच तिचा मृत्यू झाला होता

### बिनशेतीच्या अहवालासाठी २० हजारांची घेतली लाच

**पंढरपूर :** शेतजमिनीचे बिनशेतीकरण करण्यासाठी आवश्यक असलेला भूसंपादन नसल्याचा अहवाल तहसील कार्यालयास पाठविण्याच्या मोबदल्यात २० हजार रुपयांची लाच स्वीकारल्याप्रकरणी पंढरपूर तालुक्यातील खर्डी मंडळाचे मंडळ अधिकारी दिलीप दिगंबर सरवदे (वय ५६) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या प्रकरणात तुकाराम आसबे (वय ४५, रा. तावशी) या खासगी एजंटचीही भूमिका उघडकीस आली असून त्याच्याविरुद्धही गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. तक्रारदार यांनी प्रांत कार्यालय, पंढरपूर येथे शेतजमिनीचे बिनशेती करण्यासाठी अर्ज सादर केला होता. या अर्जाची चौकशी करून भूसंपादन नसल्याचा अहवाल तहसील कार्यालयास पाठविण्यासाठी आरोपी मंडळ अधिकारी सरवदे यांनी सुरुवातीला ५ हजार रुपये स्वीकारल्याचे मान्य केले होते. त्यानंतर उर्वरित २० हजार रुपयांची मागणी करण्यात आली.या तक्रारीची दि. १९ नोव्हेंबर २०२५ रोजी पडताळणी करण्यात आली असता, खासगी इसम तुकाराम आसबे याने मंडळ अधिकारी सरवदे यांच्यासाठीच लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दि. ८ डिसेंबर २०२५ रोजी रचलेल्या सापळ्यात आरोपी सरवदे यांनी स्वतः २० हजार रुपयांची लाच स्वीकारली आणि त्याच वेळी एसीबीच्या पथकाने त्यांना रंगेहात अटक केली. शिरीष सरदेशपांडे (पोलीस उपायुक्त / अधीक्षक, एसीबी पुणे) व अजित पाटील (अपर पोलीस अधीक्षक) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक प्रशांत चौगुले, पोलीस निरीक्षक रविंद्र लांभाते व पोलीस नाईक संतोष नरोटे, पोकों गजानन किलगी, चापोह राहूल गायकवाड या टीमने कारवाई केली.



आठ दिवस चालणाऱ्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. छायाचित्रकारांच्या विनंतीनंतर पोज देताना मंजुळा गावित, अनुराधा चव्हाण, श्वेता महाले, विद्या ठाकूर आणि राज्यमंत्री माधुरी मिसाळ

# १५ तारखेपर्यंत रद्द तिकिटांचा पूर्ण परतावा मिळणार

## इंडिगोची घोषणा, कोणतेही शुल्क लागणार नाही

**नवी दिल्ली, ८ डिसेंबर**

३ ते १५ डिसेंबरपर्यंत रद्द झालेल्या तिकिटांची पूर्ण रक्कम परत केली जाणार आहे, अशी महत्वाची घोषणा इंडिगो प्रशासनाने सोमवारी केली आहे. तिकिटांची परतावा प्रक्रिया सुरू केली असून रद्द केलेल्या अथवा तिकीट बदलल्यास कोणतेही शुल्क लागणार नसल्याचे कंपनीने म्हटले आहे.

गेल्या काही दिवसांपासून प्रवाशांना जो त्रास होत आहे त्याबद्दल आम्ही दिलगीर आहोत. लवकरच सर्वकाही सुरळीत होईल. प्रवाशांना आर्थिक त्रास होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे, असे इंडिगोने म्हटले आहे.

दरम्यान नागरी उड्डयण मंत्रालयाच्या सक्तीनंतर इंडिगोने हे पाऊल उचलल्याचे मानले जात आहे. इंडिगोने आतापर्यंत ९.५ लाख तिकिटांचे जवळपास ८२७ कोटी रुपये परत केले असल्याचे उड्डयन मंत्रालयाने म्हटले आहे.




#### इंडिगोने सरकारला अंधारात ठेवलेः उड्डयण मंत्री

दरम्यान नागरी उड्डयन मंत्री राममोहन नायडू यांनी इंडिगोवर मोठा आरोप केला आहे. कंपनीने शासकीय नियमांना कधी गंभीरतेने घेतलेच नाही. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. इंडिगोने सरकारला अंधारात ठेवले असून अशी कडक कारवाई केली जाईल की अन्य कंपन्यांसाठी हा धडा ठरेल, असा इशारा नायडू यांनी दिला आहे. नायडू यांनी सोमवारी राज्यसभेत इंडिगो संकटावर सरकारची भूमिका स्पष्ट केली. (वृत्तसंस्था)

#### ५०० उड्डाणे रद्द

इंडिगोने सोमवारी ५०० उड्डाणे रद्द केल्याची माहिती नागरी उड्डयन मंत्रालयाने दिली. नऊ हजार प्रवाशांपैकी साडेचार हजार प्रवाशांना त्यांच्या बॅग्ज वापस केल्याचे आहेत. उर्वरित बॅग्ज पुढील ३६ तासांत परत करणार असल्याचे मंत्रालयाने निवेदनात म्हटले.

# कामकाज कमी दिवसांचे का?

## विरोधकांचा सरकारला घेरण्याचा प्रयत्न

## मुख्यमंत्री फडणवीस-नाना पटोले यांच्यात खडाजंगी








**नागपूर, ८ डिसेंबर**

उपराजधानती सुरू झालेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या कालावधीवरून कामकाजच्या पहिल्याच दिवशी काँग्रेसचे नेते आमदार नाना पटोले व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. नागपूर येथील हिवाळी अधिवेशन आपल्या मुख्यमंत्री पदाच्या कालावधीत सर्वाधिक काळ चालवले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार नाना पटोले यांना सुनावले.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजची सोमवार पासून सुरुवात झाली. कामकाज सुरु असताना सभागृहाच्या कामकाज पत्रिकेनुसार वित्त मंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुरवणी मागण्या सादर केल्या. यावर मुद्दा उपस्थित करून आमदार नाना पटोले यांनी नागपूर कराराप्रमाणे हिवाळी अधिवेशनाचा कालावधी कमी असून किमान २ आठवडे करावे अशी मागणी केली. त्याच बरोबर पहिल्याच दिवशी सरकार पुरवणी मागण्या आणि विधेयके मांडून पळून जाण्याची घाई करत असल्याचा आरोप नाना पटोले यांनी राज्य सरकारवर केला.

परंतु आमदार नाना पटोले यांची आक्रमक भूमिका पाहता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाना पटोले यांना त्यांच्या विधानसभा अध्यक्ष पदाच्या कालावधीत झालेल्या अधिवेशनाच्या कालावधीची आठवण करून दिली. तुम्ही केवळ ३ ते ४ दिवस अधिवेशन घेतले आणि अन्य राज्यांनी २० दिवस अधिवेशन घेतल्याचे यावेळी सांगितले. आपल्या काळात सर्वाधिक काळवळी अधिवेशन घेण्यात आले असल्याची आठवण करून देत नियमानुसार अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मंजूर करणारे अनेक शासकीय विधेयक आणि पुरवणी मागण्या मांडल्या जातात. त्यानंतर त्यावर चर्चा घडवून मंजूर केल्या जात असल्याचे सांगत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता कधीही जाहीर होऊ शकते. त्यामुळे या सर्व घडामोडी पाहता अधिवेशनाचा कालावधी निश्चित केला असल्याचे सांगत पुढील वेळी निश्चित योग्य कालावधीत हिवाळी अधिवेशन घेतले जाईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. (तभा वृत्तसेवा)

#### विधानसभा अध्यक्षांचा हस्तक्षेप


पटोलेंनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, नाना पटोले तुम्ही यापूर्वी पीठासीन अधिकारी म्हणून काम केले आहे. सभागृहात होणाऱ्या कामकाजाची बीएसईमध्ये चर्चा केली जाते. त्यावेळी सहमताने निर्णय घेतला जातो. पण तुम्ही यावेळी बीएसईला उपस्थित नव्हता. त्याची कारणे काही वेगळी असतील. परंतु, बीएसईमध्ये यासंदर्भात सर्वांच्या संमतीने निर्णय घेण्यात आला आहे, असे नार्वेकरांनी म्हटले.

# ज्येष्ठ समाजवादी नेते बाबा आढाव यांचे निधन

**पुणे, ८ डिसेंबर**

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा शेतकरी आणि कामगार नेते बाबा आढाव यांचे सोमवारी आज रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते.

बाबा आढाव मागील काही महिन्यांपासून आजार होते. त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दोन दिवसांपूर्वी शरद पवार यांनी पूना हॉस्पिटलमध्ये भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली होती.



बाबा आढाव यांना गेल्या १० ते १२ दिवसांपासून पूना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अभिजित वैद्य व तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर आवश्यक ते उपचार सुरू होते. प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले होते. त्यांच्या जाण्याने कष्टकऱ्यांसाठी लढणारा, समाजवादी विचारांचा नेता महाराष्ट्राने गमावल्याची भावना व्यक्त होत आहे.

१९७० च्या दशकात डॉ. बाबा आढाव पुणे महापालिकेचे नगरसेवक होते. तत्कालीन समाजवादी पक्षाचे सदस्य होते आणि रिक्षा पंचायतीचे नेते म्हणूनही काम करत होते. ते 'एक गाव एक पाणवठा' मोहिमेचे प्रणेते होते. (वृत्तसंस्था)

# लक्ष-लक्ष दिव्यांनी उजळणार लाल किल्ला

**'दिवाळी'लाही युनेस्कोच्या वारसा यादीत स्थान?**

**दोन दिवसांत येणार निर्णय**

**भारतात प्रथमच युनेस्को समितीची बैठक**

**नवी दिल्ली, ८ डिसेंबर**

८ डिसेंबरपासून दिल्लीत सुरू होणाऱ्या आंतरसरकारी अमूर्त सांस्कृतिक वारसा २२ व्या सत्रात, युनेस्कोच्या मानवतेच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत दिवाळीचा समावेश होण्याची शक्यता आहे.

नामांकनाची तपासणी केल्यानंतर, १० डिसेंबर रोजी घोषणा अपेक्षित आहे. या यादीत भारतातील १५ घटक आधीच आहेत ज्यात दुर्गा पूजा, गरबा, कुंभमेळा आणि योग (२०१६) यांचा समावेश आहे. पहिल्यांदाच, भारत या समितीच्या बैठकीचे आयोजन करणार आहे, जे देशाच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा आणि समुदाय-आधारित संरक्षण उपक्रमांचे प्रदर्शन करण्यासाठी एक व्यासपीठ प्रदान करेल. सहा दिवसांचा हा कार्यक्रम १७ व्या शतकातील मुघल काळातील लाल किल्ल्याच्या परिसरात होत आहे.



दिल्लीतील लाल किल्ला आणि इतर सरकारी इमारती १० डिसेंबर रोजी दिवाळीच्या विशेष कार्यक्रमासाठी सजवल्या जात आहेत. सांस्कृतिक मंत्रालयाच्या सूचनेनुसार, प्रमुख ऐतिहासिक स्मारके आणि सरकारी इमारती दिव्यांनी उजळण्यात येतील. मुख्य कार्यक्रम लाल किल्ल्यावर आयोजित केला जाईल, तर चांदणी चौक परिसरात रांगोळी आणि आतषबाजीही होईल.

भारताने मार्च २०२४ मध्ये हा प्रस्ताव सादर केला असून, ९-१० डिसेंबर दरम्यान त्यावर निर्णय होण्याची अपेक्षा आहे. जर मंजुरी मिळाली, तर भारतात दिवाळीच्या सणास जागतिक मान्यता मिळेल आणि लाल किल्ला दिव्यांनी प्रकाशित होईल.

बैठकीत जिवंत वारसा संरक्षण सर्वोत्तम पद्धती आणि नाविन्यपूर्ण संरक्षण पद्धतींवर देखील चर्चा केली जाईल. समिती सदस्य, युनेस्को अधिकारी, तज्ञ, मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था आणि अभ्यासकांसह १८० हून अधिक देशांतील १,००० हून अधिक प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

#### भारतासाठी धोरणात्मक फायदे

या कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभाला केंद्रीय मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, युनेस्कोचे महासंचालक खालेद एल-एनानी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि भारताचे युनेस्कोतील राजदूत विशाल व्ही. शर्मा उपस्थित असतील. युनेस्कोच्या मते, या सत्रात सदस्य राष्ट्रांनी सादर केलेल्या नामांकनांची तपासणी, विद्यमान घटकांचा आढावा आणि अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय समर्थन प्रदान केले जाईल. केंद्रीय संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत म्हणाले की, बैठकीचे आयोजन भारतासाठी अनेक धोरणात्मक आणि राजनैतिक फायदे प्रदान करते आणि युनेस्कोसोबतचे त्याचे सहकार्य मजबूत करते.

# शेगावात बनावट नोटांचा सुळसुळाट

**शेगाव, ८ डिसेंबर**

शहरात पुन्हा बनावट नोटांचा सुळसुळाट वाढू लागला आहे. दिवाळीच्या गर्दीत या ५०० रुपयांच्या बनावट नोटा मोठ्या प्रमाणात बाजारात फिरत असल्याचे वृत्तही आधीच समोर आले आहे. शहरातील आठवडी बाजारासह मुख्य व्यापारी पट्ट्यातील अनेक दुकाने याचे बळी ठरत आहे. नामांकित जगदीश ट्रेडिंग कंपनीमध्ये कोणीतरी ग्राहकाने ३ बीटी सिरीज - ५९७०९४ आणि ३ केक्यू - ८३०५१२ क्रमांकाच्या बनावट नोटा दिल्याचे उघड झाले. यामुळे शहरात खळबळ उडाली आहे.

संबंधित व्यापाऱ्यांनी सांगितले की, दिवाळीच्या गर्दीचा फायदा घेत ७ ते ८ बनावट ५०० रुपयांच्या नोटा त्यांच्या हातात आल्या. नोव्हेंबरमध्ये अशाच बनावट नोटा आढळल्या होत्या. व्यापाऱ्यांच्या मते, या प्रकरणात पोलिसांची भूमिका अत्यंत सुस्त असून, बाजारपेठेत बनावट नोटा सहजपणे फिरत आहेत. महाराष्ट्रात अलिकडेच सांगली, कोल्हापूर, नगर, छत्रपती संभाजीनगर आणि अकोला येथे मोठ्या प्रमाणावर बनावट नोटांचा आणि त्या बनवणाऱ्या टोळींचा पर्दाफाश झाला आहे. साहित्य, यंत्रणा आणि कोट्यवधींच्या नोटा जप्त करून अनेकांना अटक करण्यात आली असतानाही बाजारातील परिस्थिती बदलली नाही. दिवाळीच्या दिवसांत शेगाव शहरातील किराणा दुकाने, कापड दुकाने, औषध विक्रेते, बार ॲण्ड रेस्टॉरंट्स तसेच ई-सेवा केंद्रांमध्ये व्यापाऱ्यांची फसवणूक झाली आहे. (तभा वृत्तसेवा)

# धर्मेंद्र यांच्या वाढदिवशी हेमा मालिनी भावुक

**मुंबई :** अभिनेता धर्मेंद्र यांच्या निधनानंतर ८ डिसेंबरला त्यांचा जन्मदिवस कुटुंबीयांसाठी अतिशय जड राहिला. मुलगा सनी देओल, बॉबी, पुतण्या अभय आणि मुलगी ईशा अशा सर्वांनीच समाज माध्यमांवर यासंदर्भातील पोस्ट शेअर करत मन मोकळे केले. त्यातही हेमा मालिनी यांच्या भावना मनाला भिडणाऱ्या होत्या. त्यांनी धर्मेंद्र यांच्यासोबतचे काही जुने, आनंदी क्षण असणारे फोटो शेअर केले. त्यांनी लिहिले की, माझे प्रेमळ हृदय धरमजी, वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. तुम्ही मला सोडून गेल्यानंतर दोन आठवड्यांहून अधिक काळ लोटला आहे आणि मी तुटलेले मन घेऊन हळूहळू आयुष्यात पुन्हा उभे राहण्याचा प्रयत्न करते आहे. तुम्ही माझ्या हृदयात कायम माझ्यासोबत असाल, हे मला माहिती आहे.



# 'त्या'डॉक्टरांना चार दिवसांची कोठडी

**नवी दिल्ली, ८ डिसेंबर**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ १० नोव्हेंबर रोजी झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातील तीन डॉक्टर आणि एका मौलवीला आणखी चार दिवस एनआयए कोठडीत ठेवण्याचा आदेश येथील न्यायालयाने सोमवारी दिला. आरोपींमध्ये डॉ. मुझम्मिल गनी, डॉ. आदील राथर, डॉ. शाहिना सईद आणि मौलवी इरफान अहमद वागायचा समावेश आहे. २९ नोव्हेंबर रोजी दिलेल्या दहा दिवसांच्या एनआयए कोठडीची मुदत आज संपुष्टात आल्याने त्यांना प्रधान आणि सत्र न्यायाधीश अंजू बजाज चंदन यांच्या न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते.

# पुतीनच्या दौऱ्यानंतर झेलेन्स्की भारतात येणार?



**नवी दिल्ली, ८ डिसेंबर**

पुतिन यांच्या भेटीनंतर आता भारत राजनैतिक संतुलन राखण्याच्या प्रयत्नात आहे. एका वृत्तानुसार, पुढील महिन्यात युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांचा दिल्ली दौरा होण्याची शक्यता आहे, जो जानेवारी २०२६ मध्ये होऊ शकतो.

भारताने गेल्या वर्षीदेखील असा संतुलित धोरण अवलंबविले होते. जुलै २०२४ मध्ये पंतप्रधान मोदी मॉस्कोला भेट दिली आणि पुतिन यांची भेट घेतली; त्यानंतर ऑगस्टमध्ये युक्रेनला भेट दिली आणि झेलेन्स्की यांची भेट झाली. इंडियन आणि युक्रेनियन अधिकाऱ्यांमध्ये गेल्या काही आठवड्यांपासून चर्चा सुरू आहेत, तसेच दिल्लीने पुतिन यांच्या भेटीपूर्वीच झेलेन्स्की यांच्या कार्यालयाशी संपर्क साधला होता. याच कारणास्तव झेलेन्स्की यांनी पुतिन यांच्या दिल्ली भेटीला प्रतिसाद दिला नाही. युक्रेनियन राष्ट्राध्यक्षांचा दौरा अनेक घटकांवर अवलंबून आहे.

यामध्ये माजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची शांतता योजना, युद्धभूमीवरील परिस्थिती, युक्रेनमधील अंतर्गत राजकारण आणि झेलेन्स्की सरकारवर चालणाऱ्या भ्रष्टाचार प्रकरणांचा समावेश आहे. झेलेन्स्की यांचा भारत दौरा यापूर्वी १९९२, २००२ आणि २०१२ असा तीन वेळा झाला आहे.

युरोप पुतिन यांच्या दिल्ली भेटीवर बारकाईने लक्ष ठेवून होते. अनेक युरोपीय देशांनी भारताला युद्ध संपवण्यासाठी मॉस्कोला राजी करण्यासाठी आपला प्रभाव वापरण्याचे आवाहन केले आहे, परंतु दिल्लीने सातत्याने असे सांगितले आहे की संवाद आणि राजनयिकता हाच एकमेव मार्ग आहे. पंतप्रधान मोदी यांनी यावेळी म्हटले की भारत तटस्थ नाही, तर शांततेच्या बाजूने आहे. फेब्रुवारी २०२२ पासून रशियाने युक्रेनवर आक्रमण केले असून, त्यानंतर पंतप्रधान मोदी आणि झेलेन्स्की यांनी चार वेळा भेट घेतली आहे. मोदींनी झेलेन्स्की यांच्याशी किमान आठ वेळा फोनवर चर्चा केली आहे. (वृत्तसंस्था)

# भारतात उभारणार 'सुपर हर्क्युलस'चे देखभाल केंद्र

## टीएएसएल-लॉकहिड मार्टिनने केली पायाभरणी

**नवी दिल्ली, ८ डिसेंबर**

भारतीय वायुदलाचे सर्वांत विश्वासू आणि अवाढव्य मालवाहू विमान सी-१३० जे सुपर हर्क्युरलची देखभाल, दुरुस्ती भारतातच होणार आहे. टाटा ॲडव्हान्स सिस्टिम्स (टीएएसएल) आणि अमेरिकी कंपनी लॉकहिड मार्टिनने मेन्टेनन्स, रिपेयर ॲण्ड ऑव्हरहॉल (एमआरओ) सेंटरची सोमवारी पायाभरणी केली.

हा एक अत्याधुनिक एमआरओ प्रकल्प असेल, यात केवळ भारतीय वायुदलच नव्हे, तर भारत-प्रशांतमधील इतर देशांच्या विमानांची देखभाल व दुरुस्ती येथे केली जाईल.

या सेंटरमध्ये विमानाच्या संपूर्ण बॉडीची दुरुस्ती केली जाईल. या व्यतिरिक्त एव्हियोनिक्स तसेच शस्त्रास्त्र प्रणालींची देखभाल व दुरुस्ती केली जाईल तसेच जुन्या भागांचे आधुनिकीकरणही करणे शक्य होणार आहे. या माध्यमातून भारतीय अभियंते आणि तंत्रज्ञांना प्रशिक्षण मिळेल. लहान-मोठ्या पुरवठादारांना या माध्यमातून संधी मिळेल. हे सेंटर २०२६ च्या अखेरीस सज्ज होईल. २०२७ पासून सी-१३० जे विमानाच्या दुरुस्तीचे प्रत्यक्ष कार्य येथे सुरू होईल.




भारतासोबत आमचे संबंध ७० वर्षे जुने आहेत. भारतातील या एमआरओ केंद्राच्या माध्यमातून जगभरात चांगली सेवा दिली जाईल, असे लॉकहिड मार्टिनचे मुख्य कार्यकारी अधिकारी फ्रँक सेंट जॉन यांनी सांगितले. हा केवळ एक प्रकल्प नव्हे, तर भारताच्या आत्मनिर्भरतेचे उदाहरण आहे. यामुळे हजारो रोजगार तयार होतील. नवीन कौशल्य येईल आणि भारत आशियातील सर्वांत मोठे सी-१३० जेचे केंद्र होईल, असे टाटा ॲडव्हान्स सिस्टिमचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुकरण सिंह यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

#### विमाने अमेरिकेत पाठवण्याची गरज संपणार

मोठ्या देखभाल दुरुस्तीसाठी आता सी-१३० जे विमाने अमेरिकेत पाठवण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे पैसा आणि वेळ वाचेल. भारतीय वायुदलाची सज्जता वाढेल. या मुळे उच्च कौशल्यावर आधारित हजारो रोजगारांची निर्मिती होईल. भारत दुसऱ्या देशांमधील सी-१३० जे विमानांची देखभाल-दुरुस्ती करू शकेल. सी-१३० विमान जगातील सर्वांत शक्तिशाली आणि विश्वासू वाहतूक विमान आहे. भारतात पर्वताळ भाग ते समुद्र आणि बचाव ते विशेष मोहिमांमध्ये या विमानाने कामगिरी बजावली आहे.

# ऑस्ट्रेलियात जंगलाला भीषण आग, ५२ वणवे

**पर्थ :** ऑस्ट्रेलियात भीषण वणव्यांनी पुन्हा एकदा प्रचंड हाहाकार माजवला आहे. यात मोठ्या प्रमाणावर जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. आगीने दोन राज्यांना वेढा घातला असून आतापर्यंत सुमारे ४० घरे जळून खाक झाली आहेत.

यामध्ये एका अग्निशमन दलाच्या जवानाचा मृत्यू झाला. न्यू साउथ वेल्समधील बुलाहडेलाह शहराजवळ जंगलात लागलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्याच्या प्रयत्नात असताना त्याच्यावर झाड कोसळले आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. या दुर्घटनेत आणखी एक जवान गंभीर जखमी झाला असून त्याला वाचवता आले नाही.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# ‘इंडिगो’पेक्षा ‘इंडिया’ महत्त्वाचा

भारताची विविध क्षेत्रांतील गगन भरारी सारे जग विस्मयचकित होऊन पाहत असताना गेल्या आठवड्यात एक आक्रित घडले. इंडिगो नावाच्या विमान सेवेने सरकारी निर्देशांचे पालन करण्याच्या नावावर भारताची नागरी उड्डाण क्षेत्रातील भरारी एका झटक्यात जमिनीवर आणली. नागरी उड्डाण महासंचालनालयाचे निर्देश काय आहेत, त्यांचे पालन करण्यासाठी काय लागेल हे सारे इंडिगोला आधीपासून माहिती होते. तरीही त्यांनी त्या निर्देशांचे पालन थेट सक्ती झाल्यावर सुरू केले आणि त्यातून हे संकट उद्भवले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताचे प्रभावक्षेत्र विस्तारत असताना इंडिगोने साऱ्या जगात भारताची नाचक्की केली. विविध क्षेत्रांत विकास होत असताना त्याचा परिणाम म्हणून राष्ट्रांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमान सेवेचे क्षेत्र विस्तारत असते. तेच भारतात घडले. दीड-दोन दशकात एअर इंडियाला एकीकडे घरघर लागली आणि खाजगी विमान कंपन्या या क्षेत्रात उतरल्या. त्याचा फायदाही झाला. स्पर्धेमुळे सेवेचा दर्जा सुधारला आणि विमान वाहतुकीचे दर मर्यादित राहिले. खरे तर ही स्पर्धा कायम टिकवायला हवी होती. तसे झाले नाही. अनेक खाजगी कंपन्यांची विमान सेवा सुरू झाली तशी कालांतराने बंद पडली. एअर इंडियाचा तर जवळजवळ बॅण्डबाजा वाजला. मैदानात प्रामुख्याने उरली इंडिगो आणि दोन-चार किरकोळ कंपन्या. इंडिगोचा मार्केट शेअर ६० टक्क्यांच्या वर आहे. दीड हजारापैकी तब्बल सहाशे सेक्टर्समध्ये इंडिगोचा एकाधिकार आहे. एका अर्थाने भारतात इंडिगोची मक्तेदारी प्रस्थापित झाली. प्रवाशांना फारसे पर्याय उरले नाहीत. त्यामुळे अव्वाच्या सव्वा तिकिटाचे दर, खाद्यपदार्थांची विमानात विक्री, पायलट आणि अन्य कर्मचाऱ्यांकडून अल्प वेतनात अधिकाधिक काम करून घेणे, ग्राऊंड क्रूची वेठबिगारी, अधिकाधिक काळ विमाने हवेत ठेवणे, जेणेकरून अधिकाधिक सेक्टर्सपर्यंत पोहोचता येईल असे धोरण इत्यादी अनेक गोष्टी इंडिगोच्या व्यवस्थापनाने केल्या. त्यातून कंपनीचा नफा वाढला तर शेअर्सही वधारले. पण, अशा प्रकारचा एकाधिकार देशासाठी घातक असतो, याची दखल वेळेत घेतली गेली नाही. त्यामुळेच एका इंडिगोची सेवा ठप्प झाली तर साऱ्या देशाची सेवा बंद पडल्याचे आपण पाहिले. विकेंद्रित झालेल्या क्षेत्रात खरे तर असे घडता कामा नये. टेलिकॉम, बँकिंग, एफएमसीजी इत्यादी क्षेत्रातील विकेंद्रीकरणाचा भारतीयांना फायदा झाला. हवाई वाहतुकीच्या क्षेत्रात मात्र इंडिगोच्या एकाधिकाराचा घातक परिणाम आता दिसला. गेल्या आठवड्यांत भारतातील लाखो प्रवाशांनी जो त्रास अनुभवला, तो शब्दातीत आहे. इंडिगोने साधारण दोनेक दशकांपूर्वी देशांतर्गत विमान सेवा सुरू केली तेव्हा कमी दरात सेवा देण्याचे आमिष दाखविले गेले. बरीच वर्षे ते पाळलेही गेले. पण, मक्तेदारी सुरू झाल्याचा अंदाज आल्याबरोबर इंडिगोने आपले खरे रंग दाखविण्यास सुरुवात केली. भारतात विमान प्रवास हा एकेकाळी चैनीचा विषय होता. खाजगी विमान सेवा सुरू झाल्यामुळे मध्यमवर्गीयांनाही उड्डाणे परवडू लागली. वेळेचे उत्तम नियोजन, किफायतशीर दर आणि इतरांच्या तुलनेत चांगली सेवा यामुळे इंडिगोने एव्हिएशनच्या बाजारपेठेत पैठ निर्माण केली. गेली अनेक वर्षे इंडिगोचा एकाधिकार आहे आणि त्याच्या तालावर भारताचे नागरी वाहतूक क्षेत्र नाचते आहे हे दुर्दैव. वैमानिकांच्या कामांचे तास आणि उड्डाणे व लॅण्डिगच्या संख्येवरील मर्यादा हे काही नवे नव्हते. इंडिगोला सारे काही ठावूक होते. तरीही कंपनीने बुकिंग वाढवले, विमान वेळापत्रक आखले आणि नंतर प्रत्यक्षात त्या बुकिंगच्या हाताळणीसाठी इतकी उड्डाणे करण्याइतकी क्षमताच इंडिगोकडे नसल्याचे उघड झाले. परिणामी हजारो उड्डाणे रद्द झाली, लाखो प्रवासी अडकले, विमानाच्या तिकिटांचे दर आकाशाला भिडले, तरीही काही लोकांना ती तिकिटे घेऊन प्रवास करावा लागला, ज्यांना ते जमले नाही त्यांचे नुकसान झाले. ही घटना अचानक घडलेली नाही. कमी संसाधनांवर अधिकाधिक बिझनेस करू पाहणाऱ्या व एकाधिकाराच्या मस्तीत असलेल्या कॉर्पोरेट मॉडेलमुळे जे काही घडण्याची शक्यता असते, तेच यावेळी घडले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या गगन भरारीला लागलेली ही दृष्ट आहे, प्रवाशांच्या हक्कांचा भंग आहे आणि लोकांच्या विश्वासाशी केलेली प्रतारणाही!

इंडिगोच्या या धिंगाण्याच्या पृष्ठभूमीवर नॅशनल कॅरिअर किंवा फ्लॅग कॅरिअर या संकल्पनेकडे पाहिले पाहिजे. एअर इंडियाची सुरुवातीपासूनची ओळख ही भारताची राष्ट्रीय विमान सेवा अशी. बऱ्याच प्रगत देशांत अशी पद्धत आहे की, सरकारचे पाठबळ असलेली एक राष्ट्रीय विमान सेवा असतेच. ती त्या देशाची भावनिक नव्हे तर धोरणात्मक गरज असते. केंद्रात काँग्रेसप्रणीत सरकार असताना एअर इंडियाला घरघर लागली. त्याचे पुढे काय झाले हे सर्वांना ठावूक आहे. टप्प्याटप्प्याने भारतात नॅशनल कॅरिअर ही संकल्पनाच संपुष्टात आली आणि खाजगी कंपन्यांचे फावले. त्याचा सर्वाधिक लाभ इंडिगोने घेतला. एअर इंडिया पूर्वीसारखी सक्षम सेवा देऊ शकली असती तर आता हे असे संकट उद्भवले नसते. किमान त्याची तीव्रता तरी कमी झाली असती. या संकटाने हे दाखवून दिले आहे की, भारताला तातडीने नॅशनल कॅरिअरची गरज आहे. लो कॉस्ट एव्हिएशनचे मॉडेल यशस्वी होते, हे भारतात सिद्ध झाले आहे. पण, कमी पगारातले कर्मचारी, सुरक्षेवर अत्यल्प खर्च, पायाभूत सुविधांवरील खर्चात कंची मारणे हे देशाच्या दृष्टीने घातक असते. लो कॉस्ट मॉडेलचे यश सिद्ध करणाऱ्या इंडिगोने ही दुसरी बाजूही सिद्ध केली आहे, हे आपण समजून घेतले पाहिजे. भारताच्या नागरी विमान वाहतूक क्षेत्रावर एकाच कंपनीचे वर्चस्व इतके मोठे झाले आहे की, ती अडखळली, तर संपूर्ण उद्योग व सारा देश खोळंबला. यातून साऱ्यांनी, विशेषतः सरकारने धडा घेतला पाहिजे. खरे तर भारतासारख्या खंडप्राय देशात दहा-बाराच एअरलाईन्स असणे भूषणावह नाही. युरोपातल्या, महाराष्ट्राहून छोट्या असलेल्या अनेक देशांत चाळीस-पन्नास एअरलाईन्स आहेत. अमेरिकेत पन्नासावर आहेत. भारतात किमान शंभर एअरलाईन्सना वाव आहे.

इंडिगोला इशारे देणे आणि तिकिटांचे दर निर्धारित करून देणे पुरेसे नाही. आता सरकारतर्फे तिकिटांचे जे दर ठरवून दिले गेले आहेत, त्यात सुद्धा नफेखोरीच होणार हे लिहून ठेवा. कारण ती एमआरपी आहे आणि कर वेगळे असणार आहेत. सरकारने हस्तक्षेप केला नाही तर विमान प्रवासाचे दर दीडपटीहून जास्त होतील, अशा विचित्र पद्धतीने हे निर्धारण केले गेले आहे, हे येथे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. आता व्हायला हवे ते असे की, भारतातील नागरी विमान वाहतूक क्षेत्रात अधिकाधिक कंपन्या कशा येतील आणि इंडिगोचा एकाधिकार कसा संपेल यासाठी सरकारनेच प्रयत्न केले पाहिजेत. लवकरात लवकर सरकारचे पाठबळ असलेले नॅशनल कॅरिअर सुरू केले पाहिजे. सार्वजनिक सेवा आणि राष्ट्रीय संपत्ती व इभ्रत या दोन्ही दृष्टींनी आवश्यक आहे. लहान, मध्यम विमान सेवा कंपन्यांना इंधन कर, लीजिंग शुल्क, परवाने सुलभ करणे, प्रादेशिक मार्गांवर प्रोत्साहन देणे हे सारे केले पाहिजे. विमान सेवा संचालनाचे नियमन कडक व काटेकोर केले पाहिजे. प्रवाशांना नुकसानभरपाई देण्याचे नियम सुद्धा अत्यंत कठोर असले पाहिजेत. भारताची अर्थव्यवस्था, स्थलांतर, पर्यटन, व्यापार, सेवा क्षेत्र आणि सामाजिक मोबिलिटी या सर्वांचा महत्त्वाचा आधार म्हणजे विमान सेवा होय. तिथे कॉर्पोरेटच्या नफेखोरीला प्राधान्य आणि देशहित त्यानंतर असे धोरण घातक आहे. भारताला इंडिगो अजिबात नको असे नव्हे. इंडिगोने चांगली सेवा दिली म्हणून ती कंपनी वाढली हे खरे आहे. तिचा एकाधिकार निर्माण व्हायला नको होता एवढेच. आता इंडिगोसह अन्य तेवढ्याच ताकदीच्या अनेक विमान सेवा कंपन्या मैदानात आल्या तर सुरक्षित, दर्जेदार व खात्रीशीर अशी सेवा सुनिश्चित होऊ शकेल. ती देशाची, देशाच्या अर्थव्यवस्थेची, अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यवहाराची आणि भारताच्या जागतिक प्रतिमेची गरज आहे. काहीही झाले तरी हे केलेच पाहिजे. कारण ‘इंडिगो’पेक्षा ‘इंडिया’ महत्त्वाचा आहे. भारत, भारताचे लोक, भारताचा आत्मविश्वास आणि भारताची प्रतिमा सर्वांत महत्त्वाची आहे.

## आंतरराष्ट्रीय

प्रा. जयसिंग यादव

# भारत-तुर्कस्तानचा परस्परांना शह-काटशह

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानवर हल्ला केला. ‘ऑपरेशन सिंदूर’अंतर्गत पाकिस्तानमधील शंभरहून अधिक दहशतवाद्यांना यमसदनी धाडले. पाकिस्तानमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त केली. जगभरातून पाकिस्तानच्या दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला. फक्त तुर्कस्तानसह काही मूठभर पाकिस्तानधार्जिण्या देशांचा काय तो अपवाद. ‘ऑपरेशन सिंदूर’च्या वेळी तुर्कस्तानने पाकिस्तानला ड्रोन पुरवले. तेव्हापासून भारत आणि तुर्कीमधील संबंधांमध्ये दुरावा निर्माण झाला. पाकिस्तानने या संघर्षादरम्यान भारतीय लष्करी तळ आणि नागरी क्षेत्रांना लक्ष्य करण्यासाठी तुर्कीने पुरवलेल्या ड्रोनचा वापर केला. या ड्रोनमध्ये असीस्गार्ड आणि सोंगरसारख्या मॉडेल्सचा समावेश होता. नंतर भारताने या मुद्यावर तुर्कीकडे चिंता व्यक्त केली. तुर्की गेल्या अनेक वर्षांपासून पाकिस्तानला एफ-१६ फायटिंग फाल्कन जेट आणि बायरक्तर ड्रोन पुरवत आहे. तुर्की हा केवळ पाकिस्तानचा दुसरा सर्वांत मोठा शस्त्रास्त्र पुरवठादार देश नाही, तर त्याच्या जवळच्या मित्रांपैकी एक आहे. भारतासाठी दीर्घकाळापासून चिंता असलेल्या काश्मीर मुद्यावर पाकिस्तानला त्याने सातत्याने पाठिंबा दिला आहे. लष्करी उपकरणे पुरवण्याव्यतिरिक्त तुर्कीचे अध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान यांनी मे महिन्यातील संघर्षादरम्यान पाकिस्तानला समर्थन दिले. या तणावातच भारत २९ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे आयोजित तुर्कीच्या राष्ट्रीय दिन समारंभापासून दूर राहिला. त्यानंतर लगेचच मीडिया रिपोर्टसनुसार, नोव्हेंबरमध्ये, तुर्कीने अमेरिकेची अपाचे हेलिकॉप्टर भारताला मिळण्यातही अडथळा आणला. त्यांना त्यांच्या हवाई हद्दीतून उड्डाण करण्याची परवानगी नाकारली.

भारताच्या शेजाऱ्यांसोबत तुर्कीच्या वाढत्या संरक्षण कारवाया हिंदी महासागर प्रदेशावरील वाढत्या लक्षाचे प्रतिबिंब आहेत. भारताच्या जवळच्या मानल्या जाणाऱ्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना बांगलादेशमध्ये सत्तेवरून घालवल्यानंतर तुर्कीने मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारशी लष्करी संबंध अधिक मजबूत केले आहेत. ३ नोव्हेंबर रोजी तुर्कीच्या संसदीय शिष्टमंडळाला भेटल्यानंतर, युनूस म्हणाले की, बांगलादेश आपल्या लोकांसाठी नवीन संधी उघडण्यासाठी तुर्कीसोबत काम करण्यास तयार आहे. बांगलादेश तुर्कीकडून अनेक लष्करी उपकरणे खरेदी करण्यासाठी चर्चा करत आहे. त्यात बायरक्तार टीबी-२ ड्रोन, टीआरजी-३०० रॉकेट सिस्टिम आणि ओटोकर तलपर लाईट टँक यांचा समावेश आहे. लष्करी बातम्या देणाऱ्या बांगलादेशी वेबसाईटनुसार, बांगलादेश तुर्कीकडून ‘शिपर’ लांब पल्ल्याच्या हवाई संरक्षण प्रणाली खरेदी करण्याचा विचार करत आहे. काही भारतीय माध्यमांच्या वृत्तांनुसार, वाटाघाटी आधीच सुरू आहेत. बांगलादेश पारंपरिकपणे शस्त्रास्त्रांसाठी चीनवर अवलंबून राहिला असला, तरी तो आता तुर्कीकडून शस्त्रे खरेदी करत आहे. बांगलादेश २०२२ मध्ये तुर्कीचा सर्वोच्च शस्त्रास्त्र खरेदीदार बनला.



बांगलादेशसोबतच्या वाढत्या मैत्री संबंधामुळे तुर्कीला बंगालच्या उपसागरात एक धोरणात्मक उपस्थिती मिळाली आहे. नोव्हेंबर २०२३ मध्ये मालदीवचे राष्ट्रपती मोहम्मद मुईझ्झू यांनी पदभार स्वीकारल्यानंतर इस्तंबूलला पहिली भेट दिली. त्यानंतर मालदीव या आणखी एका हिंदी महासागरीय राष्ट्राशी तुर्कीने सहकार्य वाढले. या वर्षी मार्चमध्ये तुर्कीने मालदीवला स्वदेशी विकसित सशस्त्र ड्रोन दिले. त्यानंतर एप्रिलमध्ये तुर्कीने एक जुने नौदल जहाजदेखील भेट दिले. यापूर्वी, जानेवारी २०२४ मध्ये मालदीवने त्यांच्या विशेष आर्थिक क्षेत्राचे निरीक्षण करण्याची घोषणा केली. तुर्कीकडून लष्करी ड्रोन खरेदी करण्यासाठी ३७ दशलक्ष डॉलरचा करार करण्यात आला. २२ ते २७ जुलैदरम्यान इस्तंबूल येथे झालेल्या संरक्षण मेळाव्यात तुर्कीने भारताच्या आणखी एका शेजारी देशाशी, श्रीलंकेशी सहकार्य करार केला. जूनच्या सुरुवातीला तुर्की नौदल युद्धनौका कोलंबोमध्ये बंदिस्त होती. श्रीलंकेने तिचे वर्णन ‘वाढत्या संरक्षण सहकार्याचे प्रतीक’ असे केले होते. गेल्या आठवड्यात जोहान्सबर्ग येथे झालेल्या जी-२० शिखर परिषदेदरम्यान पंतप्रधान मोदी यांनी अंगोलाचे अध्यक्ष जोआओ लोरेन्को यांच्याशी हस्तांदोलन केले आणि एर्दोगान यांनी जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांच्याशी हस्तांदोलन केले; परंतु मोदी आणि एर्दोगान यांच्यात एकाच व्यासपीठावर असूनही राजशिष्टाचार म्हणूनही हस्तांदोलन झाले नाही.

भारतीय माध्यमांच्या एका गटाचे म्हणणे आहे की, लष्करी सहकार्य मजबूत करण्याव्यतिरिक्त तुर्की भारताच्या शेजारी आपली गैर-लष्करी उपस्थिती आणि प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. तुर्कीच्या परराष्ट्र मंत्रालयाने ऑगस्ट २०१९ मध्ये आशियाई देशांसोबत सहकार्य वाढवण्याच्या उद्देशाने ‘आशिया : एक नवीन उपक्रम’ची घोषणा केली. तुर्कीच्या सरकारसमर्थक येनी सफाक वृत्तपत्रात २९ मे रोजी प्रकाशित झालेल्या एका वृत्तात असेही म्हटले आहे की, दक्षिण आशियातील तुर्कीचा वाढता प्रभाव भारतासाठी चिंतेचा विषय बनला आहे. ‘फर्स्ट पोस्ट’ या भारतीय वेबसाईटवर प्रकाशित झालेल्या एका भाष्यात म्हटले आहे की. एर्दोगान इस्लामिक जगाचा नेता बनण्याचा प्रयत्न करत आहेत. पाकिस्तान हा तुर्कीचा कनिष्ठ भागीदार असून यातील वैचारिक स्पर्धेत सहभागी आहे. तुर्की बांगलादेशमध्ये अनेक उच्चस्तरीय संवादांमध्ये सक्रिय आहे. भारतीय गुप्तचर सूत्रांचा हवाला देत सीएनएन-न्यूज१८ च्या एका अहवालात दावा करण्यात आला आहे, की तुर्की गुप्तचर संस्था बांगलादेशमधील इस्लामी गटांना, विशेषतः कट्टरपंथी ‘जमात-ए-इस्लामी’ला आर्थिक आणि लॉजिस्टिक साहाय्य करत आहे. नेपाळमध्ये तुर्की सरकारच्या निधीतून चालणाऱ्या ‘आयएचएच’ या स्वयंसेवी संस्थेने कार्याचा विस्तार केला आहे. ते अल्पसंख्यक मुस्लिम लोकसंख्येसाठी मशिदी, मदरसे आणि इस्लामिक केंद्रांच्या बांधकामासाठी निधी देत आहे. तुर्कीची कार्यपद्धती दुहेरी असल्याचे दिसून येते. भारतीय मुख्य प्रवाहातील माध्यमांनी सूचित केले आहे की भारत सरकार तुर्कीचे प्रतिस्पर्धी ग्रीस, सायप्रस आणि आर्मेनिया यांच्याशी भागीदारी करण्यावर पुन्हा भर देत आहे. दक्षिण आशियाच्या सुरक्षा क्षेत्रात तुर्कीचा अनपेक्षित प्रवेश भारताला असणाऱ्या धोक्याच्या गणितात बदल घडवत आहे. तुर्की आता दूरचा निरीक्षक राहिलेला नाही. तो सक्रिय अडथळा निर्माण करणारा देश बनला आहे. ‘आयएनएस त्रिकंद’ने १७-१८ सप्टेंबर रोजी ग्रीक नौदलाच्या जहाजांसह नौदल सराव केला. २४ सप्टेंबर रोजी सायप्रस नौदलासोबत असाच एक सराव झाला. हे संयुक्त सराव तुर्कीसाठी अडचणी निर्माण करू शकतात. शेजारी ग्रीसशी तुर्कीचे दीर्घकाळापासूनचे वैर आहे. तुर्कीच्या प्रतिस्पर्ध्यांसोबत नौदलाच्या सहभागाचा संदर्भ देत भारत पूर्व भूमध्यसागरीय आणि दक्षिण काकेशसमध्ये निर्णायकपणे आपली उपस्थिती दर्शवत आहे, तो तुर्कीच्या प्रादेशिक प्रभावाला धोरणात्मक प्रतिसाद देण्याचे संकेत देतो, असे एका वृत्तात म्हटले आहे.

तुर्की आणि भारताचे व्यापारी संबंध मध्यम स्वरूपाचे आहेत; परंतु अलिकडेच तुर्कीविरुद्धच्या निदर्शनांमुळे आणि प्रवास निर्बंधांमुळे यावर परिणाम झाला आहे. भारतातील तुर्की गुंतवणुकीचाही आढावा घेतला जात आहे. राष्ट्रीय हितसंबंधांवर परिणाम झाल्यास तुर्की कंपन्यांना प्रकल्पांमधून काढून टाकले जाऊ शकते. सायप्रसच्या उत्तरेकडील भागावरील नियंत्रणावरून तुर्कीशी संघर्ष करणाऱ्या सायप्रसच्या सार्वभौमत्वाला आणि एकतेला भारत पाठिंबा देतो. त्यामुळे दोन देशांच्या व्यूहरचना परस्परांना शह-काटशह देणाऱ्या आहेत, हे स्पष्ट होते.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# हिवाळी अधिवेशन आणि अपेक्षा

सध्या नागपूर येथे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनाकडून वैदर्भीयांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. काहीतरी ठोस आपल्या हाती लागेल असा विश्वास आहे. काही अपवादाची वर्षे वगळता महाराष्ट्रात काँग्रेसचीच सत्ता होती. काँग्रेसने विदर्भाचे पार वाटोळे करून ठेवले. काँग्रेसच्या आजवरच्या नीतीने विदर्भ बकाल झाला. त्यामुळे सर्वच क्षेत्रामध्ये असलेल्या अनुशेषाने विदर्भ अजूनही होरपोळतोय. पश्चिम महाराष्ट्राच्या चलाख नेत्यांनी विदर्भाची कायम उपेक्षा केली. विदर्भाच्या वाट्याचा निधी पळविला. आमचे नेते मात्र आपापली दुकानदारी थाटण्यातच धन्यता मानू लागले. जवळपास पन्नास वर्षांमध्ये विदर्भ आहे, तेथेच आहे. विदर्भामध्येही लोक राहतात. त्यांच्याही आकांक्षा आणि अपेक्षा आहेत, हे पूर्वीच्या सत्ताधीशांच्या लेखीही नव्हते. निवडून दिलेले लोकप्रतिनिधीही बघ्याची भूमिका घेऊन गप्प असायचे. आज बेंबीच्या देठापासून ओरडणारे शरद पवार केंद्रामध्ये अनेक वर्षे कृषी मंत्री होते. त्यावेळी त्यांना विदर्भातील शेतकऱ्यांचा कळवळा कधीच आला नाही. उपाशी मरणाऱ्या आपल्याच राज्यातील शेतकऱ्यांसाठी काहीतरी करावे असे शरद पवारांना त्यावेळी का वाटले नाही? सत्तेसाठी त्यांनी फक्त येथील प्रश्नांचे भांडवल केले आणि जनता होरपळत राहली.

विदर्भ जेव्हा महाराष्ट्र राज्यात सामील झाला त्यावेळी येथील रोजगाराचे प्रमाण राज्यामध्ये सर्वाधिक होते. त्यावेळी कापसाच्या रूपामध्ये पांढरं सोनं पिकविणारा विदर्भ आघाडीवर होता. परंतु, कायम दुर्लक्षित विदर्भ प्रदेशाला राजकीय अनास्थेचे ग्रहण लागले. त्यानंतर ही ग्रहदशा अधिकच गडद होत गेली. विणकर आणि यंत्रमाग अडगळीत पडले. सिंचन, रस्ते, आरोग्य आणि नोकरीमधील अनुशेष सतत वाढत गेला. त्यानंतर भाजपा सरकारने विदर्भासाठी भरघोस निधी देऊन प्रथमच आपले लक्ष विदर्भावर केंद्रित केले. सुदैवाने यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री विदर्भाचे सुपुत्र आहेत. देवेंद्र फडणवीस यांना विदर्भाच्या ज्वलंत प्रश्नांची जाण आहे. मुख्यमंत्री विदर्भाचे असल्याने जनतेमध्येही उत्साह आहे. विदर्भाचा सर्वांगीण विकास व्हावा, जनतेचे प्रश्न पटलावर मांडून त्यांना न्याय मिळावा या उद्देशाने हिवाळी अधिवेशन नागपूरला घेण्याची परंपरा रूढ झाली. काँग्रेसच्या कार्यकाळामध्ये हा उद्देश कधीच सफल झाला नाही. हुर्डा पार्ट्या अन् सहलीचेच स्वरूप काँग्रेसने नागपूर अधिवेशनाला दिले. त्यामुळे नागपूर अधिवेशन एक फार्स ठरला. विदर्भामधील वाशीम हा आकांक्षित आणि मागासलेला जिल्हा. या जिल्ह्याच्या निर्मितीला २५ वर्षे झालीत. अडीच दशकानंतरही या जिल्ह्याच्या व्यथा आजही कायम आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. या जिल्ह्याचा अनुशेष चुटकीसरशी भरून काढता येईल, असेही नाही. परंतु, त्याची सुरुवात जर या अधिवेशनापासून झाली तर तो एक मैलाचा दगड ठरेल. या जिल्ह्यामध्ये एकही मोठा उद्योग नाही, एकही कारखाना नाही. एमआयडीसी अजूनही भकास आहे. तरुणांच्या हाताला काम नसल्याने रोजगारांसाठी त्यांची भटकंती आजही कायम आहे. विदर्भामध्ये वाशीम जिल्हा सोयाबीनचा हब म्हणून ओळखला जातो. त्यामुळे येथे एखादा सोयाबीनवर प्रक्रिया करणारा प्रकल्प जर उभारला गेला तर अनेक बेरोजगारांच्या हाताला काम मिळू शकते. नरखेड-वाशीम हा रेल्वेमार्ग बडनेऱ्यापर्यंत पूर्ण झाला असून, गेल्या कित्येक वर्षांपासून बडनेरा-वाशीम हा १३० किमीचा रेल्वेमार्ग थंड्या बस्त्यामध्ये पडला आहे. बडनेरा-वाशीम रेल्वे मार्ग जोडला गेल्यास दक्षिण भारत आणि उत्तर भारताला जोडणारा महत्त्वाचा रेल्वेमार्ग ठरू शकतो. त्यासाठी राज्य शासनाने निधीचा वाटा उचलणे गरजेचे आहे. या जिल्ह्याच्या सिंचनासाठी देवेंद्र फडणवीस यांनी नदीजोड प्रकल्पामध्ये वाशीम जिल्ह्याचा समावेश केला आहे. शेतकऱ्यांसाठी ही एक सुखद वार्ता आहे. या प्रकल्पामुळे बऱ्याच अंशी सिंचनाचा अनुशेष भरून निघण्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्या पदरामध्ये पाडून घेण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि जनतेचा रेटा हवा. येथील मातीच्या कणाकणामध्ये संघर्षाचा इतिहास आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भाच्या अनेक समस्यांच्या मुळाशी हात घालून त्या सोडवल्या आहेत. त्यामुळे या जिल्ह्यातील जनताही आशावादी आहे.

९८८१७१७८५६

## इतस्ततः

दत्तात्रेय आंबुलकर

# आता खाणींतून पाणी...

पारंपरागत व्यवहारांपासून पर्यावरणशास्त्रापर्यंत सर्वत्र पाण्याला एक महत्त्वाचा स्रोत मानले जाते. पाण्याचा त्या दृष्टीने उपयोग व त्याचे महत्त्व समजून घेतानाच, या क्षेत्रातील जाणकार व विषयतज्ज्ञांनी देशांतर्गत लहान-मोठ्या आकाराच्या व मोठ्या संख्येत असणाऱ्या खाणींमध्ये उपलब्ध पाण्याचा उपयोग प्रसंगी पिण्याचे पाणी म्हणूनसुद्धा होऊ शकतो, असा अभ्यासपूर्ण पुढाकार घेतला असून, त्या दृष्टीने प्रयत्नांना सुरुवातदेखील झाली आहे. या संदर्भातील प्रमुख उल्लेखनीय मुद्दा म्हणजे रांची येथील सुप्रसिद्ध सेंट्रल माईन प्लॅनिंग ॲण्ड डिझाईन इन्स्टिट्यूट म्हणजेच सीएमपीडीआय या संस्थेतील कोळसा खाणींसह देशातील सर्व खाणींचा अभ्यास करून असे स्पष्ट करण्यात आले आहे की, सद्यस्थितीत सरासरी स्वरूपात देशातील ४३७ कोळसा खाणींमध्ये सुमारे दोन हजार ७०० किलोलिटर्स पाणी उपलब्ध असते व या पाण्याचा उपयोग देशातील विविध कामांसाठी होऊ शकतो.

सीएमपीडीआयच्या याच अभ्यासात नमूद केलेल्या आकडेवारीनुसार, आपल्या कोळसा खाणींमध्ये दरवर्षी साठवण स्वरूपात जे पाणी शिल्लक उरते, त्या पाणीसाठ्याद्वारा ऑलिम्पिकच्या ११ हजार पोहण्याच्या टाक्यांसाठी आवश्यक पाण्याची गरज भागवली जाऊ शकते. आपल्या याच खाण-पाण्याच्या अभ्यासाच्या पाठपुराव्याद्वारे सीएमपीडीआयने प्रायोगिक स्तरावर झारखंड या कोळसाबहुल राज्यातील खाणींमधील पाणीसाठ्यांचा त्यातील पाण्याच्या दृष्टीने अभ्यास केला. या पाण्याचा उपयोग विविध कामांसाठी उत्पादक व उपयुक्त पद्धतीने होऊ शकतो, असे आढळून आल्याने प्रयोगाच्या पुढील टप्प्यात आणखी १४ खाणींमधील पाणसाठ्यांचा उपयोग केला गेला, हे या संदर्भात उल्लेखनीय आहे. खाणींमधील पाण्याच्या उपयोगाचा पहिला यशस्वी टप्पा गाठला गेला २०२१ मध्ये. या पाणी प्रयोगाचे पहिले लाभार्थी ठरले, ते झारखंडच्या रामगड जिल्ह्याच्या पांडी पंचायतीतील रहिवासी. त्यांना कोल इंडियाअंतर्गत ‘आरा-८’ खाणीतील उपलब्ध पाण्याचा उपयोग गावकऱ्यांच्या विविध उपयोगांसाठी होऊ शकला. याच पाणी उपक्रमाचा अवलंब नंतर ‘आरा’ खाणीच्या विविध ठिकाणी यशस्वीपणे केला गेला.



पाण्यासाठीच्या या प्रयत्नांची एकूण पृष्ठभूमी म्हणजे कोळसा खाणक्षेत्रात पावसाळ्यादरम्यान साचलेले पावसाचे पाणी व त्यानंतर पण वेगवेगळ्या जलस्रोतांद्वारे झिरपून खाणक्षेत्रांमधील पाणवठ्यांमध्ये साचणारे पाणी याची साठवण वर्षानुवर्षे व परंपरागत स्वरूपात होत होती. पण, या अशाप्रकारे नैसर्गिक स्वरूपात साचलेल्या पाण्याचा उपयोग कशाप्रकारे करता येईल, यावर फारसा विचार झाला नव्हता. मात्र, गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारच्या कोळसा मंत्रालयातर्फे कोळसा खाणींमधील पाणीसाठ्यांचा उपयोग केला जाऊ शकतो का, यावर विचार सुरू झाला. सुरुवातीचे प्रयत्न फलदायी ठरले नाहीत. मात्र, या प्रयत्नांमध्ये सातत्य असल्याने त्याची उपयुक्तता सर्वांना समजली. तशातच कोळसा खाणक्षेत्र व परिसरातील ग्रामीण व रहिवाशांसाठी पावसाळ्यानंतर सुमारे सहा महिने पाण्याचे दुर्भिक्ष कायमचे असायचेच. यातूनच खाण परिसरातच राहणारे कोल इंडियाचे अधिकारी व तज्ज्ञ यांनी खाणींमधील पाण्याचा उपयोग लोकांच्या वापरासह पिण्याचे पाणी म्हणून करता यावा, यासाठी आपले प्रयत्न सुरू ठेवले. याच प्रयत्नांची परिणती म्हणजे, गेल्या सुमारे पाच वर्षांपासून या पाण्याचा वापर करता येऊ लागला. केंद्रीय कोळसा खाणमंत्री जी. किशन रेड्डी यांनी नव्यानेच जाहीर केलेल्या निर्णयानुसार, सद्यःस्थितीत कोल इंडिया व त्याअंतर्गत असणाऱ्या विविध कोळसा खाणींमधील अशाप्रकारे उपलब्ध असणाऱ्या पाण्याचा वापर खाण व परिसरातील रहिवासी नागरिकांसाठी करण्यावर केंद्रीय स्तरावर प्राधान्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

या संदर्भात केंद्र सरकारच्या विशेष प्रयत्नांतून मर्यादित स्वरूपात अथवा दीर्घकालीनसंदर्भात खाणकाम-खोदकाम वा वापरासाठी नसणाऱ्या खाणींमध्ये साचलेल्या व उपलब्ध असणाऱ्या पाण्याच्या वापरावर विचार करून, त्याचा उपयोग करण्यासाठी विशेष भर दिला गेला. यातूनच खाणीतील जलवापराच्या प्रयत्नांना प्रयत्नपूर्वक यश येत गेले, हे या संदर्भात उल्लेखनीय आहे. याचेच पाणीदार परिणाम आता दिसून येत आहेत. कोळसा खाणींमध्ये तर मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होत असतात. पिढ्यान्‌पिढ्या या रोजगारसंधींचा लाभ मिळाला आहे. मात्र, आता या खाणींमध्ये उपलब्ध असणाऱ्या या पाण्याचा उपयोग खाण परिसरातील गरजू ग्रामीणांसाठी होणार आहे, हे महत्त्वाचे. या पाण्यापैकी काही पाणी ग्रामीण व लघु-उद्योगांसाठी पण उपयुक्त ठरणार असून, त्यामुळे काही प्रमाणात स्वयंरोजगारांसह रोजगारसंधी उपलब्ध होऊ घातल्या आहेत.

आयएपीडीआयसह जलतज्ज्ञांतर्फे करण्यात आलेल्या अभ्यासानुसार, या तज्ज्ञांच्या मते हे पाणी सर्व प्रकारच्या वापरासाठी योग्य असून, पिण्याच्या दृष्टीने त्याचा उपयोग करायचा झाल्यास पाण्यावर प्रक्रियेसह शुद्धीकरण करूनच त्याचा वापर करावा, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे. या संदर्भात आपल्या कोळसा खाणींमध्ये उपलब्ध असणाऱ्या पाण्याचा पाश्चिमात्य देशांमधील खाणींमधील पाण्याच्या संदर्भात तुलनात्मक अभ्यास करून सीएमपीडीआयने असे स्पष्ट केले आहे की, पाश्चिमात्य देशांमधील खाणींमध्ये करण्यात आलेल्या प्रक्रियांमुळे तेथील पाणी रसायनयुक्त असल्याने, विशेषतः मानवीय उपयोगांसाठी घातक ठरू शकते. भारतात मात्र येथील खाणींमध्ये अशी प्रक्रिया होत नसल्याने कोल इंडियाच्या खाणींमध्ये साठणाऱ्या व उपलब्ध असणाऱ्या पाण्याची उपयुक्तता निश्चितपणे उजवी व दर्जेदार ठरते.

याचेच प्रत्यंतर विविध अभ्यास आणि अहवालांमधून येत असते. सीएमपीडीआयचे जनसंपर्क अधिकारी कोल इंडियाअंतर्गत खाणींमध्ये उपलब्ध पाण्याचा ग्रामस्थांसाठी व विशेषतः त्याचा घरगुती व पिण्याच्या पाण्याच्या दृष्टीने वापर करण्याआधी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पाण्याची संपूर्ण चाचणी केली जाते व मंडळाच्या अभ्यास आणि चाचणी प्रमाणपत्रानंतरच हे पाणी पिण्यायोग्य समजले जाते. त्यानुसार, संबंधित गरजू-ग्रामीण क्षेत्रातील रहिवाशांसाठी वापर केला जातो. खाणीतून पाणी या नव्या पाणीदार प्रयत्नांमुळे खाणक्षेत्रातील रहिवाशांची पाण्याची गरज व प्रसंगी तहान भागविण्याचे हे भगीरथ प्रयत्न म्हणूनच अभिनंदनीय ठरतात.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)
९८२२८४७८८६

### युवाशक्ती राष्ट्राचा आधारस्तंभ

युवा हे कोणत्याही राष्ट्राचे आधारस्तंभ असतात. ज्या राष्ट्राकडे समर्थ, सुशिक्षित, कर्तृत्ववान आणि नैतिक मूल्यांनी समृद्ध अशी युवकांची सेना आहे, ते राष्ट्र निश्चयाने प्रगतीच्या शिखरावर पोहोचते. म्हणूनच युवाशक्ती हीच खरी राष्ट्रशक्ती मानली जाते. आजच्या युवकांमध्ये अपार सामर्थ्य दडलेले आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा, साहित्य, कला, उद्योगधंदे अशा प्रत्येक क्षेत्रात ते नवीन उंची गाठत आहेत. बदलत्या काळानुसार स्वतःला घडवून घेण्याची क्षमता युवकांमध्ये प्रबळ असल्याने ते देशाला आधुनिकतेकडे आणि विकासाकडे नेणारे प्रमुख घटक ठरतात. एखाद्या राष्ट्राची खरी ताकद तिच्या भौतिक संपत्तीत नसून, त्या राष्ट्रातील ताज्या, ऊर्जावान आणि सर्जनशील युवा मनांत दडलेली असते. नव्या कल्पना, धाडसी निर्णय, आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख आणि बदल स्वीकारण्याची वृत्ती यामुळे युवा समाज कोणत्याही देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका निभावतो. भारतासारख्या विशाल देशात युवा वर्ग हा लोकसंख्येचा मोठा हिस्सा आहे, ही आपली सर्वांत मोठी संधी आहे. सुशिक्षित युवा राष्ट्राला नवीन संशोधन, तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण उपाय देतात. स्टार्टअप्स, नवे व्यवसाय आणि रोजगारनिर्मिती यात युवा आघाडीवर आहे. परंतु युवाशक्ती योग्य दिशेने प्रवाहित केली गेली तरच तिचा खरा लाभ राष्ट्राला मिळतो. तरुणांनी आपल्या क्षमतेचा योग्य वापर करून, जबाबदारीची जाणीव ठेवून आणि समाजहिताचा दृष्टिकोन बाळगून काम केले तर राष्ट्र प्रगत, सक्षम आणि समृद्ध होऊ शकते.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

## वाचक पत्रे

### नाशिक कुंभमेळा आणि पर्यावरणरक्षक

नाशिक कुंभमेळ्यासाठी साधुग्राममध्ये तात्पुरत्या सुविधा उभारण्यासाठी महापालिका प्रशासनाने तपोवन परिसरातील ५४ एकर जमिनीवरील सुमारे १८०० झाडे कापण्याची तयारी सुरू केली आहे. या प्रशासकीय निर्णयाला सुरुवातीपासूनच पर्यावरणप्रेमींकडून विरोध होत आहे. याच आंदोलनात चित्रपट अभिनेते सयाजी शिंदे यांनी उडी घेतली असून, ही झाडे वाचवण्यासाठी कोणतीही भूमिका घेण्यास तयार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. नाशिकमधील या वृक्षतोडीच्या विरोधात त्यांनी घेतलेली भूमिका आणि त्यासाठी त्यांनी वापरलेली साधू आले आणि गेले, काही फरक पडत नाही किंवा भगवे कपडे घालून आणि टिळे लावून कोणी साधू-संत होत नाही, झाड वाचवण्यासाठी संघर्ष करणारे नाशिककर हेच खरे साधू-संत आहेत यासारखी वक्तव्ये अनेक स्तरांवर चर्चेचा विषय ठरली आहेत. ज्या सह्याद्रीच्या पायथ्यापासून ते येतात, तेथील डोंगर तीस वर्षांपूर्वी विकासकामांसाठी उजाड झाले, तेव्हा त्यांची ही आक्रमकता, भाषाशैली दिसली नव्हती. तसेच, अलिकडे लवासा प्रकल्पासाठी जेव्हा तेथील आदिवासी लोकांची जमीन घेण्यात आली आणि पर्यावरणाचे नुकसान झाले, तेव्हाही त्यांचा हा तीव्र विरोध सार्वजनिकरीत्या दिसला नाही. यावरून असा प्रश्न निर्माण होतो की, एखाद्या विशिष्ट वेळी आणि विशिष्ट ठिकाणीच त्यांचा हा पर्यावरणवादी आवेश का दिसतो? त्यांच्या या भूमिकेमागे राजकीय, सामाजिक किंवा व्यक्तिगत असे कोणते घटक आहेत, ज्यांचा प्रभाव त्यांच्या कृतीवर पडतो? त्यांची ही भूमिका केवळ प्रसिद्धीसाठी आहे की खऱ्या पर्यावरण रक्षणासाठी, यावर प्रश्न निर्माण होतो.

**अविनाश देशपांडे**/९४२२९५०७५०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-६७

मंगळवार, ९ डिसेंबर २०२५

### ज्या क्षणाला या ध्वजाला कोटि कोटि वंदना

ज्या क्षणाला या ध्वजाला कोटि कोटि वंदना
तीच घटना जी स्वयंभू विजयशाली चेतना ॥धृ.॥

वाहुं दे हे स्वैर वारे घेउनी ही भावना
होउ दे अज्ञातमार्गे शक्तिची जोपासना ॥१॥

बोलणे जाते विरोनी अमर राही सत्कृती
हिंदुराष्ट्राच्या कृतीची दुमदुमे ही घोषणा ॥२॥

जाहले सम्राट हिंदू होउनी त्यांच्या स्मृती
येउ दे सरसावुनीया वीरसेना पूजना ॥३॥

भूषणे सिंहासने ती भूषणे समरांगणे
त्याग अथवा भोग दोन्ही शोभवीती जीवना ॥४॥

मित्र अथवा शत्रु येवो आडुनी वा रोखुनी
मारणारा कोण आम्हा धगधगे ही प्रेरणा ॥५॥

टाकुनीया भेद सारे प्रांत जाती मान्यता
टाकली ही संघवृत्ती सिद्ध जी विजयार्जना ॥६॥

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापूरच्या पाणीप्रश्नी विधानसभा उपाध्यक्ष बनसोडेंचा आयुक्तांना आदेश

## रात्री अवेळी पाणीपुरवठा न करण्याची केली सूचना; निधी कमी पडू देणार नसल्याचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

रात्री बेरात्री होणाऱ्या पाणीपुरवठामुळे महिलांसह नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो तत्काळ रात्रीचा पाणीपुरवठा बंद करा शहराला दोन दिवसात पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न करावा. महापालिका अधिकाऱ्यांना सोलापूर शहराविषयी आत्मीयता आहे की नाही, असा सवाल उपस्थित करत महापालिकेला लागणाऱ्या निधीसाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे आदेश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी नागपूर येथील बैठकीत दिले.

नागपूर येथे विधानसभा अधिवेशनादरम्यान उपाध्यक्ष बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली महापालिकेचे अधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पदाधिकारी तसेच पत्रकारांची महत्त्वाची बैठक घेतली. सोलापूर महापालिकेच्या संदर्भातील पाणी प्रश्नासह विविध विषयांवर चर्चा झाली. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, किसन जाधव, शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, माजी नगरसेवक तोफिक शेख, गणेश पुजारी आदी उपस्थित होते. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे हे या बैठकीला व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून उपस्थित होते.

या बैठकीत सोलापूरच्या पाणी प्रश्नावर बनसोडे यांनी विचारलेल्या प्रश्नावर अधिकाऱ्यांनी किस पाडला. तर सोलापूर महानगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे वर्ग करण्याची मागणी माजी उपमहापौर प्रवीण डोंगरे यांनी केली. तसेच नगरअभियंता आणि सार्वजनिक आरोग्य अभियंता यांना बदलून शासनाचे अधिकारी देण्याची मागणीसुद्धा डोंगरे यांनी केली. महिलांसाठी त्रासदायक ठरणारा रात्रीचा पाणीपुरवठा बंद करण्याची मागणी माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, किसन जाधव आणि तौफिक शेख यांनी केली.



शहराला एक दिवसाआड पाणी पुरवठा कसा करता येईल या संदर्भात आरोग्य अभियंता चौबे यांना बनसोडे यांनी विचारले. त्यावर समाधानकारक उत्तर चौबे यांना देता आले नाही. यामुळे पंचवीस वर्षे सेवा करूनही तुम्हाला शहराविषयी आत्मीयता आहे की नाही अशा शब्दात सुनावले. सोलापूरचा रात्रीचा पाणीपुरवठा बंद होऊन सुरळीत होणार असेल तर सोलापूर महानगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे देण्याचा विचार करणार नाही,असेही बनसोडे यांनी स्पष्ट केले

### नगर अभियंताना धारेवर धरले

रमाई आवास योजने संदर्भात बोलताना शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकाऱ्यांना तिथे बसविले असून योजना नागरिकांपासून वंचित ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांना तिथे बसविले नाही या शब्दात या बैठकीत विधानसभेचे उपाध्यक्ष बनसोडे यांनी सोलापूर महापालिकेच्या नगरअभियंता सारिका आकुलवार यांना धारेवर धरले. रमाई आवास योजनेचे अर्ज प्रलंबित ठेवू नका. लोकांना लाभ मिळू द्या, असे आदेश त्यांनी दिले.

### दीड वर्षात दोन दिवसाआड पाणीपुरवठा करणार

या बैठकीत रात्रीचा पाणीपुरवठा बंद न करता त्याची वेळ कमी करण्याचा शब्द सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिला तर मनपा आयुक्त सचिन ओम्बासे यांनी दीड ते दोन वर्षात सोलापूरकरांना दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही विधानसभेचे उपाध्यक्ष बनसोडे यांना दिली.

### सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक तो निधी दिला जाईल

बनसोडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन सोलापूरच्या पाणी प्रश्नासाठी आवश्यक निधीसह विविध विषयांवर चर्चा केली. सोलापूरचा पाणी प्रश्नासाठी लागणारा आवश्यक निधी तसेच इतर प्रश्न मार्गी लावणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

### श्री सिद्धेश्वर यात्रेपूर्वी पाणीपुरवठा सुरळीत करा

मनपा परिवहन समितीचे माजी सभापती आनंद मुस्तारे यांनी श्री सिद्धेश्वर यात्रा निमित्ताने पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा. उपाध्यक्ष बनसोडे यांनी महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे यांना दिले.

### अपील केल्यानंतर त्या कार्यमुक्त १५ जणांना पुन्हा संधी

विनापरवानगी दीर्घकाळ सेवेत गैरहजर राहिल्या प्रकरणी महापालिकेतील पंधरा सेवकांना आयुक्तांनी कार्यमुक्त केले होते. यासंदर्भात या बैठकीत चर्चा झाली. कुटुंबांचा विचार करून सहानुभूती म्हणून त्यांना पुन्हा संधी देता येईल का अशी विचारणा उपाध्यक्ष बनसोडे यांनी केली. त्यावर महापालिका उपायुक्त यांनी स्पष्टीकरण दिले.

नगर विकास विभागाचे अधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. संबंधित सेवकांनी अपील करावे त्यानंतर त्या १५ जणांना पुन्हा संधी देता येईल. मात्र ही शेवटची संधी असेल असे लोकरे यांनी सांगितले. आनंद चंदनशिवे यांनी यासंदर्भात मागणी केली.

---

# कुंभारीत घरफोडी; लाखोंचा मुद्देमाल लंपास

## दोन आरोपी अटकेत, दोघे फरार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

कुंभारी गावात मध्यरात्री जबरी चोरीच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली. ८ डिसेंबर रोजी रात्री १ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. गौरीशंकर आमालसिद्ध होनगवडे वय ३०, रा. कुंभारी यांच्या घरातून चोरट्यांनी दीड तोळे सोन्याचे दागिने व तब्बल दहा हजार रुपये असा मुद्देमाल लंपास केला. फिर्यादी झोपेत असताना चोरी घडल्याचे सांगण्यात आले. सकाळी घटनेची माहिती समजताच त्यांनी तत्काळ वळसंग पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. घटनेत चार जणांचा सहभाग असल्याची माहिती मिळाली असून त्यापैकी दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले तर दोन आरोपी फरार आहेत. ताब्यात घेतलेल्या आरोपींची चौकशी सुरू असून त्यांची ओळख अद्याप स्पष्ट झालेली असल्याची माहिती पोलिसांकडून सांगण्यात आली. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिस पथकाने तपास सुरू केला आहे. या प्रकरणी पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल लक्ष्मण गायकवाड करीत आहेत.

# चारचाकीची काच फोडून लॅपटॉप चोरला

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

कारची काच फोडून अज्ञात चोरट्याने सुमारे ५० हजार किमतीचा लॅपटॉप व इतर साहित्य फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीत मुरारजी पेठ परिसरात उभी असलेल्या गाडीतून चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. ४ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १.३० ते सायं. ६.३० वाजताच्या सुमारास, फिर्यादी संध्याराणी दिलीप शिंदे यांनी गाडी क्रमांक एमएच २५ ईएल ८४१० मारुती सुजुकी इर्टिगा ही कार किल्ला बागेजवळ, हिराचंद वाचनालया समोर पार्क केली होती. अज्ञात चोरट्याने कारच्या मधल्या डाव्या बाजूच्या खिडकीची काच फोडून आत प्रवेश केला. कारमधील ग्रे रंगाचा डेल कंपनीचा लॅपटॉप, हेडसेट आणि एअरबड्‌स असे एकूण ५० हजार रुपये किंमतीचे साहित्य चोरून नेले. ही घटना फिर्यादीच्या लक्षात आल्यानंतर दि. ७ डिसेंबर रोजी रात्री ११.२० वाजता फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून या प्रकरणी अज्ञात चोरट्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल घुगे करत आहेत.


## नावात बदल

माझे जुने नाव **रेवणप्पा शिवलिंगप्पा उजळंबे** असे होते ते बदलून माझे नवीन नाव **रेवणसिध्द शिवलिंगप्पा उजळंबे** या नावाने ओळखावे.

**पत्ता -** मु. पो. कडबगाव, ता. अक्कलकोट जि. सोलापूर

गॅजेट नं. P २५९५९२२

## खरेदीपूर्व जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जिल्हा सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेचे हद्दीतील दक्षिण सदर बझार येथील मिळकत टी.पी.नं.३, फायनल प्लॉट नं. १६०८/१ याचे एकुण क्षेत्र ९१२.५० चौ.मी. या मिळकतीवर बांधलेल्या ''श्री सिध्देश्वर अपार्टमेंट'' या ओनरशिप अपार्टमेंट इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. ४ याचे रेरा कारपेट क्षेत्र ३७.७६ चौ.मी. फ्लॅट जागा, शरणबसप्पा गंगप्पा अब्दुलपूरकर यांनी आमचे अशिल सोलापूर जिल्हा पेन्शनर असोसिएशनचे अध्यक्ष सदाशिव वामन उंब्रजकर यांना विक्री करण्याचे ठरवून त्यांचेकडून इसारा रककम स्विकारुन त्यांचे नांवे व हक्कात नोंदणीकृत साठेखत दस्त लिहुन नोंदवून दिला आहे. सदर फ्लॅट जागा निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा सदर मालकांनी आमचे अशिलास दिला आहे.

तरी वर नमूद फ्लॅट जागेवर अन्य कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार, टाच, गहाणखत, साठेखत वगैरे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत त्यांचे हक्काचे पृष्ठयर्थ कागदपत्रासह त्यांची लेखी हरकत नोंदवावी. याप्रमाणे मुदतीत कोणी कांही हक्काची जाणीव न दिल्यास, सदर फ्लॅट जागा वर नमूद मालकांचे असून, ती निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाची कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता. ८/१२/२०२५

**सही/-**
**बी. जी. उजळंबे, ॲडव्होकेट**
८७ बी/७१/२बी, भवानी पेठ,
सोलापूर मो. नं. ९८५०२८२६८८
अशिला तर्फे ॲडव्होकेट

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेष करून उपळाई (ठों.) व बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविणेत येते की,

डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे उपळाई (ठोंगे) येथील गट नंबर ४६४ पैकी १/२ (निम्म्या) हिश्याची जमिन ही आमचे आशिलांना हिब्बानामा बक्षिसपत्राने आलेली असुन सदर जमिनीत आमचे आशिलांची कब्जे वहिवाट आहे. मौजे हिंगणगाव ता. परंडा जि. धाराशिव येथील लोकांनी आमचे आशिलांचे उपरोक्त जमिनीमध्ये अनाधिकाराने व बेकायदेशीररित्या घरे बांधलेली आहेत. त्यामुळे आमचे आशिलांनी बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि साहेब यांचे कोर्टात **रे.मु.नंबर ८९७/२०१७** या नंबरचा डिक्लरेशन, निरंतर मनाई व वाटपाचा दावा केला असुन दावा दिवाणी कोर्टात प्रलंबीत आहे.

उपळाई (ठों.) ता. बार्शी येथील कांही लोक अनाधिकाराने आमचे आशिलांचे जमिनीत बेकायदेशीर व्यवहार करुन उपरोक्त जमिन खरेदी करणेच्या प्रयत्नात आहेत.

तरी तमाम लोकांस असे सूचित करणेत येते की, वरील जमिनी संदर्भाने कोणीही जमिन हस्तांतरणाचा व्यवहार करु नये, याउपरही कोणी व्यवहार केल्यास तो व्यवहार आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही. तरी वरील जमिनीचा व्यवहार करुन कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली ता. ८/१२/२०२५.

**सही/-**
**पी.डी. उबाळे,** ॲडव्होकेट,
सिव्हील कोर्ट, बार्शी ४१३ ४११
१) मुख्तार दस्तगीर मुजावर (मुलाणी) व
२) जावेद सुलतान मुजावर (मुलाणी)
तर्फे ॲडव्होकेट

## खरेदीपूर्व जाहिर नोटीस

तमाम लोकांना या खरेदीपुर्व जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** : डि व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर महानगरपालिकेच्या नविन हद्दवाढ भागातील नेहरु नगर येथिल जुना सर्व्हे नं. ३५१/२ ब यांसी नविन सर्व्हे नं. ७/२/ब यापैकी स्वामी विवेकानंद नगर भाग-२ या नावाने ओळखले जाणारे नगरातील प्लॉट नं. २०१ अ यांसी क्षेत्र २००० चौ. फुट इतकी आहे. यांसी चतुः सिमा पुर्वेस रस्ता, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस प्लॉट नं. १९९ व २००, उत्तरेस प्लॉट नं. १३६अ व १३७ असे आहे.

वर नमुद केलेल्या प्लॉटजागा या जीवन शिवा लमाण यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिलांना विक्री करण्याचे ठरविलेले असून इसारापोटी रक्कम स्विकारुन सदरच्या मिळकती या निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलांस दिलेली आहे. तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, कुलमुखत्यार पत्र, भाडे, लिव्ह ॲन्ड लायसन्स, बक्षीस, इसारापावती, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टाच, जप्ती (right of interest) व इतर कोणत्याही स्वरुपाचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी, कोणाचेही, कसलीही तक्रार व हरकत न आल्यास ते सदरची मिळकत हि संपुर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे गृहित धरुन आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील.

तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलांवर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. ही खरेदीपुर्व जाहिर नोटीस दिली. दि. ०९/१२/२०२५

**सही/-**
**विश्वनाथ एच मगी**
(बी.एस.एल., एलएल.बी.)
ॲडव्होकेट
**पत्ता-** युनिटी ड्रीम अपार्टमेंट प्रेम नगर, विजापूर रोड, जुळे सोलापूर- ४१३००४
मो.नं. ९८९०५४३९२९

## तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर यांचे न्यायालयात

दूरध्वनी क्र. (०२१७) २२५५५५१ Email-tahmandrup@gmail.com

जा.क्र. जमीनबाब/जन्म-मृत्यू दाखला/एस.आर.-२४५/२०२५ मंद्रूप, दि. ०४/१२/२०२५

**- जाहीर प्रसिध्दीकरण -**

श्री.सतीश आप्पा उर्फ गणपतराव शिंदे, वय-६२ वर्षे, धंदा-शेती
रा. मंद्रूप, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर **अर्जदार**
**विरुध्द**
ग्रामसेवक, ग्रामपंचायत मंद्रूप **सामनेवाला**
ता.दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

ज्याअर्थी, यातील अर्जदार श्री. संजय आप्पा उर्फ गणपतराव शिंदे, रा. मंद्रूप, ता. दक्षिण सोलापूर येथील कायमचे रहिवासी असून त्यांचा जन्म दि. ०१/०६/१९६७ रोजी गाव -मंद्रूप, ता. दक्षिण सोलापूर येथे राहत्या घरी झालेला आहे. तथापि सदर जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे झालेली नाही. तरी सदर जन्माची नोंद होवून तसा जन्म दाखला मिळणेकामी जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये सामनेवाला यांना आदेश होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, अर्जदार श्री. संजय आप्पा उर्फ गणपतराव शिंदे यांचा जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत असल्यास अथवा सदर अर्जाचे पृष्ठयर्थ अथवा विरुध्द कोणाचे काही म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांच्या आत इकडील न्यायालयात स्वतः अथवा आपल्या विधिज्ञामार्फत सबळ पुराव्यानिशी हजर राहून आपले म्हणणे मांडावे मुदतीत कोणाचीही काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही, असे समजून अर्जाच्या चौकशीअंती श्री. संजय आप्पा उर्फ गणपतराव शिंदे यांच्या जन्म तारखेची नोंद होऊन तसा जन्म दाखला देण्याचा आदेश मंद्रूप ग्रामपंचायतीस देण्यात येईल. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती, तक्रारी अथवा म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

हे आज दि.०४/१२/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाच्या शिक्याने प्रसिध्दी केले असे.

**सही/-**
**(सुमित नरहरे)**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा अपर तहसिलदार मंद्रूप.**
**ता. दक्षिण सोलापूर.**

## जाहीर प्रगटन

पुढील नेमली ता. ९/१/२०२६
दि.कि.अ.नं. ५२/२०२५

### बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठस्तर यांचे न्यायालयात

**वसंत गणपत राऊत,** वय ५८ वर्षे, धंदा-केश कर्तनालय, रा. तेरणा कॉलेजजवळ, दत्तनगर, उस्मानाबाद ह.मु. चोरमुले प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, **अर्जदार**
**विरुध्द**
१) **राम गणपत राऊत,** वय ७१ वर्षे, धंदा-न्हावी, रा.२७१५, नवी चाटेगल्ली, वाशी, ता. बाशी,
२) **गोदावरी उर्फ सुमती भ्र. पांडुरंग काळे,** वय ८६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. श्वेता अपार्टमेंट, सोळंगी, जळोची भिगवणरोड, बारामती, जि.पुणे **सा.वाला**
३) **सरस्वती मधुकर काळे,** वय ७९ वर्षे, धंदा-घरकाम, रा. सावरकर चौक, नवीचाटे गल्ली, बार्शी, ता. बार्शी,
४) महानंदा किशोर डाके, वय ५९ वर्षे, धंदा घरकाम, रा. जिजामातानगर, तुळजापूर ता. तुळजापूर, जि. धाराशिव

ज्याअर्थी अर्जदार वरील नमूद ठिकाणचा रहिवासी असून सा.वाला नं.१ अर्जदाराचा सख्खा भाऊ आहे सा.वाला नं.२ ते ४ या अर्जदाराच्या बहिणी आहेत. अर्जदाराचे वडिल गणपत गंगाराम राऊत हे दि. १३/०२/१९६७ रोजी बार्शी येथे मयत झाले तसेच यातील अर्जदार व सा.वालाची आई आवडाबाई गणपत राऊत या दि.२७/६/२००७ रोजी बार्शी येथे मयत झाली. मयत गणपत व आवडाबाई राऊत यांना यातील अर्जदार व सा.वाला हे कायदेशीर वारस आहेत असे कथन करुन अर्जात नमूद मिळकतीस सा.वाला बरोबर अर्जदाराची नोंद होणेकरीता अर्जदार व सा.वाला हे मयत अर्जदाराचे वडिल गणपत गंगाराम राऊत व आई आवडाबाई गणपत राऊत यांचे कायदेशीर वारस असलेबाबत हेअरशिप (वारस) प्रमाणपत्र मिळावे म्हणून अर्ज आणलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे कांही हरकती, तक्रारी असल्यास वा अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख ९/१/२०२६ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकती, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रगटन आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीखः ४/१२/२०२५

**सही/-** **कनिष्ठ लिपीक** **दिवाणी न्यायालय व स्तर, बार्शी**
**सही/-** **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय व स्तर, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीखः १/१/२०२६
दि.कि.अ.नं. ११७/२०२५
नि. नं. ५

### बार्शी येथील मे. अति. जिल्हा न्यायाधिश यांचे न्यायालयात

१) चि. सरफराज इसाक पठाण, वय १६ वर्षे. धंदा-शिक्षण. रा. किल्ला विभाग, करमाळा, ता. करमाळा.जि. सोलापूर अर्जदार नं.१ याचे अ.पा.क. जनक म्हणून जवळचे इष्टमित्र जनकआई अर्जदार नं. २ **-- अर्जदार**
२) सुजात इसाक पठाण, वय ५० वर्षे, धंदा-घरकाम व शेती. रा. वरीलप्रमाणे
विरुध्द
महाराष्ट्र सरकार **-- सामनेवाला**

ज्याअर्थी डि.सोलापूर सब डि.व ता. करमाळा यापैकी शहर करमाळा नगरपरिषद हद्दीतील घरजागा याचा सि.स.नं. ३९५४/२/P४२ क्षेत्र ९०.०४ चौ.मी. यासी चतुःसिमा पुर्वेस-सि.स.नं. ३९५४/२/४३, दक्षिणेस-वागणुकीचा रस्ता, पश्चिमेस-सि.स.नं.३९५४/२/४१, उत्तरेस-सि.स.नं. ३९५४/२/४७ येणेप्रमाणे घरजागा आतील तद्ंगभूत वस्तुसह

वर नमूद केलेली मिळकत अज्ञान अर्जदाराचे मालकी कब्जे वहिवाटीची व हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत असून सदर मिळकत अज्ञान अर्जदाराचे अ.पा.क. आईनी अज्ञान अर्जदाराचे भविष्यातील शिक्षण व गरजा याचा विचार करुन सदर मिळकत विक्री करणेचे ठरवले व योग्य किंमत आलेने सदर व्यवहार अज्ञानाचे हिताचा आहे तथापी, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने सदर व्यवहारास मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदरील कृती ही योग्य व गरजेची असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अज्ञान अर्जदाराचे वतीने तिचे पालनकर्ते आईनी या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करणेस परवानगी मागणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी संबंधाने कोणाचे कांही हरकती असल्यास वा अन्य कोणाचे कांही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर पुढील नेमली तारीख १/१/२०२६ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर माहितगार वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे हरकती, सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. कोर्टाचे प्रकरणी पुढील यथायो आदेश होतील.

हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीखः ०४/१२/२०२५

**सही/-**
**अधिक्षक**
**अपर जिल्हा न्यायालय, बार्शी**

## सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील ग्रा.बि.शेती सह. पतसंस्था मर्या., शंकरनगर-अकलुज ता. माळशिरस, जि. सोलापूर.

**ताबा नोटीस नमुना झेड** (Z NOTICE)

म.स.सं. अधिनियम १९८० नियम १९८१ मधील नियम १०७ (११) (ड) (१)

**स्थावर मालमत्तेचा सिम्बॉलीक ताबा घेतल्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी मला प्राप्त म.स.सं. कलम १५६ च्या अधिकारानुसार मी वसुली व विक्री अधिकारी सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या, शंकरनगर-अकलुज ता. माळशिरस यांच्या खालील थकबाकीदारास म.स.सं. अधिनियम १९६० नियम १९६१ अन्वये मागणी नोटीसद्द्वारे त्यांच्याकडील येणे रक्कम भरण्यास कळविले होते. तरीही त्यांनी रक्कम भरण्यास कसुर केल्याने त्यांच्या स्थावर मालमत्ता जप्त केल्या आहेत. ऋणकोंना नोटीस देण्यात येते की, खाली निर्देशित केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करणारे अधिकारी यांनी म.स.सं.अधिनियम १९६१ मधील नियम १०७ (१०) व १०७ (११) (ड) (१) नुसार रितसर बोजा नोंद करून झेड नोटीसद्वारे सिम्बॉलीक ताबा घेतलेला आहे. विशेष करून ऋणको व तमाम नागरिकांना या नोटीसव्दारे सावध करण्यात येते की, या स्थावर मालमत्तेबाबत कोणीही खरेदी विक्री, गहाण खत, दान, टाच, बोजा किंवा इतर हक्कात व्यवहार करू नयेत यावर कोणी कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास सहकार महर्षि शंकरराव मोहिते पाटील ग्रा. बि. शेती सह. पतसंस्था मर्या., शंकरनगर-अकलुज ता. माळशिरस जि. सोलापूर यांच्या खाली दर्शविलेल्या येणे बोजांची रक्कम व त्यावरील होणारे व्याज, वसुली अधिकारी अंशदान, अनुशंगीक खर्चास कायदेशिररित्या अधिन रहावे लागेल यांची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कर्जदारांचे नांव व जामिनदारांचे नांव | मिळकतदारांचे नांव | दाखला क्र. व दिनांक | झेड नोटीस रक्कम रु दि. ३१/०७/२०२३ येणेबाकी | मिळकत ठिकाण | गट.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संभाजी धोंडीबा रणपिसे<br>जा. १) श्री. दत्तात्रय मल्हारी कांरडे<br>जा २) सौ. हौसाबाई मल्हारी कारंडे<br>जा.३) श्री. प्रकाश हिरालाल वेळापुरे | जा. १) श्री. दत्तात्रय मल्हारी कांरडे | ६२७/१५<br>दि. १६/०४/२०१६ | २,११,६४६/- | बावडा<br>ता. इंदापुर जि. पुणे | ७८२ | ०.४६. आर. पै. |
| २ | २) श्री आण्णा पांडुरंग खुरंगे<br>जा. १) श्री. विलास हनुमंत माने<br>जा. २) श्री रामचंद्र दादा अनपट | श्री आण्णा पांडुरंग खुरंगे<br>श्री रामचंद्र दादा अनपट | ८९६/१३<br>दि. ०४/०८/२०१४ | ४,३७,०३८/- | लाखेवाडी<br>ता. इंदापुर जि. पुणे<br>भोडणी<br>ता. इंदापुर जि. पुणे | ८३१/२<br>८५०<br>२०७<br>२५२ | २ हे ०२ आर<br>०.८६. हे. आर<br>१.४९. हे. आर<br>०.८०. आर |
| ३ | दादासो किसन भोसले<br>जा १) श्री. नारायण दगडू जाधव<br>जा २) श्री. जालिंधर यशवंत वाघ<br>जा ३) श्री. समिर रामभाऊ बागल | श्री. नारायण दगडू जाधव | ७६४/१५<br>दि. २४/०१/२०१४ | ५,२४,१८०/- | निरनिमगांव<br>ता. इंदापुर जि. पुणे | २२७/१/ब | ०.८२. हे. आर |
| ४ | संजय भागवत सुतार<br>जा १) श्री. एकनाथ रामचंद्र सुतार<br>जा २) श्री. विठ्ठल देवराव सुतार<br>जा ३) श्री. भागवत बाबुराव सुतार | श्री. भागवत बाबुराव सुतार | ९२५/०८<br>दि. १२/०८/२००९ | १,३६,६१२/- | ओझरे<br>ता. इंदापुर जि. पुणे | ४४/२/क<br>४४/३/ब | १.०० हे. आर<br>१.०० हे. आर |
| ५ | सौ इंदुबाई संभाजी रणपिसे<br>जा. १) श्री. शरद भानुदास घोंगरे | श्री. शरद भानुदास घोंगरे | ५०६/१५<br>दि. २९/०९/२०२५ | १,२५,७०५/- | बावडा<br>ता. इंदापुर जि. पुणे | ८३०<br>८३१ | ०.०३ हे. आर<br>०.५३.५० हे. आर<br>(पो. ख. ०.०४) |

ही ताबा नोटीस दिली असे.
दि. ०९.१२.२०२५

सील

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**स.म.शं.मो.पा.ग्रा.बि.शेती.स.ह.पत.मर्या., शंकरनगर,**
**अकलूज ता. माळशिरस, जि. सोलापूर**

## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) यांना त्यांच्याकडून देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू होणाऱ्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १४३६२७४०८ | मालमत्ता तारण कर्ज | १. सुरज बापूराव कदम<br>२. कदम सविता बापूराव | ३०.१०.२०२५ | रुपये ५,८८,०४५.९०/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** ग्रामपंचायत मिलकट क्रमांक ७६७ चे संपूर्ण भाग आणि पार्सल, २७१ चौ. मीटरच्या आसपास, निवासी घर हविनर क्षेत्र ९३६ चौ. फूट (३६x२६) आणि खुली जागा (बरखल जगा) क्षेत्रफळ १९८० चौ. फूट (६०x३३) असलेले गावः कुरबावी, तालुकाः माळशिरस, जिल्हाः सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०९, श्री. सूरज बापूरव कदम यांच्याकडे असलेली मालमत्ता आणि सामूहिक एकत्रित सीमा खालीलप्रमाणे आहेतः- पूर्वः नारायण गणपत कदम पश्चिमः रस्ता उत्तरः बाळासो गणपत कदम दक्षिणः जयराम गणपत कदम | | | | | |
| 2 | १२२६५१६२२ | मालमत्ता तारण कर्ज | १. वाकडे दामाजी येताळा<br>२. येताळा बापू वाकडे<br>३. माधुरी दामाजी वाकडे | २६.११.२०२५ | रुपये १९,४०,४०६.५१/- |
| **मालमत्तेचा पत्ताः** सी.टी.एस. क्रमांक ४५१, एकूण ८३.७० चौ. मीटर, नगरपरिषदेच्या मंगळवेढा, उप-विभाग मंगळवेढा, विभागः सोलापूर, सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०५ च्या हद्दीत स्थित, मालमत्तेचा तो सर्व तुकडा आणि पार्सल. पूर्वः सी.टी.एस. क्रमांक ४५१, पश्चिमः सी.टी.एस. क्रमांक ४५३, दक्षिणः सी.टी.एस. क्रमांक ४५२, उत्तरः रस्ता | | | | | |

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक : ०९/१२/२०२५
ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### लग्न मोडल्यानंतर स्मृती पुन्हा सरावात



**मुंबई :** संगीतकार पलाश मुच्छलसोबतचे आपले लग्न रद्द झाल्याची पुष्टी केल्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मंधना एका दिवसाने सराव मैदानावर परतली. एका खाजगी सुविधेत स्मृती ट्रेनिंग जर्सी घालून व पॅडिंग करून फलंदाजी करताना दिसली. तिचा भाऊ श्रवण मंधाना याने इन्स्टाग्रामवर स्टार क्रिकेटपटूचा ॲक्शनमध्ये असलेला फोटो समाज माध्यमात सामायिक केला, त्यासोबत हार्ट इमोजी देखील होत्या. हा फोटो झटपट व्हायरल झाला, अनेकांनी कठीण काळात मैदानात परतण्यासाठी स्मृतीच्या समर्पणाचे कौतुक केले. भारताच्या महिला विश्वचषक २०२५ च्या विजयात अविभाज्य भूमिका बजावणारी स्मृती २१ ते ३० डिसेंबर दरम्यान घरच्या मैदानावर श्रीलंकेविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत स्पर्धात्मक सामन्यात परतणार आहे. हे सामने विशाखापट्टणम् आणि तिरुवनंतपुरममध्ये खेळविले जातील आणि पुढील वर्षीच्या टी-२० विश्वचषकासाठी भारताची तयारी म्हणून काम करतील.

# भारत, दक्षिण आफ्रिका टी-२० सामना आज

### गिल, हार्दिकचे पुनरागमन

### टी-२० विश्वचषकाच्या तयारीला सुरुवात



कटक येथे पहिल्या टी-२० सामन्याची तयारी करताना भारतीय क्रिकेटपटू

**भारत, दक्षिण आफ्रिका पहिला टी-२० सामना**
**स्थळ :** बाराबती स्टेडियम, कटक
**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

◆ **कटक, ८ डिसेंबर**

मंगळवारपासून येथे भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेला प्रारंभ होणार आहे. या पहिल्या सामन्यासह भारतीय संघ टी-२० विश्वचषकाच्या तयारीला सुरुवात करणार आहे. या सामन्याच्या माध्यमातून शुभमन गिल व हार्दिक पांड्या पुनरागमन करणार आहे.

पहिल्या टी-२० सामन्यापूर्वी गिल व पांड्या निरोगी व तंदुरुस्त दिसत आहेत, असे भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला. कोलकाता येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यादरम्यान गिलच्या मानेला दुखापत झाली होती, तर सप्टेंबरमध्ये आशिया चषकादरदरम्यान झालेल्या दुखापतीमुळे हार्दिक संघाच्या बाहेर होता.

ही टी-२० मालिका फेब्रुवारीतील टी-२० विश्वचषकासाठी भारताच्या औपचारिक तयारीची सुरुवात आहे. ७ फेब्रुवारी रोजी वानखेडे येथे अमेरिकेविरुद्ध टी-२० विश्वचषक जेतेपदाच्या बचावाची सुरुवात करण्यापूर्वी भारतीय संघ १० टी-२० सामने खेळणार आहे, यात पाच सामने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आणि त्यानंतर पाच सामने न्यूझीलंडविरुद्ध खेळणार आहे. या दोन्ही मालिकेदरम्यान भारत आपल्या संघाची उत्तम बांधणी करेल व कामगिरीत सुधारणा करतील आणि घरच्या प्रेक्षकांसमोर अपेक्षांचे वजन वाहून नेणाऱ्या अंतिम एकादशला निश्चित करतील.

गत वर्षीच्या टी-२० क्रिकेटमध्ये विश्वचषक विजयानंतर भारत एक मजबूत टी-२० संघ राहिला व भारताने सलग आठ सामने जिंकून जेतेपद पटकावले.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात स्वीपचा फटका मारण्याचा प्रयत्न करताना गिलच्या मानेला दुखापत झाली व त्यामुळे तो सुमारे महिनभर क्रिकेट खेळू शकला नव्हता. आता गिल पूर्णपणे तंदुरुस्त आहे व तो पुनरागमन करीत आहे.

गत आयपीएलपासून अविश्रांतपणे क्रिकेट खेळल्यानंतर भारतीय क्रिकेटपटूंच्या वर्कलोड व्यवस्थापनावर बारकाईने लक्ष ठेवले जाईल, पण ३३ टी-२० सामन्यांमध्ये २९.८९ च्या सरासरीने ८३७ धावा करणाऱ्या गिलसाठी, ही मालिका आयसीसी स्पर्धेच्या तयारीसाठी महत्त्वाची ठरते. अभिषेक शर्मासोबत त्याचे पुनर्मिलन एक उच्च-प्रभावशाली सलामी जोडी परत आणते.

**सूर्यकुमारचा फॉर्म**

या मालिकेपूर्वीची एक मुख्य चर्चा म्हणजे कर्णधार सूर्यकुमार यादवचा दीर्घकाळ चाललेला वाईट फॉर्म आहे. यष्टिरक्षक-फलंदाजच्या जागेसाठी संजू सॅमसन व जितेश शर्मा यांच्यात चुरस आहे. सॅमसनला तिसऱ्या क्रमांकावर बढती देण्यात आली, त्यानंतर जितेशला शेवटच्या तीन टी-२० सामन्यांसाठी पाठिंबा देण्यात आला. ◂(वृत्तसंस्था)



## आशा मराठी व सादूल प्रशालेत क्रीडा सप्ताहास सुरुवात

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

भारत शिक्षण प्रसारक मंडळ (अल्पसंख्याक) संस्था संचलित आशा मराठी विद्यालय व श्री धर्मण्णा सादूल प्रशालेच्या क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली.

याचे उद्घाटन महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहराध्यक्ष महेश गादेकर यांच्या हस्ते झाले. नीलम नगर येथील शाळेच्या क्रीडांगणात आयोजित क्रीडा सप्ताह उद्घाटन कार्यक्रमात गादेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. क्रीडा सप्ताह शनिवार, १३ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार असल्याची माहिती संस्थेचे सचिव आसिफ पठाण यांनी यावेळी दिली. कार्यक्रमाला सेवानिवृत्त एएसआय पीरअहमद सय्यद, आशा मराठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तस्लीमबानो पठाण, श्री धर्मण्णा सादूल प्रशालेच्या मुख्याध्यापिका आफरीन सय्यद आदी उपस्थित होते. गादेकर यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून क्रीडा सप्ताहाचा प्रारंभ झाला. यानंतर गादेकर यांनी टॉस उडवून खो-खो स्पर्धेचे उद्घाटन केले आणि खेळाचा आनंदही घेतला. आसिफ पठाण यांनी त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाच्या यशासाठी स्काऊट-गाईड व आरएसपी विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीशैल जळकोटे यांनी तर राजअहमद शेख यांनी आभार मानले.

## अक्कलकोटमध्ये आजपासून डॉजबॉल, टेनिस व्हॉलीबॉल, पेंटॅक्यू, सॉफ्टफुटबॉल स्पर्धा

**सोलापूर, दि. ८ सप्टेंबर-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट व सोलापूर जिल्हा सॉफ्टफुटबॉल, टेनिस व्हॉलीबॉल, पेंटॅक्यू व डॉजबॉल असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने सब ज्युनियर, ज्युनियर व सीनियर अशा ४ खेळांच्या मुले व मुली आणि पुरुष व महिलांच्या नऊ गटाच्या राज्य स्पर्धेचे आयोजन ९ ते ११ डिसेंबर दरम्यान राजेफत्तेसिंह मैदान अक्कलकोट येथे केले आहे. या स्पर्धेसाठी प्रत्येक खेळाचे तीन मैदान तयार केली असून या स्पर्धा साखळी व बाद पद्धतीने होतील. या स्पर्धेचे उद्घाटन आमदार सचिनद कल्याणशेट्टी यांच्या हस्ते, तसेच श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे. नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी, युवा नेते प्रथमेश इंगळे, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले हे उपस्थित राहतील. बक्षीस समारंभ पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते व माजी नगरसेवक सीए विनोद भोसले, सॉफ्टबॉलचे जिल्हाध्यक्ष सिद्धेश्वर पाटील, राष्ट्रीय उपाध्यक्ष वैजिनाथ हत्तुरे, पेट्यांक्यूचे जिल्हाध्यक्ष अभिनंदन राठोड, टेनिस व्हॉलिबॉलचे जिल्हाध्यक्ष कार्तिक चव्हाण, उपाध्यक्ष प्रा.संतोष गवळी, राज्य संघटनेचे माजी उपाध्यक्ष प्रा. नंदकिशोर देशपांडे हे उपस्थित राहणार आहेत.या स्पर्धेतील सर्व खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था ही श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान यांच्यावतीने करण्यात केली आहे, असे संयोजक प्रा. संतोष खेंडे यांनी कळविले आहे.



## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सरपडोह सलग तिसऱ्यांदा तालुका खो-खो स्पर्धेत विजयी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.८ डिसेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सरपडोहच्या खो-खो संघाने तालुका स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकाविले. त्यांचे मुख्याध्यापक श्रीकृष्ण अडसुळ, श्री. लोकरे, श्रीमती बडे, श्रीमती वणवे, श्रीमती कुलकर्णी या मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी तालुका बुद्धीबळ स्पर्धेत द्वितीय क्रमांक आल्याबद्दल साक्षी खराडे हिचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून उपसरपंच नाथाराव रंदवे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब महाडीक, प्रगतीशील बागायतदार शरद घोगरे, माजी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य मनोहर रंदवे, तंटा मुक्त समिती अध्यक्ष नागनाथ भिताडे आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या प्रगती सोलनकर, गार्गी फुले, काव्या देशमुख यांची आगेकूच

### एमएसएलटीए एआयटीए महिलांच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस : तेलंगणाच्या अंजली मेकाचा सनसनाटी विजय



प्रगती सोलनकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर -**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने (एसडीएलटीए) यांच्या वतीने आयोजित व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना पुरस्कृत व अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेच्या अधिपत्याखाली महिलांच्या १ लाख बक्षीस रकमेच्या राष्ट्रीय मानांकन लॉन टेनिस (एकेरी व दुहेरी) स्पर्धेत पहिल्या फेरीत तेलंगणाच्या अंजली मेकाने गुजरातच्या पाचव्या मानांकित माही त्रिवेदीचा ६-२, ७-५ असा पराभव करून सनसनाटी निकाल नोंदवला.

जिल्हा क्रीडा संकुल येथील एम.एस.एल.टी.ए टेनिस सेंटरच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत पहिल्या फेरीत सोलापूरच्या प्रगती सोलणकरने धनश्री पाटीलचा टायब्रेकमध्ये ६-०, ७-६(०) असा तर, चौथ्या मानांकित श्रुती नानजकरने हृदया सिंगचा ६-३, ६-१ असा पराभव करून दुसरी फेरी गाठली. पुण्याच्या गार्गी फुले हिने उत्तरप्रदेशच्या ब्युटी वर्माचे आव्हान ६-०, ६-० असे सहज मोडीत काढले. पुण्याच्या काव्या देशमुखने अनुपमा दराडेवर ६-३, ६-३ असा विजय मिळवला.

**निकाल: मुख्य ड्रॉ: पहिली फेरी:** हसिनी दावुनाबोइना(१) (तेलंगणा) वि.वि. निकिता सोम(उत्तरप्रदेश) ६-०, ६-०; प्रगती सोलणकर(महाराष्ट्र)वि.वि.धनश्री पाटील(महाराष्ट्र) ६-०, ७-६(०); कीर्थना रागिनेनी(६) वि.वि.सुब्रमण्यम महानिया(तामिळनाडू) ६-०, ६-१; श्रुती नानजकर(४)(महाराष्ट्र)वि.वि. हृदया सिंग(महाराष्ट्र)६-३, ६-१; गार्गी फुले (महाराष्ट्र)वि.वि. ब्युटी वर्मा (उत्तरप्रदेश) ६-०, ६-०; काव्या देशमुख (महाराष्ट्र)वि.वि. अनुपमा दराडे(महाराष्ट्र) ६-३, ६-३; रेश्मा छल्लारापू(७)(आंध्रप्रदेश)वि.वि. श्रीमोयी कामत(महाराष्ट्र)६-१, ६-१; अंजली मेका(तेलंगणा) वि.वि.माही त्रिवेदी(५)(गुजरात) ६-२, ७-५; अपेक्षा रेड्डी कांदाडी (तेलंगणा)वि.वि. पूजा पन्नेरकुमार ०-६, ६-०, ७-५; श्लोका दुग्याला(तेलंगणा)वि.वि. प्राची सतीश(महाराष्ट्र) ६-३, ७-५; थानिया गोगुलामंदा(३)(तेलंगणा) वि.वि. श्रीनिती साई पाटोजू(तेलंगणा) ६-१, ६-१; लक्ष्मी अरुणकुमार(८)(तामिळनाडू)वि.वि. दिया विवेकानंदन(तामिळनाडू) ६-३, ६-१.



## सोलापूर विद्यापीठास ॲथलेटिक्समध्ये मुलांच्या गटात सर्वसाधारण विजेतेपद

### राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव : ८ पैकी ७ खेळात निराशा

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे झालेल्या २७व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने ॲथलेटिक्स मुलांच्या गटात सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.

या महोत्सवात विद्यापीठाचे ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, व्हॉलिबॉल, कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन, टेबल-टेनिस व बुद्धिबळ या ८ खेळांचे पुरुष व महिलांचे १६ संघ सहभागी झाले होते. परंतु ॲथलेटिक्स वगळता राहिलेल्या ८ खेळात विद्यापीठाचे संघ पदकापर्यंत मजल मारू शकले नाहीत. ॲथलेटिक्सच्या संघास मार्गदर्शक डॉ. किरण चोकाककर, डॉ. अशोक पाटील आणि संघ व्यवस्थापक प्रा. धनंजय देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

**कामगिरी सुधारत १७ पदकांची कमाई**

विद्यापीठाने गतवर्षी ॲथलेटिक्समध्ये २ सुवर्ण, ३ रौप्य व २ कांस्य अशी ७ पदकांची कमाई केली आहे. यंदाही ॲथलेटिक्समध्ये खेळाडूंनी कामगिरी सुधारत सांघिक रिलेसह विद्यापीठाच्या खेळाडूंनी १० सुवर्ण, ४ रौप्य व ३ ब्राँझ अशी १७ पदकांची कमाई केली आहे. विद्यापीठाच्या सराव शिबिरात खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक यांनी कामगिरी सुधारण्यासाठी कष्ट घेतल्यामुळे हे यश मिळाले.

**-बाळासाहेब वाघचवरे, समन्वयक, आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव**

**खेळाडूंची कामगिरी :** विनीत दिनकर(३ सुवर्ण), सुजाता बाबर (१ सुवर्ण), निरज महानवर (१ सुवर्ण), आकांक्षा गावडे (१ सुवर्ण, १ रौप्य), हर्ष राऊत (१ सुवर्ण, १ रौप्य, १ कांस्य), श्रीराम थिटे (१ सुवर्ण), अरबाज शेख (१ सुवर्ण), अशरफ शेख (१ सुवर्ण), ईश्वर झिरवळ (१ रौप्य), प्रणीत जाधव ( १ रौप्य), दाजी हुबळे (१ कांस्य), राहूल धोत्रे (१ कांस्य),

## उद्या बार्शीत छत्रपती शिवशंभू श्री शरीरसौष्ठव स्पर्धा

**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

सोलापूर, धाराशिव व लातूर जिल्हा मर्यादीत छत्रपती शिवशंभू श्री शरीर सौष्ठव स्पधचे आयोजन बार्शीत बुधवार १० डिसेंबर रोजी केले आहे. ही स्पर्धा श्री दत्त यात्रा महोत्सवनिमित्त छत्रपती फिटनेस क्लब अँड जिम, छत्रपती प्रतिष्ठान कुसळूब व मित्र परिवार जिल्हा शरीर सौष्ठव संघटना यांच्या सहकार्याने व कृष्णा काशीद आणि हर्षवर्धन पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित केली आहे. ही स्पर्धा ६ वजनी गटात ५५, ६०, ६५, ७०, ७५ व ७५ किलोवरील गटात होईल. प्रत्येक गटात ४ बक्षीसे असून ३,२.५,१.५ व १ हजार तर बेस्ट पोझर व इम्प्रूव्हसाठी प्रत्येकी एक हजार आणि ''छत्रपती शिव शंभो श्रीला ११ हजार रुपये व सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे. स्पर्धकांना एका बाजूचा प्रवास खर्च व रात्रीचे भोजन देण्यात येणार आहे. स्पर्धकांनी स्पर्धेच्या ठिकाणी वजन तपासणीसाठी ४ वाजता उपस्थित राहावे. नोंदणीसाठी प्रमोद काटे (९४२२३८००३३) अथवा नजीर शेख (९३२५२३८६१८) यांच्याशी स्पर्धकांना भाग घेण्याचे आवाहन जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजकुमार सूरवसे यांनी केले आहे.

# कुमारांचे राज्य अजिंक्यपद धाराशिवला तर मुलींचे सांगलीला





### ५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा

### धाराशिवचा जितेंद्र वसावे 'विवेकानंद' पुरस्काराचा तर सांगलीची सानिका चाफे 'सावित्री' पुरस्काराची मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**अहिल्यानगर, दि. ८ डिसेंबर-**

५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेचा रोमांचक समारोप झाला. कुमार गटात धाराशिवने सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्यपद पटकावत इतिहास रचला, तर मुली गटात सांगली जिल्ह्याने अप्रतिम खेळ करत विजेतेपद नावावर केले. या स्पर्धेत धाराशिवचा जितेंद्र वसावे व सांगलीची सानिका चाफे यांनी अनुक्रमे विवेकानंद व सावित्री या सर्वोत्कृष्ट अष्टपैलू पुरस्कारांवर आपली मोहोर उमटविली.

**मुली : सांगलीचा जिद्दी विजय**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले युवा प्रतिष्ठान, विश्वंभरा प्रतिष्ठान व बाणेश्वर क्रीडा मंडळ बुऱ्हाणनगर यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली होती. अहिल्यानगर येथील श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बुऱ्हाणनगर येथे झालेल्या या स्पर्धेत उपांत्य फेरीत गतविजेत्या धाराशिवला पराभूत करणाऱ्या ठाणे जिल्ह्याचा आत्मविश्वास उंच होता, परंतु अंतिम सामन्यात सांगलीने अद्भुत प्रतिकार करत ३०-२८ ने विजय मिळवला. मध्यंतरास सांगलीकडे १६-१२ अशी आघाडी होती आणि ती त्यांनी अखेरपर्यंत सांभाळली. त्यांच्या सानिका चाफेने २.२७ व २.३० मिनिटे संरक्षण, ८ गुण अशी जबरदस्त अष्टपैलू कामगिरी केली. श्रावणी तामखेडे (२.३० नाबाद व १.१८ मिनिटे संरक्षण.) सानिया सुतार व विद्या तामखेडेने प्रत्येकी ४ खेळाडू बाद केले. तर पराभूत ठाण्याकडून ठाण्याकडून प्रणिती जगदाळेने आपल्या धारदार आक्रमणात आठ खेळाडू बाद करताना संरक्षणात २.१० व १.४० मि. संरक्षण अशी भक्कम बाजू सांभाळली. धनश्री कंक (१.५०, २ मि. संरक्षण) व दीक्षा काटेकर (१.१०, २.०७ मिनिटे संरक्षण व २ गुण ) यांनी उत्कृष्ट खेळ केला. श्रुती चोरमारे व अक्षरा भोसले यांनी आक्रमणात प्रत्येकी ४-४ खेळाडू बाद केले. श्रुतीने १.१० मिनिटे पळतीही केली. परंतु यांची खेळी ठाण्यास विजय मिळवून देऊ शकली नाही.

**वेळापूरचा शंभूराज चंदशिव सर्वोत्कृष्ट आक्रमक**



या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट आक्रमक खेळाडूचा मान सोलापूर जिल्हा संघातील वेळापूरचा शंभूराज चंदनशिव याने मिळविला. अन्य सर्वोत्कृष्ठ खेळाडू असे : अष्टपैलू : जितेंद्र वसावे (धाराशिव), सानिका चाफे (सांगली). आक्रमक : प्रणिती जगदाळे (ठाणे) संरक्षक : सोत्या वळवी (धाराशिव), श्रावणी तामखेडे (सांगली).

**कुमार : धाराशिवची दणदणीत खेळी, सोलापूरला नमिवले**

गतविजेते धाराशिवने सोलापूरवर २६-२० असा विजय मिळवत पुन्हा विजेतेपदाला गवसणी घातली. मध्यंतरासच १६-८ अशी आघाडी घेत संघाने सामन्यावर पकड मजबूत केली. त्यांच्या जितेंद्र वसावे (१.३० मि. संरक्षण व ६ गुण), सोत्या वळवी (नाबाद १, २.२० मि. संरक्षण व ४ गुण), राज जाधव (१.४६ मि. संरक्षण व ४ गुण) तर पराभूत सोलापूरकडून शंभूराज चंदनशिव (१.१९ मि. संरक्षण व ६ गुण), सिद्धार्थ माने देशमुख (१.५१ मि. संरक्षण व ४ गुण), अरमान शेख (१.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांची लढाऊ अष्टपैलू कामगिरी संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. या स्पर्धेचे बक्षीस वितरण पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा बँकेचे संचालक अक्षय कर्डिले, शीतल जगताप, डॉ. महेश मुळे, बाणेश्र चेमटे, सरपंच रावसाहेब कर्डिले, सीए अध्यक्ष राजेंद्र काळे, मनीषा बारस्कर, चेअरमन संभाजी कर्डिले, ज्ञानेश्वर जाधव, बाळासाहेब कर्डिले, सुधीर दुसंगे, उज्ज्वला चेमटे यांच्यासह महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस डॉ. चंद्रजित जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांच्या हस्ते पार पडले. त्यावेळी तसेच अनेक पदाधिकारी, कार्कर्ते व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.

# १९ साखर कारखान्यांनी केला दर जाहीर; आणखी १५ कारखान्यांकडून प्रलंबित

**जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी घेतली गंभीर दखल**

**ऊस दर जाहीर करण्यास दोन दिवसांची डेडलाईन**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ डिसेंबर-**

यंदाचा गळीत हंगाम सुरु होऊन सव्वा महिना उलटल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील १९ साखर कारखान्यांनी ऊसदर जाहीर केला आहे. आणखीन १५ साखर कारखानदारांनी ऊस दर जाहीर केला नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी गंभीर दखल घेतली, अशी माहिती उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली. दरम्यान, येत्या एक-दोन दिवसात उर्वरित साखर कारखान्यांनी ऊसदर जाहीर करावा अन्यथा कडक कारवाईला सामोरे जावे लागणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दि. १४ नोव्हेंबर आणि दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी ऊस दर जाहीर करण्यासाठी साखर कारखानदारांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात बैठका घेतल्या होत्या. या बैठकात साखर कारखानदारांनी ३० नोव्हेंबरपर्यंत ऊसदर जाहीर करणार असल्याचे सांगत गाळपास आरंभ केला होता.

मात्र जिल्ह्यातील आणखीन १५ साखर कारखान्यांनी अद्याप ऊसदर जाहीर केला नाही. एकीकडे जिल्हाधिकारी आशीर्वाद हे ऊस दर जाहीर करण्याचे आवाहन करीत असताना दुसरीकडे शेतकरी संघटना दराबाबत आक्रमक होत असतानाचे चित्र आहे.

सोलापूर जिल्ह्यातील ३४ साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू झाला आहे. काही कारखाने ऑक्टोबर अगोदर तर काही कारखाने ऑक्टोबर महिन्यात ऊस गाळप सुरू केले आहे. तर काही कारखान्यांनी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात गाळप सुरू केले आहे. गाळप सुरू असले तरी साखर कारखानदार ऊस दर जाहीर करीत नाहीत व जाहीर केल्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करीत नसल्याचे चित्र आहे.

सुरुवातीला माढा, माळशिरस व पंढरपूर तालुक्यातील सात-आठ साखर कारखानदारांनी ऊस दर जाहीर केला. आता पुन्हा ९-१० साखर कारखान्यांनी ऊस दर जाहीर केल्याने ऊस दर जाहीर केलेल्या कारखान्यांची संख्या १९ वर गेली आहे.

ऊस दर जाहीर केलेल्या सर्वच साखर कारखान्यांचा प्रति टन २,८०० ते ३,००० रुपयांपर्यंत दर आहे.

### दर जाहीर न केलेले कारखाने

श्री सिध्देश्वर सहकारी-कुमठे, श्री संत दामाजी-मंगळवेढा, लोकनेते, अनगर, लोकमंगल बिबीदारफळ, लोकमंगल भंडारकवठे, सिध्दनाथ शुगर-तिऱ्हे, इंद्रेश्वर शुगर-उपळाई, युटोपिअन शुगर-मंगळवेढा, गोकुळ शुगर- धोत्री, जयहिंद शुगर-आचेगाव, व्हीपी शुगर-तडवळ, भीमा सहकारी-टाकळी सिकंदर, सहकार शिरोमणी-चंद्रभागानगर, धाराशिव शुगर-वाकी शिवणे, आवताडे शुगर-नंदूर.

### या साखर कारखान्यांनी केले दर जाहीर

पांडुरंग सहकारी साखर कारखाना, श्रीपूर २,८५५ रुपये, शंकर महर्षि अकलूज २८५०, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना पिंपळनेर २८५०, श्री. संत कुर्मदास, पडसाळी २८००, दी सासवड माळी शुगर माळीनगर २८००, ओंकार कार्पोरेशन म्हैसगाव ३०५०+१००, जकराया शुगर, वटवटे २८००, भैरवनाथ शुगर लवंगी २८००, रजवी ॲग्रो पॉवर लि. आलेगाव २८००+१००+१०१, बबनराव शिंदे तुर्कपिंपरी २८५०, ओंकार शुगर फॅक्टरी चंदापुरी ३०५०+१००, विठ्ठलराव शिंदे करकंब २,८५० रुपये, आस्टी शुगर २८००, सीताराम महाराज खर्डी २८०० (+), श्री शंकर सहकारी सदाशिवनगर २९००, श्री विठ्ठल सहकारी, पंढरपूर २८७५, विठ्ठल रिफाईंड शुगर २८५०, शिवगिरी ॲग्रो शुगर, ३००१ आणि येडेश्वरी ॲग्रो, खामगाव २८००.

### हे कारखाने झाले सुरु

आदिनाथ करमाळा, सहकार शिरोमणी वसंतराव काळे पंढरपूर, लोकशक्ती शुगर तेरामैल, इंद्रेश्वर शुगर उपळाई ठोंगे व मकाई करमाळा हे पाच साखर कारखाने अद्याप सुरू झाले नाहीत. यापैकी लोकशक्ती इंद्रेश्वर व सहकार शिरोमणी हे साखर कारखाने सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले. गोकूळ धोत्री, जयहिंद आचेगाव, सिद्धेश्वर सोलापूर व लोकमंगल बीबीदारफळ हे साखर कारखाने सुरू असले तरी त्यांनी गाळपाची माहिती भरली नसल्याचे साखर आयुक्त कार्यालयाकडून सांगण्यात आले.








# अवैध वाळू उपशावर महसूल व पोलिसांची कारवाई

**चिंचोली व इसबावीत लाकडी होड्या जाळल्या; आठ लाखांचे साहित्य जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ८ डिसेंबर -**

अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल पथकाने अवैध वाळू उपसा व वाहतूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या सात लाकडी होड्या तसेच थर्माकोलचे तराफे महसूल व पोलीस प्रशासनाच्या पथकाकडून नष्ट करण्यात आले असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. भीमा नदी पात्रातील चिंचोली भोसे येथे चार व इसबावी येथे तीन लाकडी होड्या तसेच पंढरपूर जवळील असणाऱ्या नगरपालिका बंधाऱ्यालगत वाळू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे थर्माकोलचे तराफे नष्ट केले आहेत.

सदरच्या दोन्ही कारवाई महसूल पथकाने सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० वाजताच्या दरम्यान केली. या कारवाईमध्ये सुमारे आठ लाख रुपये किमतीचे अवैध गौण खनिज वाहतुकीसाठी व चोरीसाठी वापरण्यात येणारे साहित्य नष्ट करण्यात आले आहे.

या कारवाईमध्ये मंडळ अधिकारी पंढरपूर विजय शिवशरण व ग्राम महसूल अधिकारी अमर पाटील, गणेश पिसे, प्रमोद खंडागळे, संजय खंडागळे, योगेश कदम, विराज लोटेकर, दिगंबर डोईफोडे, सुमित जाधव, नितीन कोलगे, सागर जगताप, समीर पटेल व महेश कुमार सावंत व पंढरपूर शहर पोलीस विभागातील श्री.पाटील व श्री.सर्जे हे सहभागी होते.

# बोगस मतदार नोंदणीचे लोण आता अक्कलकोटच्या सांगवीतही

**आधारकार्डमध्ये बदल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस; गुन्हा नोंदवण्याची मागणी**



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ डिसेंबर-**

सध्या देशभरात बोगस मतदारांवरून गदारोळ सुरू असताना अक्कलकोट तालुक्यातील सांगवी बु गावामध्ये आधार कार्ड एडिट करून बोगस मतदार नोंदणी करण्यात आल्याची धक्कादायक माहिती उघकीस आली आहे. याबाबत सर्व दोषीवर तात्काळ फौंजदारी गुन्हा दाखल करावा अन्यथा तहसीलदार कार्यालय येथे येत्या पाच दिवसात आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा मराठा सेवा संघ तालुका अध्यक्ष प्रविण घाटगे यांनी दिला.

याबाबत तालुकाध्यक्ष घाटगे, बबन गायकवाड, प्रदीप सलबत्ते यांनी याबाबतचे पुरावे उपजिल्हाधिकारी देशमुख व तहसीलदार विनायक मगर यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे दिले आहे. सांगवी बु मध्ये गेल्या सहा महिन्यापासून गावातील काही मुलाच्या मोबाईल वरून मतदार नोंदणी चे ६ नं फॉर्म भरण्यात आले होते. त्या फॉर्म भरतेवेळी गावातील रहिवाशी नसताना देखील त्यांचे आधार कार्ड व फोटो मागवून त्यांचे फॉर्म मोबाईल वरून भरण्यात आले. पण विशेष धक्कादायक बाब अशी कि, या सर्वांच्या आधारकार्डची समोरील बाजू एकाची आणि मागील बाजू दुसऱ्याची आणि मागील बाजूच्या आधारकार्डवर आधार नंबर देखील नसल्याचे उघड झाले. असे तब्बल १६० हुन अधिक बोगस मतदारांची नोंद स्थानिक तीन ते चार मुलांच्या मोबाईलच्या मध्यमातून बीएलओ अशोककुमार सुतार यादी भाग क्र १५२ यांच्या संगनमताने आर्थिक व्यवहार करून ही बोगस मतदार नोंदणी करण्यात आली आहे. त्या बोगस मतदारांची सर्व डुप्लिकेट आधारकार्ड व काहींचे वय देखील पूर्ण नसताना त्यांचे आधारकार्ड एडिट करून वय व पत्ता बदलेले असल्याचे पुरावे देखील जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना लेखी तक्रारी अर्जसोबत जोडले असून, मुंबई, भांडुप मतदार संघात देखील या बोगस मतदारांचे नावे असून, त्यांची यादी देखील पुरावा म्हणून जोडली आहे. मुंबई, पुणे व इतर गावामधील मतदार यादीत नाव असताना सांगवी बु मधील यादीत पत्ता एडिट करून सांगवी बु यादीत बोगस नावे कशी काय घालण्यात आली, याची कसून चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## महत्वाचे...

# चिंचोलीत जोशाबा संस्थेच्या वतीने व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**पांगरी,दि.८ डिसेंबर-**

बार्शी तालुक्यातील चिंचोली येथे जोशाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले स्मृतिदिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उदघाटन पांगरी पोलीस स्टेशनचे एपीआय हेमंत काटकर यांच्या हस्ते झाले.

प्रमुख वक्ते प्रदेशाध्यक्ष मराठा सेवा संघ व्यसनमुक्ती कक्ष प्रमुख डॉ.संदीप तांबारे हे उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मध्ये डॉ. शेषराव सानप, धनंजय गरड, अविनाश इंगोले, शंकर गोसावी, बाळराजे माढा, नानासाहेब चांदणे हे उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यानंतर जोशाबा संस्थेच्या वतीने प्रमुख उपस्थित संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व पत्रकार अनिल खुणे यांनी प्रास्ताविक केले.

डॉ. तांबारे यांनी आपल्या मनोगतात खरं आणि खोटं यामधील भेद दर्शवण्यासाठी महात्मा फुलेंनी शाळा चालू केल्या असे मनोगत व्यक्त केले. संजय खुणे, नितीन खुणे, महेश खुणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. चिंचोलीचे सरपंच अमर कसबे, उपसरपंच अजित शिंदे, राजाभाऊ शिंदे, धनंजय शिंदे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. किरण पवार यांनी सूत्रसंचालन केले. संजीव खुणे यांनी आभार मानले.

# जनहित शेतकरी संघटनेचे साखर आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत आंदोलन

**सोलापूर जिल्ह्यातील ऊस उत्पादकांना प्रति क्विंटल चार हजार दर देण्याची मागणी**



**मंगळवेढा दि.८ डिसेंबर**

सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांकडून ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याने याला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र जनहित शेतकरी संघटनेचे अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांच्यासह त्यांचे कार्यकर्ते पुणे साखर आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलनास बसले आहेत.

ऊस उत्पादक शेतकर्यांना जो पर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत आंदोलन करण्याची भूमिका आंदोलकांची आहे. साखर आयुक्तांनी साखर कारखानदारांना दर घोषीत न केल्याबद्दल नोटीसा देवून जाब विचारणे गरजेचे असताना साखर आयुक्त हे डोळ्यावर पट्टी बांधून काम करीत असल्याचा आरोप आंदोलकांचा आहे. साखर कारखाने सुरु होवून एक महिन्याच्यापुढे कालावधी उलटूनही कारखानदार चिडीचूप असल्याने जिल्ह्यातील कष्टकरी शेतकर्यावर घोर अन्याय होत असल्याचा आंदोलकांचे म्हणणे आहे. १५ दिवसात पहिला हप्ता देणे एफआरपी कायद्यानुसार बंधनकारक असताना या कायद्यालाही कोलदांडा घालण्याचा प्रयत्न कारखानदारांनी केला आहे. इतर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनी दर घोषीत केले. काही ठिकाणी ३ हजार ५०० रुपये मे.टन घोषीत करुन तेथील शेतकर्यांना कारखानदारांनी न्याय दिला आहे. सोलापूर जिल्हाच याला अपवाद का ठरतोय याचे आत्मपरिक्षण करण्याची वेळ सध्या आली आहे. शेतकरी हा रात्रंदिवस कष्ट करणारा माणूस असून ऊसाला १८ महिने संभाळावे लागत आहे. रात्रीचा दिवस करुन तो आपले ऊसाचे पिक जगवत असतो. सध्या बाजारात खताचे दर, नांगरट दर,मजूरी दर, लागवड दर, पाणी पट्टी आदींचा हिशोब केला असता तीन हजार रुपयेच्या आत दर शेतकर्यांना परडवत नसल्याने शेती उद्योग संकटात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारत देश हा कृषीप्रधान म्हणून ओळखला जात असताना इकडे कारखानदार मात्र शेतकर्यांना चिरडून शेती उद्योग नष्ट करण्याच्या भूमिकेत असल्याचा आरोप होत आहे.

# मशीनमध्ये नाणे टाका अन् कापडी बॅग घ्या

**गोपाळपूर ग्रामपंचायतीचा अनोखा उपक्रम; डॉ.कलशेट्टी यांच्या हस्ते उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.८ डिसेंबर-**



मशीन मध्ये क्वाईन टाका, कापडी बॅग घ्या..! असा उपक्रम गोपाळपूर ग्रामपंचायतीने प्लॅस्टिकला पर्याय म्हणून सुरू केला आहे. मुख्यमंत्री समृद्ध समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत प्लास्टिक बंदीसाठी सुरू केलेल्या या अनोख्या उपक्रमातून कापडी पिशवी वेंडिंग मशीन बसवण्यात आली आहे. त्याचे उद्घाटन यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.

गोपाळपूर येथे यशदा अंतर्गत सात प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकारी व पोलिस उपअधिक्षक निवासी आलेले आहेत. त्यांचे उपस्थिती विशेष ठरली. यावेळी गोपाळपूरचे सरपंच पांडुरंग देवमारे, ग्रामपंचायत अधिकारी ज्योती पाटील, सदस्य उदय पवार, सविता आसबे तसेच प्रशिक्षणार्थी व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

**प्लास्टिकवर नामी शक्कल!**

मशीन मध्ये ५ रु कॉइन टाकले की कापडी बॅग मशीन मधून बाहेर येते. तीर्थक्षेत्र गोपाळपूर येथे अनेक भाविक येतात. तसचे स्थानिकांकडून प्लास्टिक कचरा अधिक होतो. तो आटोक्यात आणण्यासाठी ग्रामपंचायतीने नामी शक्कल लढविली आहे. गटविकास अधिकारी अमोल जाधव यांचे मार्गदर्शन लाभले आहे. आषाढी कालावधीत सीईओ कुलदीप जंगम यांच्या हस्ते प्लास्टिक बाटली क्रश मशीनचे उदघाटन करण्यात आले होते.

**प्लास्टिक ऐवजी कापडी बॅगचा पर्याय निवडा - डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी**

प्लास्टिक वापर टाळा, कापडी बॅगचा पर्याय निवडा असे आवाहन डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी ग्रामस्थांना केले. गोपाळपूर ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान अंतर्गत हा उपक्रम राबविला आहे. तो कौतुकास्पद आहे. एखाद्या पंचायत अधिकाऱ्याने मनावर घेतले तर काय होऊ शकते हे या ग्रामपंचायतीने राबविलेल्या विविध उपक्रमावरून दिसून येत असल्याचे डॉ. कलशेट्टी यांनी सांगितले. या कार्यक्रमात त्यांनी प्लास्टिक मुक्तीची शपथ सर्वांना दिली.

## निधन वृत्त...

### शिवकुमार शिरुर



**सोलापूर, दि.८ डिसेंबर-**

शिवगंगा नगर, जुळे सोलापूर येथील शिवकुमार सातलिंगप्पा शिरुर (वय-५५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मादनहिप्परगा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्यात आई, वडील,भाऊ, बहिण, पत्नी, दोन मुली, मुलगा असा परिवार आहे.ते निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत सहशिक्षक म्हणून कार्यरत होते.

### लक्ष्मीबाई अल्लापूर



**सोलापूर, दि.८ डिसेंबर-**

दुधनी सिद्धरामेश्वर देवस्थान पंच कमिटीचे विश्वस्त श्री मलकाजप्पा मल्लेशप्पा अल्लापूर (अंदेनी) यांचे पत्नी सौ. लक्ष्मीबाई मलकाजप्पा अल्लापूर (अंदेनी) यांचे वयाच्या ८० व्या वर्षी अल्प आजाराने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या दिनांक ०९/१२/२०२५ रोजी दुपारी ठीक ०२.०० वाजता मल्लिकार्जुन मंदिराच्या पाठीमागील राहत्या घरापासून निघणार आहे. अंत्यसंस्कार वीरशैव लिंगायत स्मशानभूमी येथे होणार आहे.

# बासलेगावात जगदंबा देवी मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना उत्साहात

**विविध धार्मिक कार्यक्रम, ३०० महिलांची कलश मिरवणूक लक्षवेधी**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ डिसेंबर-**

तालुक्यातील श्री क्षेत्र बासलेगाव येथील श्री जगदंबा देवी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना डॉ. श्री शिवाचार्यरत्न जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या भक्ती भावाने, मंगलमय वातावरणात संपन्न झाली. यावेळी श्री. ष.ब्र. बसवलिंग महास्वामीजी नागणसूर तुप्पीन मठ, श्री.ष.ब्र.मारुलाराध्य शिवाचार्य महास्वामीजी माशाळ, श्री.ष.ब्र. बसवलिंग महास्वामीजी विरक्त मठ अक्कलकोट, वे.पं. सोमनाथ स्वामी धोत्री हे उपस्थित होते. या श्री जगदंबा देवीचे मोठे महात्म्य आहे.



दरम्यान श्री लक्ष्मी मंदिर येथून देवीच्या डोंगराकडे मूर्तीची भव्य मिरवणूक, रात्री भजन, जागरण व पारंपारिक ढोल वाद्यासह जागरण कार्यक्रम त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. डोंगरावरील श्री जगदंबा देवी मंदिर येथून गावातील प्रमुख मार्गावरून जलकुंभ घेऊन ३०० सुहासिनीसह श्री जगदंबा देवी मिरवणूक संपन्न झाली. भजन पारंपारिक ढोलवद्यासह जागरण असे धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. या प्रसंगी महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी व साडेतीन शक्तीपीठ या अध्यात्मिक तीर्थस्थळाचे प्रवचन संपन्न झाले. जमखंडी येथील हलता देखावा हा लक्षवेधी ठरला. बंजारा समाजातील पारंपारिक वेशभूषासह बहुसंख्येने महिला उपस्थित होते.

या कार्यक्रमास रेऊर जि. गुलबर्गा येथील माजी आमदार दत्ता तथा अप्पू गौडा पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी लक्ष्मीताई पाटील, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, भाजपा चे युवा नेते मिलन कल्याणशेट्टी, नवी मुंबईचे माजी उपमहापौर शशिकांत बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते.

मूर्तीची मुख्य प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. अभिषेकसाठी गावातील विहीर ते देवीच्या मंदिरापर्यंत जलकुंभ व महाआरती संपन्न झाली. विविध धार्मिक कार्यक्रम श्री जगदंबा देवी ट्रस्टचे मुख्य पुजारी श्रीराम देशपांडे यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमासाठी बासलेगाव येथील नवी मुंबई वाशी मार्केट स्थित असलेले माथाडी कामगार आपल्या कुटुंबासह उपस्थित होते. ग्रामस्थांबरोबर त्यांनी देखील श्री जगदंबा चरणी सेवा रुजू केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बासलेगावातील सर्व ग्रामस्थ व श्री जगदंबा देवी संस्थेचे विश्वस्त व सदस्य यांनी परिश्रम घेतले. या विविध कार्यक्रमास तालुक्यातील श्री देवीचे भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.







# बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक; राजेंद्र राऊत गटाची सरशी

- आ.सोपल गटाचा दारुण पराभव
- १६ पैकी १६ जागांवर राऊत गटाचे उमेदवार विजयी
- व्यापारी मतदार संघातील दोन जागा यापुर्वीच झाल्या बिनविरोध

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.८ डिसेंबर-**

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी रविवार, ७ डिसेंबर रोजी मतदान तर सोमवार, ८ डिसेंबर रोजी मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्यात आली. यात माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखालील बळीराजा विकास आघाडीची गटाची सरशी झाली. आमदार दिलीप सोपल यांच्या नेतृत्वाखालील परिवर्तन आघाडीला दारुण पराभव चाखावा लागला.

बाजार समितीच्या १६ जागांसाठी निवडणूक लागली होती. या सर्वच्या सर्व जागांवर राऊत गटाचे उमेदवार विजयी झाले आहेत. निकालानंतर राऊत गटाचे उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी गुलालाची उधळण, फटाक्यांची आतिषबाजी करत मोठा जल्लोष केला. निवडणूक निर्णय अधिकारी आबासाहेब गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील आदित्य कृष्णा मंगल कार्यालय येथे एकूण पाच टेबलवर मतमोजणी प्रक्रिया पार पाडण्यात आली. दरम्यान, बार्शी उत्पन्न बाजार समितीच्या एकूण १८ जागांपैकी व्यापारी मतदारसंघातील २ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या. या दोन्ही जागांवर माजी आमदार राजेंद्र राऊत गटाचे उमेदवार निवडून आले. उर्वरित १६ जागांसाठी झालेल्या निवडणुकीसाठी ९६.९८ टक्के मतदान झाले. या निवडणुकीत ४ अपक्ष उमेदवारही रिंगणात उतरले होते. मात्र खरी लढत ही बळीराजा विकास आघाडी आणि परिवर्तन आघाडीत झाली.

हमाल तोलार गटातील एका जागेवर गजेंद्र मुकटे ५९३ मते घेत माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या नेतृत्वाखालील बळीराजा विकास आघाडीचे खाते उघडले. ग्रामपंचायत गटातील ४ जागांवर राजेंद्र राऊत गटाचे अजित बारंगुळे, नेताजी घायतिडक, संजय माळी आणि रामेश्वर पाटील यांनी विजयश्री खेचून आणले. यानंतर आर्थिक दुर्बल व मागासवर्ग आणि महिला मतदारसंघातील मतांची मोजणी करण्यात आली. महिला सुमारे १०० च्या मतांच्या फरकाने तर दुसरे गटातील उमेदवार हे ८० ते ३५ मतांच्या फरकाने विजयी झाले. दरम्यान, सोसायटी मतदार संघातील ७ जागांच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. कारण या गटातून सोपल गटाकडील मातब्बर रिंगणात होते.

सोसायटी गटात काँटे की टक्कर पहावयास मिळाली. मतांचे गठ्ठे बांधत असताना समान मते दिसत होती तर २० पासून ते ६० पर्यत क्रॉस मते आढळून येत होती. तसेच बाद मतांची संख्या ही जास्त असल्याने सर्वांची शेवटपर्यंत धाकधूक वाढली होती. या मतदारसंघातील १६३३ पैकी तब्बल ७६ एवढी मते बाद करण्यात आली. त्यामुळे शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता लागून राहिली होती. राऊत गटाचे उमेदवार रविकांत साळुंखे, बाबा गायकवाड आणि सोपल गटाचे युवराज काटे यांच्यापैकी कोण जिंकणार याकडे लक्ष लागले होते. मात्र युवराज काटे यांच्यापेक्षा २६ मते जादा मिळाल्याने रविकांत साळुंखे हे विजयी झाले.

सोसायटी मतदार संघातील विजयी उमेदवार (कंसात त्यांना पडलेली मते) याप्रमाणे; युवराज काटे (७६४), नंदकुमार काशीद (७२९), अशोक काशीद व धर्मराज गाडे यांना (७१५), प्रभाकर डमरे (८१८), सुरेश गुंड (८१५), यशवंत माने (८१३), विजय गरड (८०४ ). महिला गटात राऊत गटाच्या मनीषा ताकभाते (८५०) आणि सुमन पाटील (८४४) विजयी झाल्या. मतमोजणी प्रक्रिया संपल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी आबासाहेब गावडे, सहायक निबंधक अनिस सय्यद, उमेश पवार यांनी विजयी उमेदवारांना प्रमाणपत्रे दिली.

### उपळाई रोड ते शिवसृष्टीपर्यंत मिरवणूक

निकाल जाहीर होताच सर्व उमेदवार विजय राऊत, रणवीर राऊत यांना खांद्यावर घेत आणि गुलालाची उधळण करत उपळाई रोड ते शिवसृष्टी अशी मिरवणूक काढली. माजी आमदार राजेंद्र राऊत हे मिरवणुकीच्या पुढे चालत होते. भगवंताचे दर्शन घेऊन शिवाजी महाराजांना अभिवादन केले.

### राऊत पितापुत्रांना आनंदाश्रु आवरता आले नाहीत

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रणवीर राऊत हे सकाळपासून आकडेवारी घेत मतमोजणीवर लक्ष ठेऊन होते. तर बाजार समितीचे प्रशासक विजय राऊत हे केंद्राबाहेर थांबलेले होते. दरम्यान, रणवीर राऊत मतमोजणी केंद्रातून बाहेर येताच समर्थक व कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. रणवीर राऊत यांनी त्यांचे वडील तथा माजी आमदार राजेंद्र राऊत यांना साष्टांग दंडवत घालत कडकडून मिठी मारली. यावेळी दोघांनीही आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली. त्यांना आनंदाश्रू आवरता आले नाहीत. त्यांनी चुलते विजय राऊत यांचेही चरणस्पर्श करत मिठी मारली.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आशीर्वाद, पारदर्शक कारभार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आशीर्वाद, आम्ही बाजार समितीत केलेला पारदर्शक कारभार आणि विकासकामे, सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी अतोनात घेतलेली मेहनत यामुळे सहकारातील पहिलीच निवडणूक असताना देखील आम्हाला विजय मिळाला. शेतकरी आणि सर्वसामान्याच्या तोंडात सोन्याचा घास जावा याला माझे प्राधान्य असणार आहे. पाठीमागे ज्या चुका झाल्या असतील त्या देखील दुरुस्त केल्या जातील. मतदारांनी आमच्यावर विश्वास दाखवल्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार, असे माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी यावेळी सांगितले.



**शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त थोरला मंगळवेढा तालीमच्यावतीने सत्कार**

सोलापूर : माजी विरोधी पक्षनेता सो.म.पा. तथा शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त थोरला मंगळवेढा तालीमच्या वतीने सत्कार करण्यात आले. याप्रसंगी आ.विजयकुमार देशमुख, शिवसेनेच्या प्रवक्त्या डॉ. प्रा.ज्योती वाघमारे, माजी आमदार दिलीप माने यांच्यासह महेश गादेकर, चेतन नरोटे, संकेत पिसे, पुरुषोत्तम बरडे, राजन जाधव, अनिकेत पिसे, विनोद भोसले, अमोलराजे भोसले, आबासाहेब थोरात आदी उपस्थित होते.

# जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून शासनाची दिशाभूल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर**

जिल्हा आरोग्य अधिकारी संतोष नवले यांनी उपसंचालकांच्या अधिकाराचा वापर करून आरोग्य कर्मचारी मुजावर व ढाकणे यांची प्रतिनियुक्ती केल्याबाबत ११ जुलै रोजी तक्रार केली होती.

त्यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी नवले यांनी १६ जुलै रोजी त्या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती रद्द केल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी व उपसंचालक यांना पत्राद्वारे कळविले आहे. त्यामुळे शासनाची दिशाभूल करण्यासाठी मागील तारीख टाकून प्रतिनियुक्ती रद्द केल्याचे दाखविण्यात आले आहे. त्यामुळे दिशाभूल करणारी माहिती देणाऱ्या जिल्हा आरोग्य अधिकारी नवले यांच्यावर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष गणेश मोरे यांनी केली आहे.

कर्मचारी प्रतिनियुक्ती अधिकार उपसंचालक यांना असताना त्याचा गैरवापर करीत स्वतःच्या सोईसाठी दोन आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रतिनियुक्ती केली आहे. त्या काळात अनेक गैरप्रकार झाल्याने त्याची चौकशी करणे आवश्यक आहे. प्रतिनियुक्तीबद्दल उपसंचालक कार्यालयाकडे तक्रार करण्यात आल्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी नवले यांची माळशिरस येथे संनावणी घेण्यात आली होती.

त्यानंतर त्यांनी तक्रार ११ जुलैची असताना प्रतिनियुक्ती रद्द आदेश १६ जुलैला काढून जिल्हा आरोग्य अधिकारी नवले यांनी चूक केल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका कार्याध्यक्ष गणेंश मोरे यांनी केली आहे.







हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.Publised at TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | RNI No. MAHMAR/2023/86468
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भीमगीत गायन स्पर्धा; केशेगाव पंचशील गायन पार्टी प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.८ डिसेंबर -**

सराटी (ता. तुळजापूर) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण अभिवादन समितीतर्फे भीमगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

तुळजापूर तालुक्यातील विविध गावांमधील पंचशील, राजरत्न, न्यू अमर, सत्यशोधक आदी गायन पार्टींनी स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धेत पंचशील गायन पार्टी केशेगाव यांनी प्रथम, न्यू अमर गायन पार्टी नेलेगाव यांनी द्वितीय, तर पंचशील गायन पार्टी चिवरी यांनी तृतीय क्रमांक पटकावला. विजेत्या संघांना अनुक्रमे ५०००, ३००० आणि २००० रुपये रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. सर्व सहभागी संघांना १००० रु. प्रोत्साहनपर देण्यात आले. स्पर्धेत समाज प्रबोधनपर व अर्थपूर्ण भीमगीते सादर करण्यात आली. चांदण्याची छाया हे गीत विशेष लक्षवेधी ठरले.

परिक्षक म्हणून चंद्रशेखर कंदले, कैलास गवळी गुरुजी व बापू कांबळे गुरुजी यांनी काम पाहिले. कार्यक्रमासाठी सुरवसे, गायकवाड, दुपारगुडे परिवारासह बौद्ध बांधव व ग्रामस्थांनी मोठा सहभाग घेतला.



## संक्षिप्त वृत्त...



### लोहाऱ्यात संत संताजी जगनाडे महाराज जयंती उत्साहात साजरी

**लोहारा, दि.८ डिसेंबर -**

लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात श्री संत संताजी जगनाडे महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने ८ डिसेंबर रोजी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. नगराध्यक्षा वैशालीताई खराडे व सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय पवार यांच्या हस्ते संताजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला माजी गटनेते अभिमान खराडे, उपनगराध्यक्ष अमिन सुंबेकर, विविध पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. धार्मिक कार्यक्रम, पूजा-अर्चा आणि अभिवादनांनी जयंतीचा उत्सव भक्तिमय वातावरणात पार पडला.

### इटकळ ग्रामस्थांसाठी मोठी संधी; ग्राम पंचायत कर भरण्यावर ५० टक्के सवलत

**इटकळ, दि.८ डिसेंबर**

इटकळ येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कर भरणाऱ्यांना ५० टक्के सवलत देण्यात आली असून ग्रामस्थांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सरपंच साहेबा क्षीरसागर व ग्राम सेवक नितीन कांबळे यांनी केले आहे. ग्रामपंचायतींची थकीत करवसुली वाढवणे आणि गावाच्या विकासाला गती देणे हा शासनाचा उद्देश असून निवासी मालमत्ता धारकांना घरपट्टी, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती करांवर थेट ५०% सूट मिळणार आहे. कर भरण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ असून ग्रामस्थांनी लवकरात लवकर सवलतीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### जयप्रकाश विद्यालयातील मुलींची डॉजबॉलमध्ये राज्यस्तरावर धडक

**धाराशिव, दि.८ डिसेंबर**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथील १७ व १९ वर्ष वयोगटातील मुलींच्या डॉजबॉल संघांनी विभागस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड मिळवली. निलंगा येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत संघांनी चमकदार कामगिरी केली. या यशाबद्दल विद्यार्थिनींचा पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राज्यस्तरीय स्पर्धा १७ वर्ष मुलींसाठी डेरवण (रत्नागिरी) तर १९ वर्ष गटासाठी जाफराबाद (जालना) येथे होणार आहेत. खेळाडूंना प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्राध्यापक प्रशांत कोळगे व अश्विन पवार यांनी मार्गदर्शन केले. माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे यांनी चिकाटी, सराव व सकारात्मकतेने राज्यस्तरावरही यश मिळवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, संतोष कपाळे, नानासाहेब शेलार आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी तर आभार काकासाहेब डोंगरे यांनी मानले.

### विनोद सावंत यांची जिल्हाध्यक्षपदी निवड

**कळंब, दि.८ डिसेंबर**

कळंब तालुक्यातील लोहटा पश्चिम येथील विनोद सोमनाथ सावंत यांची अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या धाराशिव जिल्हा माजी सैनिक विभाग जिल्हाध्यक्ष या पदावर दि.७ डिसेंबर २०२५ नियुक्ती पत्र देऊन करण्यात आली आहे. आपण यापुढे सर्वसामान्याचे प्रश्न संघटनेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहून सहकार्य करावे, असे स्वातंत्र्य सैनिक प्रदिप पाटील खंडापूरकर बाबा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समिती यांनी दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे. सदर नियुक्तीबद्दल सावंत यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## परंडा : निकालाबाबत उत्सुकता शिगेला; कोणाच्या शिरपेचात विजयाचा गुलाल?




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.८ डिसेंबर -**

परंडा नगरपरिषद निवडणुकीचा निकाल कोणाच्या बाजूने लागणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. सर्व पक्षांनी जोरदार प्रचार केला असून, ही निवडणूक आजी माजी आमदारांनी व माजी आमदाराच्या सुपुत्रांनी प्रतिष्ठेची केली असून ही लढत प्रतिष्ठेची म्हणून पाहिली जात आहे.

या निवडणुकीत माजी मंत्री तथा आमदार प्रा.डॉ. तानाजीराव सावंत व जाकीर सौदागर यांनी आपली प्रतिष्ठा पणाला लावली, तर दुसरीकडे परंडा जनशक्ती नगर विकास आघाडीतर्फे माजी आ. सुजितसिंह ठाकूर आणि माजी आ. राहुल मोटे तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा अध्यक्ष रणजित ज्ञानेश्वर पाटील यांची देखील प्रतिष्ठा पणाला लागली आहे . या निवडणुकीत जनशक्ती नगर विकास आघाडीला नगराध्यक्षपद मिळणार की आमदार सावंत यांच्या गटाचा पहिलाच प्रयोग यशस्वी होणार, यावर शहरात चर्चांना उधाण आले आहे.

परंडा नगरपरिषद निवडणुकीत भाजप, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गट, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष यांची जनशक्ती नगर विकास आघाडी यांच्या विरोधात शिवसेना (शिंदे गट) असा थेट सामना पहायला मिळाला. दोन्ही गटांनी दहा प्रभागांतून २०-२० उमेदवार मैदानात उतरवले असून, नगराध्यक्षपदासाठी प्रत्येकी एक उमेदवार उभा केला आहे. राहुल मोटे आणि सुजितसिंह ठाकूर, रणजित पाटील, सुभाषसिंह सद्दीवाल यांनी जनशक्ती नगर विकास आघाडीचा प्रचार सांभाळत जोरदार सभा, प्रचारफेऱ्या आणि बैठका घेतल्या.

**वार्तापत्र...**
**आप्पासाहेब शिंदे**

परंडा नगरपरिषदेवर यापूर्वी पाच वर्ष जाकीर सौदागर यांची सत्ता होती तर पाच वर्ष नगरपरिषदेवर प्रशासक सत्तेवर होते. परंडा नगरपरिषदेत जाकीर भाई सौदागर यांच्या गटाला रोखण्यासाठी जनशक्ती नगर विकास आघाडी अधिक आक्रमकपणे पुढे आली. दोन्ही गटांच्या प्रचारात एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप, टीका-टिप्पणी, शाब्दिक वार आणि शहरातील विविध समस्या मांडून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंडा नगर परिषदेसाठी ७८ टक्के मतदान झाले असून सर्व ईव्हीएम मशीन पोलीस बंदोबस्तात स्ट्राँग रूम मध्ये ठेवण्यात आले आहेत. झालेल्या निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे निकालाची उत्सुकता शिगेला पोहचली आहे.

कोण होणार परंडा नगरपालीकेचा नगराध्यक्ष कोणाच्या अंगावर पडणार गुलाल यांची उत्सुकता ताणली गेली आहे.

### लक्ष्मी दर्शनाचा विक्रम !...

या निवडणुकीत परंड्यात प्रथमच मोठ्या प्रमाणात 'लक्ष्मी दर्शन' झाल्याची चर्चा शहरात आहे. आजवर कधीच इतका खर्च या निवडणुकीत झाला नसल्याचे नागरिक सांगत आहेत. चुरशीच्या या निवडणुकीत तब्बल ७८ टक्के मतदान नोंदवले गेले असून, मतदानाच्या आदल्या रात्रीपर्यंत पैसा फिरल्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे. आता ही 'लक्ष्मी' कोणाच्या घरी पावते, कोणाच्या डोक्यावर विजयाचा गुलाल उडतो याचा निर्णय २१ डिसेंबर रोजीलागणार आहे. तोपर्यंत उमेदवारा सह सर्वांचे लक्ष निकालाकडे खिळले असून, अनेकांचे मन निकालाच्या प्रतिक्षेत 'गॅसवर' असल्याचे बोलले जात आहे.

## साहेबराव हंगरगेकर स्मृती साहित्य पुरस्कार सुप्रसिद्ध कवी अशोक नायगावकर यांना जाहीर

**२० जानेवारीला पुरस्कार वितरण व कविसंमेलनाचे आयोजन**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ डिसेंबर -**

मराठवाडा साहित्य परिषद शाखा तुळजापूर व स्व. साहेबराव हंगरगेकर फाऊंडेशन, तुळजापूर यांच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा दुसरा स्व.आ. साहेबराव हंगरगेकर स्मृती साहित्य पुरस्कार २०२६ ज्येष्ठ कवी अशोक नायगांवकर यांना जाहीर करण्यात आला आहे.





मराठवाडा साहित्य परिषद, शाखा तुळजापूरचे अध्यक्ष अमर हरिश्चंद्र हंगरगेकर, कार्यवाह विजय देशमुख यांनी अशोक नायगांवकर यांच्या नावाची उद्घोषणा केली.

तुळजापूरचे माजी आमदार तथा स्वातंत्र्यसैनिक साहेबराव हंगरगेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. रु. २००००/-, मानपत्र, सन्मानचिन्ह असे ह्या पुरस्काराचे स्वरुप आहे. अशोक नायगावकर यांनी प्रेमकविता, ग्रामीण कविता, पर्यावरण जाणीवेच्या कविता, सामाजिक, राजकीय कविता अशा अनेक प्रकारच्या कविता लिहिल्या आहेत. उपरोधाच्या माध्यमातून गंभीर समाजचिंतन करणारे कवी अशी त्यांची ओळख आहे. महाराष्ट्रासह परदेशातही विविध ठिकाणी त्यांच्या काव्यवाचनाचे कार्यक्रम पार पडले आहेत.

यंदाच्या पुरस्कार निवड समितीत अध्यक्ष रामदास फुटाणे, सदस्य नारायण पुरी (छत्रपती संभाजीनगर), दगडूदादा लोमटे (अंबाजोगाई), भरत दौंडकर (पुणे), रविंद्र केसकर (धाराशिव), दत्ता थोरे (सोलापूर), यांचा समावेश होता. निवड समितीने यंदाच्या पुरस्कारासाठी सर्वानुमते अशोक नायगावकर यांची निवड केली. तसेच यावेळी निमंत्रित कवींचे कवीसंमेलन आयोजित करण्यात येणार आहे,अशी माहिती अमर हंगरगेकर यांनी दिली.

यावेळी मराठवाडा साहित्य परिषदेचे पदाधिकारी, सदस्य, साहेबराव हंगरगेकर फाऊंडेशनचे उपाध्यक्ष अनिल हंगरगेकर, मराठवाडा साहित्य परिषदेचे पदाधिकारी, सदस्य भीमा सुरवसे, दास पाटील, किरण हंगरगेकर, प्रा. विवेक कोरे, महेश गुरव, तुषार भोसले, महेश गवळी, दीपक पवेकर आदींची उपस्थिती होती.

## सोनेगाव-घोडकी-लिंगीपिंपळगाव-वाशी मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.८ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील सोनेगाव-घोडकी-लिंगीपिंपळगाव ते वाशी हा महत्त्वाचा जोडरस्ता पूर्णपणे खड्ड्यांच्या तावडीत सापडला असून रस्त्याची दुरवस्था दिवसेंदिवस अधिकच भयावह बनत आहे. देशभरात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून रस्ते विकासाला वेग आला असताना ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था मात्र 'अडगळीत टाकलेल्या मजल्यासारखी' झाल्याचे वास्तव समोर येत आहे.



रस्त्यावरील जागोजागी खोल आणि मोठे खड्डे पडल्याने वाहनधारकांना खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डे हे ओळखणे कठीण झाले आहे. या बिकट अवस्थेमुळे दळणवळण ठप्प झाले असून शाळा-कॉलेजांना जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

रात्री अचानक आरोग्याची समस्या उद्भवल्यास रुग्णवाहिका वेळेवर पोहोचू न शकण्याची गंभीर परिस्थिती ग्रामस्थांनी व्यक्त केली.

यामुळे जीविताला धोका वाढत असून उपचार वेळेत न मिळाल्याच्या घटना ऐकू येत आहेत. यामुळे स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

निवडणुकांच्या काळात विकासाची ग्वाही देणारे लोकप्रतिनिधी मात्र या रस्त्यावरील दुरवस्थेकडे दुर्लक्ष करीत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. आमच्या हालअपेष्टांचा आवाज कोणीच ऐकत नाही; आता मात्र जनतेचा रोष आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये उमटेल, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली.

दरम्यान, रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करावी, अशी एकमुखी मागणी ग्रामस्थांकडून प्रशासनाकडे होत आहे.

## शेतातून ३० हजारांच्या म्हशीची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.८ डिसेंबर -**



येथील सुरज राजकुमार माळी (वय २५, रा. जुन्या तहसील शेजारी, परंडा) यांच्या शेतातून अंदाजे ३०,००० रुपये किमतीची म्हैस अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

ही घटना दि.२१ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी ६ ते दि. २२ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजेदरम्यान गट नं. २४/११ मधील शेतात घडली. फिर्यादी सुरज माळी यांनी दि. ७ डिसेंबर रोजी परंडा पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तुळजापूरमध्ये स्वच्छतेचा बोजवारा...
## साळुंके गल्ली व आर्य चौक परिसर घाणीच्या विळख्यात



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.८ डिसेंबर -**

तुळजापूर येथील साळुंके गल्ली आणि आर्य चौकातील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने परिसरात अक्षरशः घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यामुळे स्थानिक नागरिकांसह तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना घाणीतून रस्ता काढत, नाकावर रुमाल धरून प्रवास करावा लागत आहे.

नगरपरिषदेकडून या भागात दररोज स्वच्छता न केल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. स्वच्छतेसाठी नगर परिषद दररोज सुमारे ८० हजार रुपये, म्हणजेच महिन्याला तब्बल २४ लाखांचा खर्च करत असल्याचा दावा केला जातो. मात्र वास्तवात ठेकेदाराकडून शहरातील फक्त काही ठिकाणीच स्वच्छता केली जाते, तर अनेक गल्लीबोळांमध्ये कचऱ्याचे ढीग तसचे राहतात.

या भागातील नागरिकांनी नगरपरिषद प्रशासनाला जाब विचारला आहे की, स्वच्छतेसाठी निघणारे ८० हजार रुपये नेमके कोणाच्या खिशात जातात? स्वच्छतेची स्थिती लवकर सुधारली नाही तर रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## खामसवाडीत जिल्हा परिषद शाळेजवळ अवैध दारू विक्री

**पालक वर्गात चिंतेचे वातावरण...**

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.८ डिसेंबर -**

कळंब तालुक्यात वेगळी राजकीय-सामाजिक ओळख असलेल्या खामसवाडीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात अवैध दारू विक्री वाढल्याने परिस्थिती गंभीर झाली आहे. शाळेजवळ वाढलेल्या मद्यपी व टवाळखोरांच्या उपस्थितीमुळे विद्यार्थी, विशेषतः विद्यार्थिनी, शेतात-कारखान्यात जाणाऱ्या महिलांना प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

खामसवाडीची शाळा शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात लौकिक असतानाही गेल्या काही महिन्यांपासून गावातील अवैध दारू विक्रेत्यांची दहशत वाढली आहे. इतकेच नव्हे, तर मद्यपींकडून गावच्या सरपंचांनाही अरेरावी व शिवीगाळ सहन करावी लागली आहे.

साठे चौक व रस्त्यांवर मद्यपींची मुक्त वर्दळ सुरू असल्याने शिक्षक, बँक अधिकारी, कारखाना कर्मचारी तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या महिलांचे हाल वाढले आहेत. या परिस्थितीमुळे पालक वर्गात भीती निर्माण झाली असून आपल्या मुलांना शाळेत पाठवायचे की नाही? असा प्रश्न चर्चेला आला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनुसार शाळा, महाविद्यालय, हॉस्पिटल परिसरात दारू विक्री बंदी असताना येथे उघडपणे नियमांचे उल्लंघन होत असल्याने पोलीस यंत्रणेच्या निष्क्रियतेवर गावकऱ्यांचा रोष आहे.



काही दिवसांपूर्वी शिराढोण पोलिसांनी गावात कारवाई करून दारू जप्त केली; मात्र काही वेळातच विक्री पुन्हा सुरू झाल्याने पोलिसांवर साशंकता निर्माण झाली आहे.

गावकऱ्यांच्या भाषेत, तू कर मारल्यावाणी, मी करतो रडल्यावाणी या म्हणीसारखी परिस्थिती झाली आहे, अशी टीका नागरिक करत आहेत.

शाळेभोवतीचा हा अवैध प्रकार सुरूच राहिल्यास आपल्या मुलांना अन्य गावातील शाळेत घालण्याचा पर्याय विचारात घेतल्याचे काही पालकांनी तरुण भारतशी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

शैक्षणिक क्षेत्रात ओळख निर्माण केलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या प्रतिमेला या घटनांमुळे धक्का बसत असून पोलीस कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

## ७० वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदा कमळ फुलणार का? काँग्रेसचा हात मजबूत ठरणार का? की पतंग ठरणार निर्णायक?





**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.८ डिसेंबर -**

नळदुर्ग नगरपालिकेच्या ७० वर्षांच्या इतिहासात प्रथमच 'कमळ' फुलण्याची शक्यता, काँग्रेसचा 'हात' पुन्हा एकदा सत्ता राखणार की 'पतंग' उडत इतरांना मागे टाकणार, याबाबत शहरात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. दि. २ डिसेंबर रोजी झालेल्या मतदानानंतर आता सर्वांचे लक्ष २१ डिसेंबरच्या मतमोजणीकडे लागले आहे.

या निवडणुकीत १७ हजार १२० मतदारांपैकी १२ हजार ५२९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. पुरुषांमध्ये ८,५३६ पैकी ६,५४३ तर महिलांमध्ये ८,३८६ पैकी ५,९८६ जणांनी मतदान केले. यावेळी मतदानाची टक्केवारी ७३.४० टक्के इतकी राहिली असून गेल्या निवडणुकीपेक्षा जवळपास २ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

या निवडणुकीत प्रमुख पाच आघाड्यांचा जोरदार मुकाबला पाहायला मिळाला. भाजप - शिवसेना (शिंदे गट) युती, काँग्रेस - शिवसेना (ठाकरे गट) युती, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), वंचित



बहुजन आघाडी आणि एमआयएमध्ये नगराध्यक्षपदासाठी अटीतटीची लढत झाली असून उमेदवारांमध्ये बसवराज धरणे (भाजप-शिंदे), अशोक जगदाळे (काँग्रेस-ठाकरे), संजय बताले (राष्ट्रवादी - अजित पवार गट) आणि शहेबाज काझी (एमआयएम) अशी चौघांची प्रमुख स्पर्धा रंगली आहे.

पक्षांतरामुळे निवडणुक गाजली. या निवडणुकीची सर्वात मोठी चर्चा ठरली ती 'पक्षांतराची' झाली. शरद पवार गटाचे अशोक जगदाळे अचानक काँग्रेसमध्ये, काँग्रेसचे शहेबाज काझी एमआयएममध्ये, भाजपचे संजय बताले राष्ट्रवादी (अजित पवार गटात), नगरसेवक पदांमध्येही मोठे उलटफेर पाहायला मिळाले. शेवटच्या टप्प्यात अनेकांनी 'मला एक मत द्या, बाकी तुमची मर्जी!' अशी भूमिका घेतल्याने मोठ्या प्रमाणावर क्रॉस मतदान झाले असण्याची शक्यता वर्तविली जात आहे. यावेळी जातीय गणिताचा प्रभाव जाणवत असून त्याचा फायदा किंवा तोटा कोणाला, हे २१ डिसेंबरलाच स्पष्ट होणार आहे.

**वार्तापत्र...**
**विलास येडगे**

१९५५ मध्ये स्थापना झालेल्या नळदुर्ग नगरपालिकेत अद्याप एकदाही भाजपची सत्ता आलेली नाही. एक- दोन नगरसेवक सोडता भाजपचे अस्तित्व अल्पच राहिले.

मात्र आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रवेशानंतर भाजपचे वर्चस्व वाढले. यावेळी भाजपचे बसवराज धरणे विजयी झाले, तर लिंगायत समाजाचा पहिला नगराध्यक्ष होण्याचा मान त्यांना मिळणार आहे.

कमळ फुलणार का? काँग्रेसचा हात पुन्हा मजबूत होणार का? की एमआयएमचा शहेबाज काझी धक्कादायक निकाल देणार? अतिशय अटीतटीच्या आणि चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत गुलाल कोण उधळणार, हे पाहण्यासाठी शहरवासियांची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

# दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे: अंबरखाने

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, ८ डिसेंबर :** दिव्यांगाना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ उदगीरचे अध्यक्ष व नागप्पा अंबरखाने ब्लड बँकेचे संचालक आशिष अंबरखाने यांनी व्यक्त केले. ते येथील संधी निकेतन शिक्षण संस्था संचलित जीवन विकास निवासी मतिमंद कर्मशाळा उदगीर येथे आयोजित जागतिक दिव्यांग दिन सप्ताह निमित्य श्री क्लिनिक लॅबोरेटरी उदगीर यांच्यातर्फे आयोजित रक्त तपासणी शिबिरात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्यवस्थापकीय अधीक्षक राजापटेल अब्दुल मलिक हे होते प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमंत व्यापारी गणेश मंडळाचे सचिव कैलास मोदी, सदस्य शिवकुमार उपरबावडे, सदस्य कपिल शेटकार, श्री क्लिनिक लॅबरोटीचे कालिदास चव्हाण व नितीन चव्हाण, विशेष शिक्षक नागेंद्र साबणे उपस्थित होते.






पुढे बोलताना आशिष अंबरखाने म्हणाले की, श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ ट्रस्ट विविध सामाजिक उपक्रमात सहभागी होत असते समाजाचे काहीतरी देणे लागतो. या उद्देशाने वर्षभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. याचाच भाग म्हणून हा कार्यक्रम आहे. दिव्यांग मुलांना कोणत्याही अडचणीला मात करण्यासाठी सदैव व्यापारी गणेश मंडळ तत्पर असते. त्यामुळे भविष्यात तुम्हाला सर्वतोपरी मदत केली जाईल असे आश्वासन दिले.

यावेळी विशेष शिक्षक नागेंद्र साबणे म्हणाले की दिव्यांग मुलांच्या जडणघडणीत समाजाचे फार मोठे योगदान असते समाजातील रूढी परंपरा मोडीत काढून दिव्यांग मुलांना आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. दिव्यांग मुलांना समाजाची साथ मिळाली तर ते कोणत्याही ठिकाणी ते चांगल्या पद्धतीने काम करू शकतात, म्हणून समाजाने सुद्धा दिव्यांग मुलांना व्यावसायिक प्रशिक्षण घेतल्यानंतर आपल्या फर्ममध्ये नोकरी देऊन सहकार्य करावे असे आव्हान केले.

अध्यक्षीय समारोपात व्यवस्थापकीय अधीक्षक राजापटेल अब्दुल मलिक म्हणाले की आमच्या कर्मशाळेतून आम्ही अकुशल स्वरूपाचे व्यावसायिक प्रशिक्षण देऊन बौद्धिक दिव्यांजन मुलांना तयार करीत आहोत. परंतु त्या मुलांना समाजानेही आपल्या फर्ममध्ये काम करण्याची संधी द्यावी व त्यांचा उपयोग करून घ्यावा. ही मुले कामाशी प्रामाणिक असतात साध्या कामात ती निश्चितपणे चांगली मदत करू शकतात. त्यामुळे समाजाने संधी द्यावी असे आव्हान केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक इरवंत भंडरवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख रुहूल इस्लाम यांनी केले तर आभार देविदास चव्हाण यांनी मानले.

कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी कोणमारे आनंद, बिरादार चंद्रकांत, विलास चव्हाण, नागरवाड यादव, सय्यद साजिद आदींनी परिश्रम घेतले.

## डॉ. वैष्णवी पाटील-भुसारे यांना दंत वैद्यकीय फेलोशिप

**त.भा. वृत्तसेवा,**
**येरोळ, ८ डिसेंबर :** येरोळ (ता. शिरूर अनंतपाळ) येथील



कन्या डॉ. वैष्णवी स्वराज पाटील-भुसारे यांना दंतवैद्यकीय क्षेत्रातील मानाचा रिस्टोरेटिव्ह क्लिनिकल डेंटिस्ट्री विषयातील फेलोशिप नुकतीच हैदराबाद येथे प्रदान करण्यात आली. एशियन इन्स्टिट्यूट ऑफ हैदराबाद (-ख-ऊ) यांच्या वतीने हा फेलोशिप सन्मान डॉ. रोहिण रेड्डी व डॉ. रमेश रेड्डी यांच्या हस्ते डॉ. वैष्णवी यांना मिळाला.

पत्रकार कै. गजानन भुसारे येरोळ व ग्रामविकास अधिकारी सौ. विजया भुसारे-रोडगे यांची कन्या असलेल्या डॉ. वैष्णवी यांचा हा उल्लेखनीय यशाचा टप्पा असून त्यांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या नेत्रदीपक यशाबद्दल उद्योजक नागनाथ पाटील, सौ. मंजुषाताई पाटील, श्याम हुरणे, विठ्ठल पाटील, गंगाधर पाटील, सौ. पद्माताई पाटील, ड. कोमलताई होनराव-पाटील, पत्रकार शिवानंद भुसारे, राम तत्तापुरे, आशा तत्तापुरे-रोडगे, डॉ. सुवर्णा रोडगे, रामेश्र्वर झेरीकुंटे, सोमेश हसनाबादे, डॉ. वैभवी तत्तापुरे, डॉ. प्रणव तत्ताप-ुरे, डॉ. मल्लिकार्जुन सगरे, सरपंच सतिश सिंदाळकर, हणमंत भुस-ारे, गौरव भुसारे तसेच मित्रपरिवार व नातेवाईकांनी अभिनंदन करून कौतुकाची दाद दिली आहे.

## औराद शहाजानी येथे सोयाबीन खरेदी केंद्र सुरू

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, ८ डिसेंबर :** तालुक्यातील औराद शहाजनी येथील बाजार समितीच्या वतीने पहिल्यांदाच विद्यमान आमदार तथा माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पुढाकाराने खरेदी केंद्र सुरु करण्याचे जाहीर केल्याप्रमाणे आज प्रत्यक्षात खरेदी केंद्र सुरु करण्यात आले. आणि या खरेदी केंद्राची सुरुवात ही बाजार समितीच्या सभापती यांनी ऐन वेळी आज उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांपैकी महिला शेतकरी यांच्या हस्ते पुजा करुन शुभारंभ करण्यात आला.

आज बाजारात समितीच्या वती-ने उपस्थित शेतकरी वैशाली बाबासाहेब जाधव रा. गुराळ, ता. निलंगा जि. लातूर येथील शेतकरी महिला यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. यावेळी आज पहिलाच दिवस असल्याने थोडीफार शेतकऱ्यांच्या गर्दी कमी होती पण उद्यापासून खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दी होणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांना तेथेच बाजार समितीच्या वतीने चहा व नाष्ट्याची सोय करण्यात आली आहे. तसेच शेतकऱ्यांनी स्वतः हुन आपल्या धान्याची व्यवस्थित काळजी घेऊन चांगले स्वच्छ करुन शेतकऱ्यांना मेसेज आल्याप्रमाणे गर्दी न करता खरेदी



केंद्रावर सोयाबीन घेऊन यावे असे आवाहन करण्यात आले.

यावेळी बाजार समितीचे सभापती नरसिंग बिरादार, सचिव सतिश मरगणे, संचालक सुरेश बिरादार, कालिदास रेड्डी, सतीश देवणे, सौ अर्चना गोंडगावे, वाघजी पाटील, डॉ. शंकद वीरपाक्षेश्वर, अनिल भंडारे, महेंद्र गिरी, सुधाकर शेटगार, शिवपुत्र आगरे, भगवानदास लड्डा, चंद्रकांत पिच-ारे व आणि कर्मचारी मेसेज पाठविण्यात आलेले शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## डॉ. प्रफुल्ल पाटील यांना उत्कृष्ट अधिकारी पुरस्कार प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, ८ डिसेंबर :** महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरच्या २५ व्या वर्धापनदिनानिमित्त उत्कृष्ट अधिकारी म्हणून पुरस्कार पशुवैद्यकीय महाविद्यालय, उदगीर येथील प्रक्षेत्र व्यवस्थापक डॉ. प्रफुल्लकुमार पाटील यांना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीनजी पाटील यांचे हस्ते व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आदरणीय पदमश्री डॉ. प्रकाशजी आमटे, डॉ. मंदाताई आमटे, संचालक शिक्षण मा. डॉ. शिरीषजी उपाध्ये, संचालक संशोधन मा. डॉ. नितीनजी कुरकुरे, कुलसचिव श्रीमती मोना ठाकूर व इतर मान्यवर यांचे उपस्थितीत दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार डॉ. पाटील यांना महाविद्यालयातील आणि विद्यापीठातील उल्लेखनीय कार्याबद्दल प्रदान करण्यात आला. याबाबत डॉ. पाटील यांचे शेतकरी, पशुपालक यांचेकडून अभिनंदन होत आहे.

## म.गांधी महाविद्यालयात संताजी जगनाडे यांची जयंती साजरी




**त.भा. वृत्तसेवा,**
**अहमदपूर, ८ डिसेंबर :** येथील विचार विकास मंडळ संचलित महात्मा गांधी महाविद्यालयामध्ये वारकरी संप्रदायातील एक प्रमुख संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ व्ही. पी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली प्रथम संताजी जगनाडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. जे. पी. कुलकर्णी, स्टाफ सेक्रेटरी डॉ. ए. पी. कांबळे, डॉ. एल. डी. जोगदंड, डॉ. एन. टी. देशमुख, डॉ. यादव सूर्यवंशी, प्रा. ए. ए. पागे, प्रा. पी. आर. अर्जून, विशाल करंजे, सुनील राठोड, सुधाकर कदम, दीपक दुर्गे, संतोष पळसकर, संभाजी मुंडे, हणमंत पौळ, अभिजित कदम यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्र महाविद्यालयाच्या मुलांचा संघ प्रथम; तर मुलींचा संघ द्वितीय

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, ८ डिसेंबर :** महाराष्ट्र महाविद्यालयाच्या मैदानावर पार पडलेल्या डॉजबॉल स्पर्धेत महाराष्ट्र महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने चुरशीच्या सामन्यात धाराशिव जिल्ह्यातील संघाचा पराभव करीत प्रथम क्रमांक पटकावला तर मुलींच्या संघाचा धाराशिव जिल्ह्यातील संघाने पराभव केल्याने द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले. विजय संघातील १२ विद्यार्थ्यांची राज्यस्तरावर निवड झालेली आहे. यात आदित्य पाटील, सोहम नेलवाडे, काशीमखा सय्यद, शोएबखा पठाण, समीरखा पठाण, शाहिदखा पठाण, सादिक मुल्ला, महेश सूर्यवंशी, सुयश कदम, आदित्य मोहोळकर या यशस्वी विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर, समन्वयक दिलीप धुमाळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कर्मवीर कदम, उपप्राचार्य प्रा.प्रशांत गायकवाड, क्रीडा समन्वयक प्रा. सूर्यकांत वाघमारे, क्रीडा प्रशिक्षक प्रा. यशोदा पाटील यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## महाराष्ट्र उदयगिरी'मध्ये संत संताजी जगनाडे जयंतीनिमित्त अभिवादन

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, ८ डिसेंबर :** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर येथे संत परंपरेतील अद्वितीय कीर्ती लाभलेले, भक्ती चळवळीचे अग्रणी संत संताजी जगनाडे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष बसवराज पाटील मलकापूरकर आणि अॅड. प्रकाश तोंडारे, सहसचिव प्रशांत पेन्सलवार यांनी संत संताजी जगनाडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

कार्यक्रमात समाजशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. एस. व्ही. भद्रशेट्टे यांनी संतांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या प्रखर समाजभक्ती, कीर्तन परंपरा आणि समता-भक्तीच्या मूल्यांची उपस्थितांना प्रेरणादायी माहिती दिली. त्यांनी संताजींच्या ओव्या, त्यांच्या समाजजागृतीतील योगदान आणि भक्तिमार्गातील नि:स्वार्थी सेवाभावाचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर विशद केले.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बी. एस. होकरणे, दिनविशेष समितीचे प्रा. डॉ. एम. एस. खांडेकर तसेच इतर प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




## सभापती हुडे शेतकरीच; न्यायालयाचा निर्वाळा

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, ८ डिसेंबर :** या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, कृषी उत्पन्न बाजार समिती उदगीरची संचालक पदाची निवडणुक प्रक्रिया ही २०२३ साली झाली. त्यावेळी शिवाजी हुर्डे यांच्या पॅनलने एकतफी विजय मिळवला व शिवाजी हुडे यांची सभापती म्हणून निवड करण्यात आली. त्यानंतर निवडणुकीमध्ये पराभव झालेले झुंजार पाटील, चिखले व हणंमत शेळके यांनी शिवाजी हुडे हे व्यापारी आहेत म्हणून त्यांना संचालक पदावरून अपात्र करावे म्हणून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांचेकडे कृषी उत्पन बाजार समिती निवडणुक नियम २०१७ च्या नियम १० (२) ११ प्रमाणे अपात्रतेची कार्यवाही करावी असा अर्ज दिला. त्या अर्जावर रितसर सुनावणी होवून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी शिवाजी हुडे हे शेतकरी नाहीत म्हणून त्यांना अपात्र ठरवले होते. त्या नाराजीने शिवाजी हुडे हे विभागीय सहनिबंधक यांचेकडे कलम १०५ नुसार अपिल दाखल केले होते. त्या अपिलावरती सुनावणी होवून विभागीय सहनिबंधक यांनी जिल्हा उपनिबंधकांनी दिलेला आदेश कायम ठेवला होता.

## 'किर्तावणी' विवेक जागरण करणारे संगीतमय नाटक

### अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा उदगीरचा कार्यक्रम



**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, ८ डिसेंबर :** नाट्य, कथाकथन, निवेदन, गायन अशा वेगवेगळ्या माध्यमातून ला-वणी, बतावणी, कीर्तन, अभंग, भारुड यांच्या माध्यमातून संत साहित्याचे विचार समाजापर्यंत पोहोचवत विवेक जागरण करणारा 'किर्तावणी' चा संगीतमय प्रयोग उदगीर येथील लायन्स नेत्र रुग्णालयाच्या अशोक मेहता या सभागृहात संपन्न झाला.

वारकरी संप्रदाय आणि संत साहित्याने महाराष्ट्राला काय दिले? याचा वेध घेत त्याचा आधुनिक काळातील जीवनाशी कसा संबंध आहे हे उपरोधिक, खुसखुशीत तरीही अभ्यासपूर्ण पद्धतीने झा-लेला अतिशय सुंदर प्रयोग म्हणजे किर्तावणी. सुमारे दोन तास सलग चाललेल्या या प्रयोगाने रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

या प्रयोगाबद्दल कलावंतांचे कौतुक करताना नाट्य परिषदेचे अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर म्हणाले, सध्याच्या समाज व्यवस्थेवर नाट्य प्रयोगातून चांगलेच कोरडे ओढले आहेत. नृत्य, गायन, वादन, अभिनय, नाट्य या सर्वच अंगांनी हा कार्यक्रम इतका उत्कृष्ट होता की तुमचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. यातील मुख्य कलावंत ऋचिका खोत व स्वामीराज भिसे हे होते. दिग्दर्शक ज्ञानराज होले, संगीत साथीला जगन्नाथ शिंदे व समीरण बर्डे होते. या प्रयोगाला महिलांची लक्षणीय उपस्थिती होती.

डॉ. रामप्रसाद लखोटिया, महादेव नौबदे, डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. कालिदास बिरादार,अॅड. बालाजी वलांडीकर, डॉ. दत्ताहरी होनराव, डॉ. स्मिता लखोटिया, सुनंदा सरदार, दीपा अंबेसंगे, डॉ. दिपाली कुलकर्णी, हर्षदा भारती हे मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपाध्यक्ष प्रा. महेश बसपुरे यांनी केले. सूत्रसंचालन अश्विनी निवर्गी यांनी तर आभार प्रा. डॉ. गौरव जेवळीकर यांनी मानले.

# हिंस्त्र श्वापदाने पाडला सात शेळ्यांचा फडशा; डोंगर पिंपळा परिसरात दहशत

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ डिसेंबर**

अंबाजोगाई तालुक्यातील डोंगर पिंपळा शिवारात एका अज्ञात हिंस्त्र श्वापदाने मोठा हाहाकार माजवला आहे. रविवारी रात्री या श्वापदाने एका शेतकऱ्याच्या गोठ्यात घुसून तब्बल सात शेळ्यांना ठार केले. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे १ लाखाहून अधिक रुपयांचे नुकसान झाले असून, परिसरात प्रचंड दहशत पसरली आहे.

डोंगर पिंपळा येथील शेतकरी बळीराम बाबुराव केंद्रे हे ज्या शेतात वहीत करतात, तिथेच त्यांनी शेळी पालनासाठी शेड उभारले आहे. केंद्रे यांच्याकडे सहा मोठ्या शेळ्या आणि एक लहान पिल्लू असे एकूण सात पशुधन होते. रविवार, दि. ७ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता त्यांनी शेळ्यांना चारापाणी केले आणि ते झोपण्यासाठी गेले. मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात हिंस्त्र श्वापदाने त्यांच्या शेडवर हल्ला केला. या हिंस्त्र श्वापदाने गोठ्याच्या संरक्षणासाठी लावलेल्या सहा फूट उंचीच्या जाळीवरून सहज उडी मारून आत प्रवेश केला. आत शिरताच त्याने सातही शेळ्यांना ठार मारून त्यांचा फडशा पाडला. सोमवारी पहाटे ५ वाजता सुमारास ही घटना उघडकीस आल्यानंतर बळीराम केंद्रे यांना धक्का बसला. यामध्ये त्यांचे सुमारे १ लाखांहून अधिक रुपयांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाने पंचनामा केला आहे. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रतन तळेकर आणि डॉ. अभिषेक अबुज यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मृत शेळ्यांचे शवविच्छेदन केले. या घटनेमुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये मोठी भीतीचे वातावरण आहे. वनविभागाने तातडीने या हिंस्त्र श्वापदाचा शोध घेऊन बंदोबस्त करावा, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्याला त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी डोंगर पिंपळा येथील ग्रामस्थांनी केली आहे.



# परळीच्या ओंकार (वैद्यनाथ) साखर कारखान्याकडून ऊस दर जाहीर

## शेतकऱ्यांच्या ऊसाला प्रति. मे. टनाला मिळणार ३०५० रुपयांचा दर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ डिसेंबर**

दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी स्थापन केलेल्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे रुपांतर आता ओंकार साखर कारखान्यात झालेले आहे. कारखान्याच्या यावर्षीच्या गळीत हंगामात ऊस उत्पादकांना ३०५० रुपये दर जाहीर करण्यात आला आहे. या अनुषंगाने पहिला हप्ता २९५० प्रति मे. टन दराने शेतकऱ्यांना मिळणार आहे. याबाबतची अधिकृत घोषणा कारखाना प्रशासनाने आज पत्रकार परिषद घेऊन केली आहे.

चेअरमन बाबुरावजी बोत्रे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट क्र. ८ पांगरी ता. परळी वैजनाथ जि. बीड कारखाना व्यवस्थापनाने गळीत हंगाम २०२५-२०२६ साठी गाळपास येणाऱ्या ऊसाचा दर निश्चित केला आहे. यंदाच्या हंगामासाठी कारखान्याकडून प्रति मे. टन रु. ३०५०/- दर जाहीर करण्यात आलेला आहे. गळीतास येणाऱ्या ऊसाला पहिला हप्ता रुपये २९५०/- प्रति मे. टन व दीपावली सणासाठी दुसरा हप्ता रुपये १००/- प्रति मे. टन दर देण्याचा निर्णय कारखाना व्यवस्थापनाने घेतलेला आहे. तसेच ऊस पुरवठादार शेतकऱ्यांना हंगाम २०२५-२६ मध्ये गळीतास आलेल्या ऊसाच्या टनेजनुसार कारखाना धोरणाप्रमाणे दीपावली सणानिमित्त मोफत साखर वाटप करण्यात येईल अशी माहिती कारखान्याचे जनरल मॅनेजर वैभव व्ही. काशीद यांनी दिली.

कारखान्यास ऊस पुरवठादार, शेतकरी यांचे सहकार्य आणि विश्वास नेहमीच कारखान्यासोबत राहिल. यापुढेही आपला कारखाना आपल्या हितासाठी सर्वोत्तम निर्णय घेण्यास तत्पर राहील अशी ग्वाही ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट क्र. ८ पांगरी ता. परळी यांनी दिली आहे.

# राज्य स्तरीय ब्राह्मण महा अधिवेशनास जिल्ह्यातील ब्राह्मण समाजाने हजर राहावे- अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.८ डिसेंबर**





सर्व ब्राह्मण समाजाचे अधिवेशन १ फेब्रुवारी २०२६ रोजी ९ ते ७ या वेळेत मंथन हॉल, बीड बायपास, येथे एमआयटी कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथे ब्राह्मण अधिवेशन आयोजित केले आहे. अशी माहिती स्वागत अध्यक्ष सचिन वाडे पाटील यांनी दिली आहे.

या बैठकीत विजय काजे, संदेश देशपांडे, संतोष जोशी, विवेक जोशी, काशिनाथ चांदजकर, महेश कुलकर्णी, रवींद्र पंडित, धनंजय नाळे, संतोष कुलकर्णी, जितेंद्र तरटे, प्रवीण खणाळे, रेणुका दास कुलकर्णी आदि मान्यवर उपस्थित होते.

या अधिवेशनास उद्योजक, विविध क्षेत्रातील मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

तरी समाजातील सर्व ब्राह्मण समाजाने राज्यस्तरीय अधिवेशनास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून अधिवेशन यशस्वी करावे असे आवाहन स्वागत अध्यक्ष सचिन वाडे पाटील यांनी केले आहे. तरी ब्राह्मण अधिवेशनास बीड जिल्ह्यातील सर्व ब्राह्मण समाजाने जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय पेशवा संघटना बीड यांच्यावतीने अखिल भारतीय पेशवा संघटना गेवराई तालुकाप्रमुख अनिल बोर्डे यांनी केले आहे.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कु.निकिता थावरे, पलक डोंगरे ची विद्यापीठ व्हॉलीबॉल संघात निवड

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ डिसेंबर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा महिलांचा व्हॉलीबॉल संघ जाहीर झाला, या संघामध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या कु. निकिता थावरे व पलक डोंगरे या दोन विद्यार्थिनींची निवड झाली आहे, या. विद्यार्थिनी नांदेड येथे होणाऱ्या क्रीडा महोत्सव व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे.मागील तीन वर्षांपासून या विद्यार्थिनींची निवड विद्यापीठ स्तरावरती चांगल्या खेळाच्या जोरावरती होत आहे.

या विद्यार्थिनींना प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश दादा सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए.कवळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे, प्रा. टाक सर. प्रबंधक प्रशांत चव्हाण, सतीश येरंडे, भोंडवे सर,प्रा. डॉ. रुद्रवार सर, प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा. एकनाथ मस्के, प्रा. बनसोडे सर.आदींनी अभिनंदन केले.

# भव्य शोभायात्रेने माँ कनकेश्वरीच्या शिव महापुराण कथेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ डिसेंबर**

माजलगाव येथील समस्त राजस्थानी समाज व श्री.सद्गुरु सत्संग गोसेवा समितीच्या वतीने कौशल्यादेवी बजाज मैदान मंगलनाथ बायपास रोड आयोजित माँ कनकेश्वरी देवी यांच्या श्री शिवमहापुराण कथेला भव्य दिव्य शोभा यात्रेने आज प्रारंभ झाला.



कथेच्या प्रथम दिनी भव्य दिव्य शोभायात्रा काढून कथेला सुरुवात केली आहे या शोभायात्रात ढोल ताशा पथक पुणे येथील व श्री सिद्धेश्वर विद्यालयाच्या मुलाचे ढोलताशा पथक व माजलगावाती प्रसिद्ध बॅन्ड ने वाजतगाजत शिवपुराण पोथीची मिरवणूक काढण्यात आली होती या शोभायात्रेत महादेव पार्वती ची झाकी,कलशधारी महिला लहान मुले,मुली व महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. आनंद व उत्साही वातावरणात ही शोभायात्रा काढण्यात आली होती .

सुप्रसिद्ध शिवमहा पुराण कथाकार महामंडलेश्वर श्री.श्री. १००८प.पु.माँ.कनकेश्वरी देवीजी यांच्या वाणीतुन दिनांक ८ डिसेंबर ते १६ डिसेंबर दुपारी २ ते ५ या वेळेत होणार आहे.या शिवमहापुराण कथेसाठी भव्य दिव्य मंडप,सजावट करण्यात आली आहे. मंडप मध्ये अतिथी साठी सोफे गाद्या, पत्रकार बांधवासाठी विशेष व्यवस्था व बाकी सर्वांसाठी खुर्च्यांची व्यवस्था केली आहे, कार्यक्रमास मराठवाड्यातीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातुन माँ यांचा भक्त परिवार शिवमहापुरन कथा श्रवणासाठी येणार आहेत.

या भक्तांची थांबण्याची तसेच चहा,नाश्ता,भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात येणार आहे.



या शिवमहापुराण कथे चें मुख्य यजमान श्री जुगलकिशोरजी लड्डा (टाकरवण ) हे आहेत.

माजलगाव येथील संपूर्ण राजस्थानी समाज,शिवभक्त व गोसेवक यानी या कथेचे नियोजन केले आहे.

तसेच या कथेचे यजमान जुगलकिशोर सीतारामजी लड्डा हे आहेत.महाप्रसादाचे मुख्य यजमान करवा ( डासाळा ) परिवार आहे.

महिलांचा लक्षनीय सहभाग

राजस्थानी समाजातील महिलांचा या शोभायात्रेत लक्षणीय सहभाग होता. अनेक कळशधारी महिलांनी शोभा यात्रेला सहभाग घेतला.

कथा श्रवणाचा लाभ घ्या-राजस्थानी समाज

माजलगाव येथे पंचक्रोशीतील सर्व भाविकभक्तांनी या कथा श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन तालुका माहेश्वरी सभा, जैन श्रावक संघ, विप्र समाज तथा समस्त राजस्थानी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त भव्य कॅन्डल रॅली

## माजलगावात विविध कार्यक्रमातुन महामानवाला अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ डिसेंबर**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त माजलगाव शहरात अभिवादन रॅली तसेच भव्य कॅन्डल रॅलीचे आयोजन क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या दोन्हीही रॅलींना माजलगावातील हजारो नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरात विविध ठिकाणी कार्यक्रम घेऊन मानवंदना देण्यात आली .सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून अभिवादन रॅलीची सुरुवात झाली. रॅली सांची बौद्ध विहार, केसापुरी कॅम्प येथे पोहोचली, तर रॅली नंतर प्रा. संजय बागुल यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

सायंकाळी ७ वाजता भारतीय बौद्ध महासभा व क्रांतिसूर्य बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने सुंदरराव सोळंके महाविद्यालयापासून भव्य कॅन्डल रॅलीला शांततेत सुरुवात झाली. हातात प्रज्वलित मेणबत्त्या घेऊन हजारो महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक सहभागासाठी पुढे आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे सर्वांनी बुध्दवंदना घेऊन महामानवांच्या स्मृतीस आदरांजली वाहिली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही, समानता आणि सामाजिक न्यायाच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाला दिशा देणारा ठरत असून, या विचारांनी प्रेरित होऊन नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाल्याचे दृश्य सर्वत्र पाहायला मिळाले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व मान्यवर, महिला मंडळ, युवक, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते आणि माजलगावकरांचे क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व भारतीय बौद्ध महासभा यांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहे.





राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार बीड मध्ये आले असता शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी त्यांची भेट घेतली यावेळी शिवसंग्राम शहराध्यक्ष सुहास पाटील, मनोज जाधव

# जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली जागतीक एड्स दिनानिमित्त सायकल रॅली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय बीड च्या वतीने जागतीक एड्स दिन व पंधरवाडा निमित्त दिनांक ०५डिसेंबर २०२५ रोजी सायकल रॅलीचे आयोजन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आली होती.

या वर्षीचे जागतीक एड्स दिनाचे घोषवाक्य होते- अडथळ्यावर मात करु, एकजुटीने एचआयव्ही/एड्सला लढा देऊ, नवं परिवर्तन घडवु जिल्हा न्यायालय बीडचे न्यायधीश अ. वहाब सय्यद, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सदस्य सचिव, व डॉ. मोहम्मद मुजाहेद मोमीन, जिल्हा रुग्णालयाचे अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक यांनी रॅलीस हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीचे उद्घाटन केले.

सदर रॅली करिता डॉ. लक्ष्मीकांत तांदळे, डॉ. अनंत मुळे, डॉ. महेशकुमार माने, डॉ. सुधीर राऊत, डॉ. रविकांत चौधरे, डॉ. अरुण राऊत, अधिसेविका श्रीमती रमा गिरी, प्रतीक जोशी, अजय ढाकणे, दत्ताजी बारगजे, डॉ. राजन दहीवाळ, रोटरी क्लब अध्यक्ष रो. राहुल बीरा, सचिव रो. प्रकाशजी कोंका, डॉ. देशमाने, लक्ष्मण मळेकर, गणेश वाघ, भोसले, भारत काका शेटे, इन्नर व्हील क्लब अध्यक्ष भारती मुंदडा, पाठक, अर्चना झोडगे, सामाजीक कार्यकर्ते तत्वशिल कांबळे विविध शाळा व रेड रिबन क्लब महाविद्यालयाचे प्रमुख तसेच विद्यार्थी युवक-युवती यांची उपस्थिती होती.

सदरील रॅलीची सुरुवात श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथुन करण्यात आली ही रॅली पुढे कारंजा, बलभिम चौक, माळीवेस, लोकशाहिर अण्णाभाऊ साठे चौक, बस स्टँड मार्ग परत श्री छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण बीड येथे रॅलीचा समारोप करण्यात आला.

समारोप कार्यक्रम प्रसंगी रॅलीचे प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम सुहास कुलकर्णी यांनी केले. सुरुवातीला दत्ताजी बारगजे इंफंट इंडिया प्रकल्प संचालक यांनी एचआयव्ही/एड्स जनजागृतीमध्ये महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, डापकु कार्यालयामार्फत केलेल्या कार्याचा उल्लेख केला व एचआयव्ही जजनजागृतीसाठी सामुदायीक प्रयत्नांची गरज विषद केली.

# गायगोठा बांधकामाला अपुरी मदत; सुधारीत अनुदान लागू करा- अनिल जगताप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ डिसेंबर**

रोजगार हमी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना गायगोठा बांधकामासाठी मंजूर असलेली रु. ८३,११४/- ही रक्कम अपुरी ठरत असल्याने शासन आदेशानुसार सुधारीत तरतूद लागू करून अनुदानवाढ द्यावी, अशी जोरदार मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी बीड जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. योजनेनुसार सध्या बीड मतदारसंघातील शेतकऱ्यांना गोठा बांधकामासाठी निश्चित रक्कम उपलब्ध होते. मात्र बांधकाम साहित्य, मजूरी आणि तांत्रिक खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे ही रक्कम काम पूर्ण करण्यास पुरेशी राहत नाही, असे जगताप यांनी निवेदनात नमूद केले आहे.

शासन निर्णय क्रमांक मग्रारोहयो-२०२०/प्र.क्र.७०/ रोहयो-७ मधील सुधारीत तरतूदीनुसार २ ते ६ गुरांसाठी एक गोठा आणि ६ पेक्षा अधिक गुरांसाठी ६ पटीने अनुदान देण्याची तरतूद स्पष्टपणे करण्यात आली आहे. १२ गुरांसाठी दुप्पट, १८ गुरांसाठी तिप्पट अनुदान देण्याची मुभा असून त्यापेक्षा जास्त अनुदान अनुज्ञेय नाही, असेही परिपत्रकात नमूद आहे. मात्र ही सुधारित तरतूद



बीड तालुक्यात अद्याप लागू करण्यात आलेली नाही, तर इतर सर्व तालुक्यात अंमलात आली आहे. यामुळे बीड तालुक्यातील शेतकऱ्यांवर अन्याय होत असून त्यांना गंभीर आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते, अशी व्यथा अनेक शेतकऱ्यांनी लेखी व तोंडी स्वरूपात मांडल्याचे जगताप यांनी सांगितले. शासन परिपत्रकातील तरतूद स्पष्ट असताना बीड तालुक्यातच सुधारित अनुदान लागू न होणे हा अन्याय आहे. शेतकऱ्यांना टिकाऊ आणि सुरक्षित गोठे बांधण्यासाठी सुधारित रक्कम मिळणे अत्यावश्यक आहे. असे अनिलदादा जगताप यांनी निवेदनात म्हटले आहे. जगतातील परिस्थिती लक्षात घेता शासन निर्णयाची समान अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी तातडीची मागणी करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेच्या-२०२५ च्या तारखेत बदल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ डिसेंबर**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी नियोजित महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ व दिनांक ४जानेवारी, २०२६ रोजी नियोजित महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ आयोगाच्या दिनांक ८ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शुध्दीपत्रकानुसार पुढे ढकलण्यात येत आहे. ही परीक्षा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात आली आहे.

परीक्षेचे नाव महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित केलेली होती ही परिक्षा पुढे ढकलण्यात आली असून दि. ४ जानेवारी २०२६ रोजी घेण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ दि. ११ जानेवारी, २०२६ रोजी घेण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव अ.ग. लेंडवे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

नियोजित वेळापत्रकानुसार प्रस्तुत परीक्षेच्या आयोजना संदर्भातील सर्व संवेदनशील कार्यवाही तयारी झालेली असल्याने उमेदवारांच्या बैठक व्यवस्थेकरीता रविवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी निश्चित करण्यात आलेली परीक्षा उपकेंद्रे दिनांक ४ जानेवारी, २०२६ रोजी नियोजित परीक्षेकरीता निश्चित करण्यात आली आहेत तसेच दिनांक ४ जानेवारी, २०२६ रोजी निश्चित करण्यात आलेली परीक्षा उपकेंद्राचा दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजी नियोजित परीक्षेकरीता निश्चित करण्यात आली आहेत. त्यानुसार, दिनांक २१ डिसेंबर, २०२५ व दिनांक ४ जानेवारी, २०२६ रोजी नियोजित परीक्षांकरीता आयोगाकडून अंतिम करण्यात आलेल्या परीक्षा उपकेंद्रे दिनांक ४ जानेवारी २०२६ व दिनांक ११ जानेवारी, २०२६ रोजीच्या परीक्षेसाठी निश्चित करण्यात आली असून नियोजित परीक्षा केंद्रावरच ही परीक्षा घेण्यात येईल याची परीक्षार्थींनी नोंद घ्यावी.

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'महात्मा बसवेश्वर'मध्ये संत शिरोमणी संताजी जगनाडे जयंती



**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ८ डिसेंबर :** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, जयंती महोत्सव समिती आणि कार्यालय द्वारा संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. यशवंत वळवी, डॉ. जे. एच. देशमुख, हिन्दी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे, प्रा. व्ही. जे. दुडिले, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे आणि सोपान सुतार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अध्यक्षीय समारोप प्रो. डॉ. आनंद शेवाळे यांनी केला तर आभार डॉ. जे. एच. देशमुख यांनी मानले.



# भाजपाकडून महापालिका निवडणूक लढविण्यास इच्छुकांची 'भाऊगर्दी'

## दोन दिवसात ६५० पेक्षा अधिक अर्ज दाखल; उद्या अंतिम दिवस

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ८ डिसेंबर :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका भाजपाकडून लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांकडून लातूर शहर जिल्हा भाजपाच्या वतीने अर्ज स्वीकृतीस प्रारंभ झाला आहे. या प्रक्रियेसाठी इच्छुकांनी मोठी भाऊगर्दी केलेली पाहण्यास मिळत आहे. दोनच दिवसात ७० जागांसाठी ६५० पेक्षा अधिक इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज पक्षाकडे दाखल केले आहे. इच्छुकांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या दिनांक १० डिसेंबर २०२५ हा अंतिम दिवस असून इच्छुकांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करावेत असे आवहान शहर जिल्हा भाजपाच्यावतीने करण्यात आले आहे.





लातूर शहर जिल्हा भाजपाच्यावतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच मनपा निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ केला आहे. प्रदेश भाजपाकडून आलेल्या सूचनेनुसार हि प्रक्रिया पार पडत आहे. उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचा शुभारंभ शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, मनपाचे माजी गटनेते ॲड. शैलेश गोजमगुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला होता. भाजपाच्यावतीने निवडणूक लढविण्यास इच्छुक असणाऱ्यांची मोठी संख्या असल्यामुळे शहर भाजपा कार्यालयात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. शहरातील अठराही प्रभागातून इच्छुकांची संख्या मोठी असल्याने शहर जिल्हा कार्यालय गर्दीने फुलून गेलेले पाहण्यास मिळत आहे. दोनच दिवसात उमेदवारी मागणाऱ्या इच्छुकांची संख्या ६५० पेक्षा अधिकची झाली आहे.

प्रदेश भाजपकडून आलेल्या सूचनेनुसार हि प्रक्रिया सुरु असून या सर्व इच्छुकांची यादी प्रदेश कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे. उमेदवारी निश्चितीसाठी उर्वरित प्रक्रिया पार पाडणे आवश्यक असल्याने इच्छुकांना आपला अर्ज दाखल करण्यासाठी उद्या गुरवार दिनांक १० डिसेंबर २०२५ शेवटचा दिवस असणार आहे. लातूर शहर जिल्हा भाजपा कार्यालय सकाळी ११ ते दुपारी २ यावेळेत इच्छुकांचे अर्ज स्वीकारले जात असून इच्छुकांनी आपले अर्ज वेळेत दाखल करावेत असे आवाहन शहर जिल्हा भाजपाच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोजमगुंडे करंडक स्पर्धेत 'दयानंद कला'चेच वर्चस्व

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ८ डिसेंबर :** लातूरच्या दगडोजीराव देशमुख सभागृहात नुकत्याच पार पडलेल्या दुसऱ्या नटवर्य श्रीराम गोजमगुंडे करंडक एकांकिका स्पर्धेत दयानंद कला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपले निर्विवाद वर्चस्व दाखवून दिले आहे.

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही दयानंद कला महाविद्यालय व तारांगण थिएटरच्या कलाकारांनी आपल्या दमदार अभिनयाचा ठसा उमटवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ॲड. शैलेश गोजामगुंडे लिखित तर विशाल माशाळकर दिग्दर्शित 'वात्सल्यम' या एकांकिकेने सर्वच स्पर्धकांवर मात करत तब्बल सहा प्रथम क्रमांकाची पारितोषिके पटकावत करंडकावर कब्जा केला.

मिळालेले पारितोषिकांचे मान एकांकिका : प्रथम - वात्सल्यम, दिग्दर्शन : प्रथम - विशाल माशाळकर,पुरुष अभिनय : प्रथम - विजय मस्के, संगीत : प्रथम - रोहन गायकवाड, सुरज साबळे, नेपथ्य : प्रथम - प्रमोद कांबळे,अभिनय गुणवत्ता : प्रथम - अर्जुन पवार. गेल्या वर्षी तृतीय क्रमांक मिळवत आपली ताकद



सिद्ध केलेल्या या संघाने यावर्षी थेट प्रथम पारितोषिक पटकावत एक नवा इतिहास रचला आहे. दयानंद कला महाविद्यालयाच्या या यशामुळे संपूर्ण लातूरमध्ये अभिमानाची भावना दाटून आली आहे. यशस्वी कलाकारांमध्ये विजय मस्के, विशाल माशाळकर, ज्योतिबा बडे, रुपेश सूर्यवंशी, अर्जुन पवार, पवन माने, सुरज साबळे, हरी कुंभार, शरीफ पठाण, सिद्धू स्वामी, योगेश पोटभरे,सीताराम खोडवेकर, लक्ष्मण सूर्यवंशी, वैष्णवी कासले, प्रणिता स्वामी यांचा यशस्वी सहभाग होता.

या विजयानिमित्त दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड, संगीत विभाग प्रमुख डॉ. देवेंद्र कुलकर्णी व मार्गदर्शक डॉ. संदीपान जगदाळे यांनी संघाचे अभिनंदन केले. दयानंद ही कलाकारांची खाण असून या तारांगणातून अनेक तारे झळाळून बाहेर पडले आहेत, असे प्राचार्यांनी यावेळी सांगितले.

# मजूर कामगारांची नोंदणी करणाऱ्या दलालांना हटवा : कॉ. भोसले



**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, ८ डिसेंबर :** बांधकाम मजूर कामगारांची नोदणी प्रक्रिया सहाय्यक कामगार आयुक्त जिल्हा कार्यालयातून करावे व मजूर कामगारांची पिळवणुक थांबवावी अनेक दलाल दुकान मांडून अनेक ठीकाणी बसलेले आहेत. ते बोगस नियमबाहाय नोंदणी करून अधिक रक्कम घेवून बांधकाम मजूर म्हणून नोंदणी करून शासनाची दिशाभूल व खर्या मजूर कामगारावर अन्याय करीत आहेत. अशा दलालाना पायबंद घालुन स्वतः कामगार कार्यालया मार्फत पुर्ण नोंदणी प्रक्रिया करावे असे अवाहन भारतीय मजूर युनियनचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार भोसले यांनी केले.

ते पाच नं. चौक येथील शाखा उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

अध्यक्षस्थानी सा. राष्ट्रप्रेम वृत्तपत्राचे संपादक बी.एम. कांबळे होते तर प्रमुख पाहुणे हतिम भाई शेख, समाजसेव सुफी सय्यद होते. पुढे बोलताना कॉ. राजकुमार भोसले म्हणाले मजूर कामगारांनी संघटीत व्हावे आणि आपल्या न्याय हक्कासाठी संघर्ष करावे भारतीय मजदूर युनियन मजूर कामगारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.

यावेळी नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पाच नं. चौक शाखेचे अध्यक्ष चंद्रकांत पवार, उपाध्यक्ष खंडू मस्के, सरचिटणीस जयराज गावकरी, सचिव विजयानंद धावरे, सहसचिव मंगेश गायकवाड, कोषाध्यक्ष इस्माईल सय्यद, सह कोषाध्यक्ष अनिल आदमाने, रियाज शेख, बाबासाहेब वाघमारे, संघटक खंडु साधु जावळे, सहसंघटक लोभा राठोड, राजु पठाण, दिपक चौफुले, सल्लागार शेख मुस्ताफ, जालीदर कांबळे, राहुल खंडागळे, बाबु आडे, भगवान शिंदे, उज्वला पवार, शामल आदमाने, पुजा चौधरी, अदिना अधिकार पत्र देवून सत्कार करण्यात आला तर आभार मोतीराम देठणेकर यांनी मानले. यावेळी बहुसंख्येने मजूर कामगार उपस्थित होते.

# विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ८ डिसेंबर :** विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने महापूर येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा यशस्वी समारोप सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या ५६ महिलांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

राज्याचे माजी मंत्री आ. अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाने आणि ट्वेंटीवन ग्री लि. च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या पुढाकारतून हे प्रशिक्षण केंद्र चालवण्यात आले होते. महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि स्वयंरोजगाराची संधी मिळावी, या उद्देशाने फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला आहे.

महापूर येथील या प्रशिक्षण केंद्रात महिलांना ३ महिन्यांचे व्यावसायिक शिलाई प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये शिलाईच्या विविध पद्धती, डिझाइनिंग आणि कटिंग यांसारख्या विषयांचे सखोल ज्ञान देण्यात आले. प्रशिक्षक क्रांती उफाडे यांच्या मार्गदर्शनाखाली या ५६ महिलांनी शिलाई कामातील कला आणि कौशल्ये आत्मसात केली. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला विलासराव देशमुख फाउंडेशनच्या समन्वयक संगीता मोळवणे, गावच्या सरपंच कल्पना माने, ग्राम सदस्य उत्तमराव वरवटे, संदीप माने, ग्रामसेवक अनंत सूर्यवंशी, ग्राम सदस्य श्यामकरण अंकुशे, अमोल कलबंडे, प्रशिक्षक क्रांती उफाडे, गजानन बोयणे यांच्यासह प्रशिक्षणार्थी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# घरफोड्या करणाऱ्या टोळीला शिताफीने केले जेरबंद

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ८ डिसेंबर :** मागच्या वर्षांपासून लातूर जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील २३ गंभीर घरफोड्या करणाऱ्या टोळीतील चार जणांना लातूर गुन्हे शाखेच्या पोलीस अधिकारी - कर्मचाऱ्यांनी मोठ्या शिताफीने जेरबंद केले आहे. या चोरट्यांकडून एकूण ४ लाख ३७ हजार रुपयांचा मुद्देमालही जप्त केला आहे.

लातूर जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून घरफोड्या व चोरीच्या गुन्ह्यांची मालिका सुरू होती. या गंभीर गुन्ह्यांच्या अनुषंगाने स्थानीय गुन्हे शाखा, लातूर यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण आणि वैज्ञानिक तपास पद्धती वापरून घरफोड्या करणाऱ्या आंतरजिल्हा कुख्यात व सराईत टोळीचा पर्दाफाश केला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशावरून, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेने ही महत्वाची कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण केली. स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लातूर-बार्शी रोडवरील लातूर विमानतळ टी-पॉइंट येथे चार संशयित इसम दोन मोटारसायकलीसह थांबलेले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सापळा लावून अजय श्रावण शिंदे, अर्जुन दिलीप भोसले, केशव माणिक पवार, विक्की सजगुऱ्या शिंदे या चार जणांना ताब्यात घेतले. या आरोपींची झडती घेतली असता त्यांच्याकडे सोन्याच्या ३ अंगठ्या,१ गंठण, कानातील फुले, व रोख रक्कम ३२ हजार रुपये मिळून आले. तसेच त्यांनी गुन्ह्यात वापर केलेल्या चोरीच्या १ लाख ३० हजार रुपये किमतीच्या दोन मोटरसायकली हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक एमएच २५ - बी जी १३६८ व टीव्हीएस अपाची एमएच २५ - बी एफ १३८२ जप्त करण्यात आले आहेत.

औसा, किल्लारी, मुरुड, रेणापूर, कासारशिरसी, लातूर ग्रामीण, गातेगाव, भादा आदी ठिकाणच्या १८ घरफोड्या. तसेच उमरगा, धाराशिव ग्रामीण, मंटाळा, मुडबी (बिदर) इत्यादी ठिकाणचे गंभीर चोरीचे एकूण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत. सदरची टोळी ही कुख्यात व सराईत असून एकट्या धाराशिव जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याला नमूद टोळी विरुद्ध चोरी, घरफोडी, दरोड्या सारखे तब्बल ५७ गुन्हे दाखल असल्याचे चौकशीत समोर आले आहे. या आरोपींकडून २ लाख ७५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, ३२ हजार रुपये रोख व १ लाख ३० हजारांच्या दोन मोटारसायकली असा एकूण ४ लाख ३७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, सुधाकर बावकर यांचे नेतृत्वाखालील पथकामधील सपोनि सदानंद भुजबळ, अमितकुमार पुणेकर, पोउपनि. राजाभाऊ घाडगे, पोउपनि. प्रमोद देशमुख ,पोउपनि. अमर केंद्रे, पोलीस ठाणे भादाचे सपोनि. महावीर जाधव, मुरुडचे सपोनि. अशोक उजगरे, सपोउपनि. सर्जेराव जगताप, पोलीस अंमलदार माधव बिलापटटे, युवराज गिरी, नवनाथ हासबे, रामलिंग शिंदे, तुराब पठाण, राजेश कंचे, मोहन सुरवसे,संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, अर्जुन राजपूत, दिनानाथ देवकते, रियाज सौदागर, प्रशांत स्वामी, सिद्धेश्र्वर मदने, जमीर शेख, तुळशीराम बरुरे, पाराजी पुटेवाड, मनोज खोसे, राहुल कांबळे, हल्लाळे, प्रविण कोळसुरे, चंद्रकांत केंद्रे, संतोष खांडेकर, व्यंकटेश निटुरे, प्रदीप चोपणे, जांभळे, सुहास जाधव, धनंजय गुट्टे, प्रज्वल कलमे, गोरोबा इंगोले, शैलेश सुडे, सागर आलापुरे, बाबा खोपे, महिला पोलिस अंमलदार अंजली गायकवाड यांनी केली आहे.

# राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेत पुणे जिल्ह्याला जेतेपद; ठाणेला उपविजेतेपद

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ८ डिसेंबर :** जिल्हा क्रीडा संकुल औसा रोड लातूर येथे ३५ वी राज्यस्तरीय वरिष्ठ गट महिला व पुरुष अजिंक्यपद तायक्कांदो स्पर्धेत क्यूरोगी या प्रकारात पुणे

### उत्कृष्ट खेळाडू म्हणून निकिता पवार व कानिफनाथ पोकले यांची निवड

जिल्ह्याने ९६ गुण प्राप्त करत सर्वसाधारण विजेतेपद जिंकले तर २९ गुणांवर ठाणे जिल्ह्याने उपविजेतेपद प्राप्त केले असून या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार निकिता पवार जळगाव व कानिफनाथ पोकले पुणे या खेळाडूने पटकावला आहे तर पुमसे या प्रकारात रायगड जिल्ह्याने विजेते पद तर पालघर जिल्ह्याला उपविजेतेपद प्राप्त झाले असुन उत्कृष्ट पुमसे खेळाडू म्हणून मृणाली हरणेकर व वंश ठाकुर यांना पुरस्कार देण्यात आला आहे.





शासन मान्यता प्राप्त ऑलिम्पिक खेळाच्या ३५ व्या राज्यस्तरीय वरिष्ठ गट महिला व पुरुष अजिंक्यपद तायक्कांदो स्पर्धेचे तायक्कांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई यांच्या मान्यतेने तायक्कांदो असोसिएशन ऑफ लातूर या जिल्हा संघटनेने दिनांक ५ ते ७ डिसेंबर दरम्यान जिल्हा क्रीडा संकुल औसा रोड लातूर येथे आयोजन केले होते. या स्पर्धेत महाराष्ट्रातील प्रतिभावान आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता स्पर्धेचे उद्घाटन लातूर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष ॲड किरण जाधव यांनी केले होते तर पदके व पारितोषिके वितरण तायक्कांदो राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश बारगजे यांच्या हस्ते वितरित करण्यात आले या स्पर्धेत राज्यातील २८ जिल्ह्यातून ३२० खेळाडू सहभागी झाले होते.

अजिंक्यपद स्पर्धेसाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शासनाने निर्गमित केलेल्या वयोगट व वजनी गटातील खेळाडूंची जिल्हास्तरावर निवड झालेल्या खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग देण्यात आला तर तायक्कांदो खेळातील क्यूरोगी प्रकारात पुरुष व महिला असे एकूण १६ खेळाडू व क्युरोगी प्रकारात ३५ प्रथम क्रमांकाचे खेळाडु निवड करुन हैदराबाद येथे संपन्न होत असलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत सहभागासाठी पाठवले जात आहे अशी माहिती, स्पर्धा आयोजक नेताजी जाधव यांनी दिली.

यावेळी तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया चे सहसचिव तथा स्पर्धा निरीक्षक मिलिंद पठारे, राज्य संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर अविनाश बारगजे, उपाध्यक्ष दुलीचंद मेश्राम, आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण बोरसे व सुभाष पाटील, के वाय पटवेकर लिंबराज पन्हाळकर यांची उपस्थिती होती तर स्पर्धा यशस्वीतेसाठी एस. व्ही. कुलकर्णी, धनश्री मदने, जान्हवी मदने, गीतांजली नागरगोजे रागिनी क्षीरसागर, अनुश्री कुलकर्णी, विश्वजित जाधव, आकाश मिरगे यांच्यासह जिल्ह्यातील तायक्कांदो खेळाडूंनी परिश्रम घेतले.

# विष्णुदास अग्रवाल यांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, ८ डिसेंबर :** येथील प्रिंटिंग व्यवसायातील ज्येष्ठ उद्योजक विष्णुदास रामकिशन अग्रवाल यांचे रविवारी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.



लातूरच्या प्रिंटिंग व्यवसायातील एक अग्रगण्य व्यक्तिमत्व अशी ओळख असलेले स्व. विष्णुदास अग्रवाल यांचे लातूरच्या मुद्रण क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय असे योगदान राहिले आहे. स्व. विष्णुदास अग्रवाल यांनी बदलत्या काळाप्रमाणे व्यवसायात आमूलाग्र बदल घडवून ट्रेडलपासून ते बहुरंगी ऑफसेट छपाईची संपूर्ण यंत्रणा लातुरात उपलब्ध करून देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे. स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पार्थिवावर सोमवारी, दि. ८ डिसेंबर २०२५ सकाळी लातूरच्या मारवाडी स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, उद्योग अशा विविध क्षेत्रातील मंडळींची उपस्थिती होती.

स्व. विष्णुदासजी अग्रवाल यांच्या पश्चात नरेंद्र व कमलकिशोर अग्रवाल ही दोन उद्योजक मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.